



# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ३ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## ठाकरे बंधूंच्या युतीला खूप उशीर झाला

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत ठाकरे बंधूंची युती झाली आहे. हे तुम्हाला आव्हान वाटतं का? हे विचारलं असता देवेंद्र फडणवीस यांनी यावर खरमरीत उत्तर दिलं आहे. दोन्ही भावांची ताकद संपल्यावर दोघं एकत्र आले आहेत त्यामुळे ते एकत्र आल्याने आम्हाला काही फरक पडत नाही. शिवाय मराठी मतं विशिष्ट कुणाची आहेत असं मुळीच नाही, भाजपाचे मतदारही मराठी आहेत असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मराठी व्होटबँक दुस-यांची आहे भाजपाची नाही हे समजूच नका. मराठी व्होटबँक आमची आहे हे लक्षात ठेवा असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मी १०० टक्के ठाकरे बंधूंच्या युतीचं क्रेडिट घ्यायला तयार आहे. बाळासाहेबांची मनापासून इच्छा होती पण ते करु शकले नाहीत. ते मी जर करु शकलो तर मराठी माणसाला एकत्रित आणायचं काम मी केलं आहे. पण आता या युतीला खूप उशीर झाला आहे. दोघांची मतं संपल्यावर हे दोघं एकत्र आले आहेत. २००९ मध्ये एकत्र आले असते तर वेगळा रिझल्ट आला ⇨(पान २ वर)

## बेलोरा विमानतळ एप्रिलपासून नाईट लँडिंगसाठी सज्ज

**अमरावती :** बेलोरा विमानतळ एप्रिल २०२६ पासून नाईट लँडिंग साठी सज्ज असणार आहे. कोणती विमान कंपनी रात्रीला विमानांची सेवा देणार हे विमानतळ प्राधिकरण ठरविणार आहे. ३१ मार्चपर्यंत नाईट लँडिंग संबंधित



एकूणच कामे पूर्णत्वास नेण्यात येणार असल्याची माहिती आहे. हल्ली बेलोरा विमानतळ येथून नाईट लँडिंग सुविधा व्हावी, अशी अमरावतीकरांची मागणी यानिमित्ताने पूर्णत्वास जाणार आहे. बेलोरा (अमरावती विमानतळ) येथे डापलर व्हेरी हाय फ्रिक्वेन्सी ओमनी डायरेक्शनल रेंज (डीव्हीओआर) यंत्रणा बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. ही यंत्रणा उभारण्यासाठी आवश्यक बांधकाम पूर्ण झाले असून डीजीसीएचे एक पथक दोन आठवडे आधी पाहणी करून परत गेले आहे. या चमुने सिव्हिल वर्कची पाहणी केली असता बेलोरा विमानतळ हे नाईट लँडिंग साठी सज्ज असल्याचे स्पष्ट केले. येत्या आठवड्यात डीजीसीएचे अभियांत्रिकी तसेच तंत्रज्ञांचे पथक बेलोरा विमानतळावर दाखल होणार असून ते अँटेना तसेच आवश्यक यंत्रांची उभारणी करणार आहे. ही यंत्रणा ⇨(पान २ वर)

## राज्यातील किडनी तस्करी रॅकेटचे धागेदोरे तामिळनाडूच्या मंत्र्यांपर्यंत

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** किडनी विक्रीत तरबेज झालेल्या आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय रॅकेटचे युनिव्हर्सल डोनर म्हणून ओ रक्तगटाची व्यक्तीच पहिले टार्गेट असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. तामिळनाडूतील त्रिची



येथील स्टार किम्स हॉस्पिटलमध्ये बेकायदेशीररीत्या डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी, दिल्लीचे डॉ. रवींद्रपाल सिंग हे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करायचे. भूलतज्ज्ञ व अन्य एक डॉक्टर सहकार्य करायचा. कोरोनानंतर स्टार किम्स हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपणाचा खरा गोरखधंदा सुरू झाला. हिमांशू भारद्वाजचीसुद्धा किडनी याच हॉस्पिटलमध्ये जुलै २०२४ मध्ये काढण्यात आली. पोलिसांच्या लेखी या संपूर्ण रॅकेटचा खरा सूत्रधार सोलापूरचा रामकृष्ण सुंचू म्हणजेच डॉ. कृष्णाच आहे. त्याने महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणासह विविध राज्यांत एजंटांचे जाळे उभारले होते. त्याच्या माध्यमातून येथे जवळपास ७० जणांच्या किडनी काढल्या आहे. यामागील कोट्यवधींच्या व्यवहाराचा तपास पोलिस पथक करीत आहे.

**आठ हजार पानांचा कॉल व चॅटिंग डेटा-**डॉ. कृष्णाचे ⇨(पान २ वर)

## कर महसुलात महाराष्ट्र 'किंग' देशाच्या तिजोरीत 22% वाटा

**नवी दिल्ली :** देशातील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनात डिसेंबर २०२५ मध्ये वार्षिक ६.१ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. केंद्र सरकारने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, डिसेंबर महिन्यात एकूण




१,७४,५५० कोटी रुपयांचा जीएसटी जमा झाला आहे.गेल्या वर्षी डिसेंबर २०२४ मध्ये हा आकडा १.६४ लाख कोटी रुपये होता. दरम्यान, डिसेंबर २०२५ मध्ये देशाच्या एकूण जीएसटी संकलनात महाराष्ट्राने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. ताज्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते डिसेंबर २०२५ या नउ महिन्यांत एकूण जीएसटी संकलनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे २२% इतका राहिला आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या नउ महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्राचे एकूण संकलन २,६६,७२६ कोटी रुपये असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. कर परताव्यात वाढ : डिसेंबर महिन्यात कर परताव्याच्या प्रमाणात ३१ टक्क्यांची मोठी वाढ झाली असून, सरकारने २८,९८० कोटी रुपये परत केले आहेत. देशांतर्गत व्यवहारातून मिळणा-या महसुलात केवळ १.२ टक्क्याची वाढ झाली आहे. मात्र, आयात वस्तूंवरील कर संकलनाने १९.७ टक्क्यांची मोठी झेप घेतल्याने एकूण आकडा समाधानकारक राहिला. सेस संकलनात मोठी घट झाली. लक्झरी आणि अन्य वस्तूंवरून उपकर हटवून तो आता केवळ तंबाखूजन्य पदार्थांवर मर्यादित केल्याने हा आकडा मागील वर्षीच्या १२,००३ कोटींवरून घसरून ४,२३८ कोटी रुपयांवर आला आहे.




# महाराष्ट्रात फक्त मराठीच सक्तीची

### साहित्य संमेलनातून मुख्यमंत्र्यांचा स्पष्ट संदेश

**स्वराज्यविस्तारक छत्रपती शाहू महाराज साहित्यनगरी (सातारा)/ प्रतिनिधी :** महाराष्ट्रामध्ये फक्त आणि फक्तमराठीच सक्तीची आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट निर्वाळा दिला आणि उपस्थित सर्व मराठीजनांची मने त्यांनी जिंकली.९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या प्रसंगी व्यासपीठावर संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, स्वागताध्यक्ष श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या प्रख्यात लेखिका डा. मृदुला गर्ग, मावळत्या संमेलनाध्यक्ष डा. तारा भवाळकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ज्येष्ठ उद्योजक फरोक कुपर, साहित्य महामंडळाचे प्रमुख विश्वस्त प्रा. डा. शिवाजीराव कदम, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, उपाध्यक्ष गुरैय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, संमेलनाचे कोषाध्यक्ष नंदकुमार सावंत, नवनिर्वाचित नगराध्यक्ष अमोल मोहिते तसेच महामंडळाचे पदाधिकारी आणि इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यामध्ये मनोगत व्यक्त करताना महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने प्रा. मिलिंद जोशी यांनी माय मराठीची अवहेलना होत असताना अन्य भाषांचे कोडकौतुक नको, भाषेला विरोध नाही परंतु सत्तीला विरोध आहे, अशी भूमिका






मांडली होती. त्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मुद्दयांचा परामर्श घेताना महाराष्ट्रात सत्ती फक्तमराठीचीच राहिल असे स्पष्ट केले.फडणवीस पुढे म्हणाले, मराठी भाषा वगळता अन्य कुठल्याही भाषेची सत्ती नाही. त्रिभाषा सूत्रानुसार आणखी कोणती भाषा समाविष्ट करावी याविषयी विचार सुरू आहे. कोणत्या वर्गापासून भाषा शिकवायची याचा विचार करण्यासाठी डा. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली असून या समितीचा अहवाल अंतिम टप्प्यामध्ये आलेला आहे. मराठी भाषा ही अभिजात होतीच तिला राजमान्यता देण्याचे काम केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने केले आहे. त्याचा उपयोग करून आता या भाषेला संपूर्ण भारतात लोकमान्यता मिळवून देण्याचे काम आपल्याला करायचे आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, इंग्रजी, फ्रेंच जर्मन अशा परदेशी भाषांना आपण पायघड्या घालतो; परंतु भारतीय भाषांना मात्र विरोध करतो ही भूमिका योग्य नाही. स्वभाषेचा सन्मान नक्कीच व्हायला हवा. त्याचवेळी इतर भाषांचेही स्वागत व्हायला हवे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.मराठी साहित्याला ख-या अर्थाने समृद्ध केले ते वारक-यांनी आणि संतसाहित्याने. मराठी ही मनामनांना जोडणारी भाषा आहे. ही केवळ भक्तीची नाही तर मूल्यांची भाषा आहे. साहित्यिकांचे कार्य समाजाला दिशा देण्याचे आहे. त्यामुळे लोकशाही विचारांची ही अभिव्यक्ती साहित्यविश्वाात अबाधित राहणे ⇨(पान २ वर)

## अर्ज मागे घेण्यावरून सोलापूरात मनसे पदाधिका-याची हत्या

### ■ भाजपच्या दोन गटात राडा ■ मोठा बंदोबस्त तैनात



**सोलापूर /प्रतिनिधी :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात राजकीय वादातून भाजपमधील दोन गटात टोकाचा वाद झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चांगलाच राडा झाला. सोलापुरातील जोशी गल्ली परिसरातील भाजपचे माजी नगरसेवक शंकर शिंदे यांचे संपर्क कार्यालय भाजपच्याच दुस-या गटाने फोडले. आपल्या समर्थक उमेदवारास उमेदवारी न मिळाल्याच्या करणावरून दुस-या गटाने कार्यालय फोडल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावून हस्तक्षेप केला. मात्र, येथील राड्यातच एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर महापालिका परिसरातील घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे. सोलापूर शहरात राजकीय वादातून एकाची हत्या करण्यात आली असून बाळासाहेब सरवदे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे ⇨(पान २ वर)

### नागपुरात अर्ज मागे घेऊ नये म्हणून समर्थकांचा प्रताप

## भाजप बंडखोर उमेदवाराला समर्थकांनी घरात कोंडले

**नागपूर/प्रतिनिधी :**नागपुरातील भाजपचे बंडखोर उमेदवार किसन गावंडे हे या हायव्होल्टेज नाट्याचे केंद्रबिंदू ठरले आहेत. पक्षाकडून उमेदवारी मागे घेण्याचा दबाव वाढत असतानाच, गावंडे यांच्या समर्थकांनी आक्रमक भूमिका घेत थेट त्यांच्या घरालाच कुलूप ठोकले. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांनी आता निर्णायक टप्प्यात प्रवेश केला असतानाच उमेदवारी न मिळालेल्या नाराज इच्छुकांनी बंडाचे निशाण फडकावल्याने सर्वच प्रमुख राजकीय पक्षांची डोकेदुखी वाढली आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत दुपारी ३ वाजेपर्यंत असल्याने, बंडखोर उमेदवारांना मनवण्यासाठी नेत्यांची धावपळ सुरू होती. कुठे समजूत, कुठे दबाव, तर कुठे राजकीय तोडगे वापरले जात असताना नागपुरात मात्र



राजकारणाला थेट थरारक वळण मिळाल्याचं पाहायला मिळालं. अर्ज माघारी घेउ नये, यासाठी समर्थकांनी थेट भाजपच्या बंडखोर उमेदवारालाच घरात कोंडून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. समर्थकांनी पक्षावर गंभीर आरोप करत सांगितले की किसन गावंडे यांना सुरुवातीला पक्षाकडून अधिकृत एबी फार्म देण्यात आला होता. मात्र नंतर अचानक उमेदवारी मागे घेण्यास सांगितले जात असून त्यासाठी त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकला जात आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठीच समर्थकांनी टोकाचे पाउल उचलल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्या मते, हा भाग सातत्याने दुर्लक्षित राहिला असून यापूर्वीही चारही उमेदवार इतर भागांतून देण्यात आले होते. त्यामुळे यंदा तरी या भागातून एक उमेदवार मिळावा, ही कार्यकर्त्यांची ठाम आणि रास्त मागणी आहे. या संपूर्ण ⇨(पान २ वर)

## मित्रानेच काढला मित्राचा काटा

### ◆ समलैंगिक संबंधाची किनार ◆

**अकोला/प्रतिनिधी :** किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून मित्रानेच मित्राचा काटा काढल्याची धक्कादायक घटना अकोला शहरात घडली. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलिसांनी अवघ्या अर्ध्या तासांत आरोपीला जेरबंद केले. या हत्याकांडामागे समलैंगिक संबंधाची किनार असल्याची माहिती आहे. अमोल



डिगांबर पवार असे मृत तरुणाचे, तर नितेश अरुण जंजाळ असे आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून गेल्या तीन दिवसांत हत्येची ही दुसरी घटना घडल्याने शहर हादरले आहे. शहरातील मोठी उमरीतील संजय नगर येथील मृत अमोल पवार आणि आरोपी नितेश जंजाळ हे दोघेही चांगले मित्र होते. काही दिवसांपासून दोघांमध्येही सातत्याने वाद होत होते. दोघांमध्ये समलैंगिक संबंध असल्याची चर्चा असून त्यातून वाद होत असल्याची माहिती आहे. या दोन मित्रांमध्ये जुना वाद पुन्हा उफाळून आला. नितेशने त्याच्यावर लाठीने हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर नितेश जंजाळ हा घरातून बाहेर आला आणि अमोल खाली पडून मरण पावल्याचे सांगितले. या घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतकाच्या शरीरावर जखमा दिसून आल्याने पोलिसांना संशय आला.

मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. पोलिसांनी आरोपी नितेश जंजाळ याच्या घरी जाउन पाहणी केली असता तो पसार झाला होता. गुप्त माहितीच्या आधारावर अर्ध्या तासाच्या आत आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. गुन्ह्यासंदर्भात विचारपूस केल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक मालती कायटे, पोहेकॉ आशिष खंडारे, पोहकॉ संतोष बागळे, ⇨(पान २ वर)

## ज्यांनी माझ्यावर 70 हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप केले, मी त्यांच्या सोबत सत्तेत सहभागी - अजित पवार

**पुणे/प्रतिनिधी :** विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा मुलगा राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सिद्धार्थ बनसोडे यांच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा आरोप आहे. पण, तो सिद्ध झाला नाही. माझ्यावर जलसंपदा विभागात ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप झाले. ते सिद्ध झाले नाहीत. ज्यांनी माझ्यावर ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप केला. मी त्यांच्या सोबत सत्तेत सहभागी असल्याचे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

महापालिका निवडणुकीसाठी अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर पवार यांनी शुक्रवारी पिंपरीत पत्रकार परिषद घेतली. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, शहराध्यक्ष योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे, प्रचारप्रमुख नाना काटे, अजित गव्हाणे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यावेळी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, केंद्रात, राज्यात महायुती सरकारसोबत आहे. पण, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक स्वबळावर लढली जात आहे. पिंपरी-चिंचवड शहर बदलत गेले. १९९१ ला मला शहराने खासदार केले. तेव्हापासून शहराशी माझे नाते आहे. शहरातील विकास कामांना सुरुवात केली. तेव्हापासून २०१७ पर्यंत महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. २०१७




मध्ये अनेकांना पदे दिली, तरी ते सोडून गेले. विठ्ठल रुक्मिणी मूर्ती खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप तत्कालीन महापौरांवर झाला. आता त्या माजी महापौर भाजपच्या उमेदवार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, आशिया खंडातील श्रीमंत असा महापालिकेचा गौरव होता. राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना अनेक विकास कामे केली. परंतु, महापालिकेला कर्जबाजारी केले नाही. भाजपच्या राजवटीत महापालिकेच्या ठेवी घटल्या. त्यात वाढ होण्याऐवजी कमी झाल्या. ठेवी मोडल्या तर विकास कामे दाखवावीत. कर्जरोखे काढले. भाजपने महापालिकेला कर्जबाजारी केले. रिंग करून अनेक कामे लाटली. चांगले ⇨(पान २ वर)

## मतदानापूर्वीच महायुतीचे अर्धशतक!



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात २९ महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यात आज उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करून त्यांची मनधरणी करणे प्रत्येक पक्षासमोर आव्हान होते. त्यात भाजपाने अनेक नाराजांची समजूत काढण्यात यश मिळवले. त्याशिवाय अपक्ष आणि प्रमुख विरोधी पक्षांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राज्यात महायुतीचे अनेक उमेदवार ⇨(पान २ वर)




## 'ई-केवायसी' अभावी अखेर राज्यातील 67 लाख लाडक्या बहिणी लाभापासून वंचित

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाकांक्षी ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक केले होते. मात्र, दिलेल्या मुदतीपर्यंत राज्यातील २ कोटी ४७ लाख महिलांपैकी १ कोटी ८० लाख महिलांनी ई-केवायसी केली तर तब्बल ६७ लाख महिलांनी ई-केवायसी न केल्यामुळे अखेर त्या आता लाडकी बहिणीच्या लाभापासून कायमच्या वंचित राहणार आहेत.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२४ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. सुरुवातीला तब्बल २ कोटी ६२ लाख अर्ज दाखल झाले होते. मात्र, छाननीमध्ये अनेक त्रुटी समोर आल्या. गेल्या दीड वर्षापासून राज्यातील सुमारे २



कोटी महिला या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. राज्यसरकारने जाहीर केलेल्या या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात दर महीना १५०० रुपये जमा होता. मात्र ऑक्टोबरमध्ये पैसे मिळाल्यानंतर नोव्हेंबर सरला, डिसेंबर संपला तरी लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नव्हते. त्यांना नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी असे तीन महिन्याचे एकत्र १५०० रुपये मिळतील अशाही बातम्या समोर येत होत्या, मात्र हे पैसे खात्यात कधी जमा होणार याची काही अधिकृत माहिती समोर आली नव्हती. दरम्यान लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आले होते. त्याची मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच होती. खरंतर नोव्हेंबरपर्यंतच ई-केवायसीची मुदत होती, मात्र लाखो महिलांचे ई-केवायसी न ⇨(पान २ वर)

# १ व १० वरिल उर्वरित

## ठाकरे बंधूंच्या युतीला खूप

असता. आता एकत्रित येउन काही फायदा नाही. दोघांची मतांची टक्केवारी इतकी कमी आहे की मराठी माणूस आणि अमराठी माणूस यांना मतं देणार नाही. हे दोन भाउ एकत्र आल्याची आम्हाला काहीही चिंता नाही. आम्ही निश्चितपणे निवडणून येउ. या दोघांचं प्राबल्य एकाच ठिकाणी आहे. तिथे आमची मतं हलली नाही. त्यांचे जे कार्यकर्ते आहेत त्यांच्यात अडचणी तयार झालेल्या आहेत. असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबई तोडण्याचा डाव वगैरे आरोप होतील हे मी आधीच म्हटलं होतं. ठाकरे बंधूंनाही माहीत आहे की मुंबई कुणाला तोडू शकत नाही.

## बेलोरा विमानतळ एप्रिलपासून

इन्स्टाल होण्यासाठी एक ते दीड महिन्यांचा कालावधी लागतो. यात कोणतीही त्रु टी राहू नये यासाठी वारंवार तपासणी व चाचणी घेतली जाते. तंत्रज्ञ चमूला ही यंत्रणा पूर्णपणे इन्स्टड्ढल झाल्याची खात्री पटते, त्यानंतर तिची प्रत्यक्ष चाचणी घेतली जाणार आहे. यंत्रणा व्यवस्थित असून ती अस्तित्वात आल्याचा परवाना हा डीजीसीएकडून घ्यावा लागतो. त्यामुळे डीजीसीएचे विशेष पथक यंत्रणेच्या अचूकतेची चाचणी घेईल. त्यांची पूर्ण खात्री झाल्यानंतरच परवाना मिळतो. त्यानंतरच रात्री विमानोड्डाण व लँडिंग सुरू होते. ही संपूर्ण प्रक्रिया दोन ते अडीच महिने चालणार आहे. त्यानंतरच एप्रिलपासून रात्री विमानांचे लैंडिंग व टेकऑफ होईल, अशी माहिती आहे. एप्रिलपासून विमानतळ नाईट लँडिंग साठी सज्ज असेल, अशी सुविधा तयारी केली जाणार आहे. बांधकाम अंतिम टप्प्यात असून महिन्याभरात पूर्ण होईल. मात्र नाईट लँडिंग साठी लागणारा परवाना, तांत्रिक बाबी हे विमानतळ प्राधिकरण हाताळणार आहे.

## राज्यातील किडनी तस्करी

मोबाइल कॉल डिटेल्स रेकाईस (सीडीआर) तपासले असता सुमारे आठ हजार पानांचा कॉल व चॅटिंग डेटा पोलिसांच्या हाती लागला आहे. यातूनच डॉ. कृष्णा हा डॉ. राजरत्नम आणि डॉ. रवींद्रपाल सिंग यांच्या सतत संपर्कात असल्याचे उघड झाले.

**बनावट आधारकार्डचा आधार-**तामिळनाडूत केलेल्या शस्त्रक्रियेत उत्तर प्रदेश आणि बिहारमधील नागरिकांचाही समावेश होता. ड?. कृष्णाने बांगलादेशातही स्वतंत्र नेटवर्क उभारले होते. पीडितांना प्रथम पश्चिम बंगालमध्ये आणून बनावट आधारकार्ड तयार करू न तामिळनाडूला शस्त्रक्रियेसाठी पाठवायचा. ड?. राजरत्नमच्या आंतरराष्ट्रीय संबंधासह संपूर्ण रॅकेटचा बहुस्तरीय तपास पोलिस करीत आहे.

## महाराष्ट्रात फक्त मराठीच

महत्त्वाचे आहे. सध्या राजकारण्यांचा साहित्य संस्थांमधील हस्तक्षेप वाढला असून त्या संस्था ताब्यात घेण्याचा उद्योग सुरू आहे. साहित्यसंस्थांची स्वायत्तता जपली जावी, अशी अपेक्षा उद्घाटन समारंभात व्यक्तझाली होती. त्या पार्श्वभूमीवर साहित्यसंस्थांमध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप होणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. साहित्यिकांनी राजकारणात जरुर यावे परंतु साहित्यविश्वात त्यांनी राजकारण आणू नये, अशी टीप्पणी त्यांनी केली.

## अर्ज मागे घेण्यावरून

यांची राजकीय वादातून हत्या झाल्याचा आरोप केला जात असून या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. सोलापूर महापालिका प्रभाग २ मध्ये अर्ज माघारी घेण्यावरून आज भाजपच्या दोन गटात वाद झाला. प्रभाग दोनमध्ये शालन शिंदे ह्या भाजपच्या अधिकृत उमेदवार आहेत, तर त्यांच्याविरोधात भाजपच्या बंडखोर रेखा सरवदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. रेखा सरवदे यांनी अर्ज माघारी घ्यावा यासाठी शिंदे आणि सरवदे या दोन गटात मोठा वाद झाला, या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय देखील फोडण्यात आले. मात्र, त्याचवेळी शिंदे गटाच्या लोकांनी मध्यस्तीसाठी आलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप सरवदे यांच्या नातेवाईकांनी केला आहे. ह्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या बाळासाहेब सरवदे यांना उपचारासाठी सोलापूरच्या सहकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डाक्टरांनी दिली. या घटनेनंतर शहरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

## भाजप बंडखोर उमेदवाराला

प्रकरणावर स्वतः किसन गावंडे यांनीही माध्यमांसमोर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सांगितले की, पक्षाने मला अधिकृत एबी फार्म दिला होता. मात्र आता अचानक उमेदवारी मागे घेण्यास सांगण्यात येत आहे. मी अर्ज मागे घेण्यासाठी जात होतो, पण माझ्या कार्यकर्त्यांनी घराला कुलूप लावून मला बाहेर जाण्यापासून रोखले आहे. गावंडे यांच्या या विधानामुळे पक्षातील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. उमेदवारी मिळाल्यानंतर ऐनवेळी माघार घेण्यास सांगणे हे अन्यायकारक असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

## मित्रानेच काढला मित्राचा

पोकॉ शक्ती कांबळे, पोकॉ प्रदीप पवार यांनी ही कारवाई केली.

लाठी-काठीने तोंडावर, डोक्यावर जबर मारहाण

पोलीस तपासात मृत अमोलच्या अंगावर मोठ्या प्रमाणात जखमा दिसून आल्या. त्यामुळे अमोलची हत्या झाल्याचा संशय पोलिसांना होता. त्यानंतर परिसरातील नागरिकांसह नितेशची चौकशी पोलिसांनी केली. तपासादरम्यान, सोबतच राहणा-या नितेश जंजाळ यानेच अमोलची हत्या केल्याचे समोर आले. लाठी-काठीने तोंडावर, डोक्यावर जबर मारहाण झाल्यामुळे मृत्यू झाला. आरोपीला ताब्यात घेतल्यावर त्याने गुन्ह्याची कबुलीच दिली आहे.

## ज्यांनी माझ्यावर ७० हजार कोटींच्या

रस्ते उखडले जात आहेत. त्यावर कोट्यवधी रु पये खर्च केले जात आहेत. शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. कोंडीच्या विळख्यात शहर अडकले आहे. अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली रस्त्यांची वाट लावली. फुटपाथवर अतिक्रमण करून हप्ते वसुली केली जात आहे. वाहनतळाची व्यवस्था केली नाही. निविदेत रिंग केली जाते. निविदा रक्कम फुगवली जाते. त्यात खाडाखोड केली जाते. याचे पुरावे आहेत.

## मतदानापूर्वीच महायुतीचे

बिनविरोध विजयी झाले. मतदानापूर्वीच विविध महापालिकांमध्ये महायुतीचे ६४ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. विशेष म्हणजे निवडणुका बिनविरोध करण्यामध्ये भाजपाने मोठी आघाडी घेतली आहे. आतापर्यंत भाजपाचे ४४ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत त्यात सर्वाधिक १५ बिनविरोध नगरसेवक एकट्या कल्याण डोंबिवली महापालिकांमध्ये आहे. भाजपानंतर सत्तेतील दुसरा पक्ष शिंदेसेनेचेही १८ उमेदवार बिनविरोध नगरसेवक बनले आहेत आणि महायुतीतील तिसरा घटक पक्ष अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही मतदानापूर्वीच २ ठिकाणी बिनविरोध उमेदवार निवडून आणले आहेत. त्यामुळे राज्यातील महापालिका निवडणुकीतील मतदानापूर्वीच महायुतीने विजयाचा गुलाल उधळला आहे. त्याशिवाय मालेगाव येथे इस्लाम पार्टीचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे.

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी सुरु वातीला १,१०७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननी प्रक्रियेत ९९ अर्ज बाद झाले तर १ जानेवारी रोजी २७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले होते. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी म्हणजेच २ जानेवारीला अनेक उमेदवारांनी माघार घेतल्याने वागळे इस्टेट आणि वर्तकनगर भागात शिंदे सेनेचे सात उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

## 'ई-केवायसी' अभावी अखेर

झाल्याने ही मुदत वाढवण्यात आली होती. लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी वगळण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून ईकेवायसी बंधनकारक करण्यात आले होते. आधी ईकेवायसीची मुदत १८ नोव्हेंबरपर्यंत होती, मग ती वाढवून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. पण त्यानंतरही अनेक महिलांना ई-केवायसी करण्याच अडचणी आल्याने ही मुदत वर्षाअखेरीस, ३१ डिसेंबपर्यंत वाढवण्यात आली. काल अखेर ही मुदत संपली. त्यामुळे आता ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, त्यानंच या योजनेचा लाभ आणि पर्यायाने दरमहा १५०० रु पये मिळणार आहेत. उर्वरित महिलांना या योजनेला मुकावे लागणार आहे.

**ग्रामीण भागात अडचणी-**महिला व बालविकास विभागातील अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, सध्या राज्यात एकूण २ कोटी ४७ लाख महिला पात्र होत्या. त्यापैकी केवळ १ कोटी ८० लाख महिलांनीच विहित मुदतीत ई-केवायसी केली आहे. उर्वरित ६७ लाख महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण न केल्याने त्या आता या लाभापासून मुकणार आहेत. या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवरील भार काही प्रमाणात कमी होईल.

**नोव्हेंबरचा लाभ जमा-** निवडणूक आणि तांत्रिक कारणांमुळे नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांचे हप्ते प्रलंबित होते. त्यापैकी नोव्हेंबरचा हप्ता १ जानेवारीपासून बहुतांश महिलांच्या खात्यात जमा झाला आहे. ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, त्यांच्या खात्यात आता १५०० रु पये जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ५ लाखांहून अधिक महिलांचे आधार कार्ड बँकेशी लिंक नाही.

## राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष सुनील

दिल्यानंतर, अमरावती शहरालगत वलगाव येथील एका सभागृहात सुनील वऱ्हाडे यांचा भाजपामध्ये जाहीर प्रवेश झाला. यावेळी मंचावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अमरावती महापालिका निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून उपस्थित असलेले माजी मंत्री संजय कुटे, जिल्ह्याच्या माजी खासदार नवनीत राणा, भाजपाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, तिवसा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र वानखडे,खासदार डॉ. अनिल बोंडे प्रामुख्याने उपस्थित होते.

## आयुक्त सौम्या शर्मा यांनी केली

आवश्यक त्या सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

ईव्हीएम गोदाम ची नियमित तपासणी, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे २४ तास कार्यरत निरीक्षण, नोंदवही अद्ययावत ठेवणे तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यावर आयुक्तांनी विशेष भर दिला. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता राखणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी असून, त्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पाहणीदरम्यान निवडणूक शाखेचे अधिकारी, पोलीस विभागाचे प्रतिनिधी तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते. निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेताना आढळलेल्या किरकोळ बाबी तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले. आगामी निवडणुका आदर्श आचारसंहितेचे पालन करून यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अमरावती महानगरपालिका सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## भाजपच्या माजी नगरसेविका

आले. त्यामुळे आपण आता अमरावती शहरात झपाटून विकास कामे करणाऱ्या आ. सुलभा खोडके यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत काम करणार आहे. यावेळी आ. खोडके यांनी स्वाती सुनील जावरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा देऊन त्यांचे पक्षात स्वागत केले.

याचवेळी गेल्या ३५ वर्षांपासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात काम करणारे कट्टर काँग्रेस समर्थक नरेंद्र गुलदेवकर यांनी सुद्धा प्रभाग क्रमांक - २ गाडगेनगर -पीडीएमसी मधून अ गट अनुसूचित जाती प्रवर्गातून दाखल केलेले नामांकन वापस घेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. एकेकाळी एनएसयुआयचे शहर अध्यक्ष राहिलेले नरेंद्र गुलदेवकर यांची एक कट्टर काँग्रेसी म्हणून देखील शहरात ओळख आहे.

मात्र काँग्रेस पक्षाने त्यांना ऐन वेळेवर तिकीट नाकारल्याने त्यांच्यावर अन्याय झाला. याच नाराजीतून त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश घेतला. तसेच आपले सामाजिक कार्य व आंबेडकरी चळवळ पुढेही सुरूच ठेवणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात चांगले काम करणार असल्याचा विश्वास नरेंद्र गुलदेवकर यांनी व्यक्त केला.

याचवेळी आ. सुलभा संजय खोडके यांनी नरेंद्र गुलदेवकर यांचे पक्षात स्वागत करीत त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर उपाध्यक्ष पदी नियुक्ती केली. यावेळी युवा नेते यश खोडके,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष प्रशांत डवरे, योगेश सवई, राजाभाऊ खोरगडे, प्रिया धनाडे,बाळासाहेब मार्डीकर, संकेत महल्ले, प्रमोद धनाडे, रवी वानखडे, सुनील जावरे, समाज भुषण पुरस्कार प्राप्त विनोद गुडधे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आकाश हिवसे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर प्रसिद्धी प्रमुख अमित तायडे, गौतम वानखडे, अतुल इंगळे, आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस परिवार व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## मतदार जनजागृतीसाठी एलईडी

'लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. विशेषतः नवमतदार, युवक, महिला तसेच दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचून त्यांना मतदानासाठी प्रोत्साहित करणे हे स्वीप उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. एलईडी व्हॅनच्या माध्यमातून प्रभावी दृकश्राव्य साधनांचा वापर करून व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.'

या कार्यक्रमास महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी, स्वीप समन्वयक तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणी वाढविणे, मतदानाची टक्केवारी वाढविणे तसेच 'लोकशाहीचा उत्सव – मतदानाचा हक्क' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

एलईडी व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधला जाणार असून, शहरात लोकशाही मूल्यांची जाणीव अधिक दृढ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर, डॉ. प्रकाश मेश्राम (स्वीप प्लॅन नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), पंकज कुमार सपकाळ (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी), ज्योती बनसोड, योगेश पखाले (शाळा निरीक्षक), कैलास कुलट, शुभांगी सुने, संजय बेलसरे, सुमेश वानखडे, चंचल दातीर, प्रियांका हंबर्डे, अर्चना रडके आदी स्वीप प्लॅनचे सदस्य उपस्थित होते.

## ब्राह्मणवाडा थडी प्राथमिक

त्यामध्ये पाण्याची व्यवस्था नसून पेशंटला पिण्याकरिता सुद्धा पाण्याची व्यवस्था नाही असा अजब कारभार ब्राह्मणवाडा थडी मधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिसून आलेला आहे. त्यामुळे गावामध्ये हा चर्चेचा विषय झालेला आहे.

गावातील नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोग्य सेवक हेमंत तायडे हे सतत गैरहजर असतात. त्यांना कधीही विचारले असता ते सांगतात मी कोर्ट मध्ये आहे. याबाबतीत त्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कनिष्ठ अधिकाऱ्यामार्फत तक्रारी सुद्धा केलेल्या आहेत परंतु त्यावर अजून पर्यंत कोणतीही प्रकारची कारवाई झालेली नाही. यापूर्वी जिल्हा आरोग्य अधिकारी सुरेश आसोले प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन गेले असता त्या ठिकाणी त्यांना संपूर्ण भोंगळ कारभार दिसून आलेला आहे. परंतु कोणत्याही कर्मचारी व अधिकाऱ्यावर अजून पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. मुख्य निरीक्षक रामेश्वर कोंडे हे कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून स्वतःही वेळेवर उपस्थित राहत नाही आणि वेळेपूर्वीच घराचा रस्ता धरतात. त्यामुळे यांना आवर घालणार तरी कोण? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडलेला आहे. यावर काय कारवाई होणार याकडे सर्व गावातील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

## शेत शिवारातून बैलबंडी

आजूबाजूच्या परिसरात विचारपूस व चौकशी केली. कुठेही लोखंडी बैलबंडी व दोन बैल आढळून आले नाही.दोन दिवस त्यांनी स्वतः चांदूरबाजार रोड व वरुड रोडवरील सीसीटीव्ही व आजूबाजूचा जंगल तपासून बघितला असता कुठेही बैलबंडी व बैलजोडीचा शोध लागू शकला नाही. शेवटी फिर्यादी गोपीकिसन बियाणी यांनी लोखंडी बैलबंडी अंदाजे किंमत २० हजार रुपये,दोन बैल अंदाजे किंमत ६० हजार रुपये असा एकूण ८० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरून नेल्याची तक्रार दि.१ जानेवारी रोजी मोर्शी पोलिसात दाखल केली. अज्ञात चोरट्यांविरुद्ध मोर्शी पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला असून मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आरोपीचा कसून शोध घेत आहे.

## धामणगाव रेल्वे येथील

शेतशिवारात झडती दरम्यान ट्रॅक्टर पेरणी यंत्र रोटावेटर दोन ,तीन फळी नागर ५, पेरणी यंत्र, ट्रॅक्टर ट्रॉली, बोलेरो गाडी असे एकूण २७ प्रकाराचे शेतीपूरक असणारे ऐवज, संशयास्पद व्यवहारातून शेतशिवारात ठेवले असल्याचे आढळून आले. गोपाळ टेकाळे यांच्या विरोधात महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम १६ नियम १७ तसेच कलम १८ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुमार यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक निबंध स्वाती गुडधे, सहकार अधिकारी यशोदास खोब्रागडे ,सुधीर मानकर, किशोर भुसकुटे ,मयूर जुनघरे, पोलीस कर्मचारी दीपक पंधरे, नीलिमा खडसे , सहाय्यक निबंधक सचिन पतंगे अविनाश महल्ले, सरिता गोडबोले, राजेश नाईक, सुनील भगत, निखिल माणिकपुरे, नवनाथ खेडकर, सुवर्णा निंभोरकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील चौकशी धामणगाव येथील सहायक निबंध राजेश भुयार करत आहे.

## उपराई येथे रोजगार हमी

त्याबाबत पाठपुरावा केला. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करुन शासनाची दिशाभूल करणाऱ्या रोजगार सेवक विनायक खंडारे याला कामावरुन कमी करण्याचे पत्र उपराई ग्रामपंचायत कार्यालयास दिले. ग्रामपंचायत कार्यालयाने वरीष्ठाच्या आदेशानुसार दि. २८ नोव्हेंबरच्या मासिक सभेत व २४ डिसेंबरच्या मासिक सभेत कामावरून कमी करण्याचा ठराव मंजूर केला व आज दि.२ जानेवारीला ग्रामपंचायतची ग्रामसभा घेऊन रोजगार सेवकाविरुद्ध बहुमत सिद्ध करुन कामात गैरप्रकार व अनियमितता करणाऱ्या रोजगार सेवकाला ग्रामसभेत बहूसंख्येने नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीत कामावरून कमी केले.

## ८७ जागांसाठी ६६१

२ तहसील कार्यालय येथून १२९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. २९ उमेदवारांनी येथून नामांकन परत घेतले. झोन-३ राजापेठ मध्ये १२२ उमेदवारांनी नामांकन भरले होते. छाननी दरम्यान २ नामांकन बाद झाले आणि आज २६ उमेदवारांनी माघार घेतली. झोन-४ दस्तूर नगर मध्ये १२९ उमेदवारांमधून २१ उमेदवारांनी माघार घेतली. झोन ५ मनपा शिक्षण विभाग येथून २७ उमेदवारांनी नामांकन परत घेतले. झोन ६ जुनी तहसील येथून १४ उमेदवार आणि झोन ७ बनडेरा मधून २१ उमेदवारांनी माघार घेतली. यामुळे आता निवडणुक रिंगणात ६६१ उमेदवार उरले आहे. या उमेदवारांमध्ये आता मुकाबला होणार आहे.

## धुळघाट येथे श्रीराम

पडली. असंतुलित होऊन दरीमध्ये ही बसह कोसळणार होती, पण तेथे क्रिकेट खेळणाऱ्या तरुणांची नजर त्यावर पडली. त्यांनी बसवर लटकून आत मध्ये बसलेल्या प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. यामुळे मोठा अनर्थ टळला.या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. गुरुवारी सुद्धा बिहाली-घटांग मार्गावर एसटी महामंडळ आणि खाजगी बसमध्ये धडक झाली होती. त्यावेळीही अनर्थ टळला होता. श्रीराम ट्रॅव्हल्सची बस आणि एसटीमध्ये धडक झाली होती, त्यावेळीही नागरिकांनी धाव घेऊन प्रवाशांना बाहेर काढल्यामुळे पुढील अनर्थ टळलो.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २८९३/२०२५
श्रीमती बहिणाबाई अधिक सहा विरुध्द निरंक
पुढील तारीख २७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Smt. Bahinabai Chimanaji Sontakke**
   Age 80 yrs., Occu.- Housewife
   R/o. W/o. Cimanaji Sontakke, Kasai pura, Yawli Shahid, Amravati, Maharashtra - 444 701
2. **Sau. Kamla Sahdev Tathod ,** Age 60 yrs., Occu.- Housewife
   R/o. W/o. Sahdev Tathod, Jay Nagar Galli No.1, Sutgirni Jawal, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. **Sau. Lilabai Dyaneshwar Adayake**
   Age 58 yrs., Occu.- Housewife
   R/o. W/o Dnyaneshwar Adayake, Kolha, Tq. Achalpur, Dist. Amravati
4. **Late Bhaurao Chimnaji Sontakke (through its legal heirs)**
   **A. Padmabai Bhauraoji Sontakke (wife)**
   Age 54 yrs., Occu.- Housewife
   **B. Nilesh Bhaurao Sontakke (son)**
   Age 40 yrs., Occu.- Business
   Both R/o. Bhauraoji Sontakke, Adarsh Nagar, Yawli Shahid, Amravati.
   **C. Nilima Mukesh Tathod ( Daughter)**
   Age 39 yrs., Occu.- Housewife
   R/o. Jay Nagar, Galli No. 1, Sutgirni Maidan, Javal, Amravati, Tq. & Dist. Amravati
5. **Sanjayrao Chimanrao Sontakke ,** Age 56 yrs., Occu.- Business,
   R/o. S/o. Chimanrao Sontakke, Plot Ward No.04 Yawali Shaheed, Amravati
6. **Krushna Chimanji Sontakke ,** Age 51 yrs., Occu.- Business,
   R/o. Wadali Camp, Amravati Near Water Tank Amravati, Tq. & Dist. Amravati
7. **Pnjabrao Chimanji Sontakke** , Age 47 yrs., Occu.- Business,
   R/o. S/o. Chimanji Sontakke Kasai Pura, Yawali Shahid, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत चिमण झिमणाजी सोनटक्के हे दि.२३.०७.२०२४** रोजी यावली, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार बहिणाबाई अधिक सहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती बहिणाबाई अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** २९.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २९६५/२०२५
ज्योती विरुध्द निरंक
पुढील तारीख ०४.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Jyoti Bhaurao Khade,** Age 77 yrs., Occu.- Retired
   R/o Near Maroti Temple, bhumiputra Colony, Congress Nagar, Amravati
2. **Sau. Pratima Sharad Sonawane**
   **@ Ku.Pratima Bhaureo Khad,** Age 56 yrs., Occu.- Service
   R/o. Pimpalner, Tq. Sakare, Dhule
3. **Sau. Nilima Shailesh Raut**
   **@ Ku. Nilima Bhaurao Khad,** Age 58 yrs., Occu.- Household
   R/o Near Maroti Temple, bhumiputra Colony, Congress Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत भाऊराव तुकारामजी खाडे हे दि. ०६.०६.२०१३** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार ज्योती व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार ज्योती व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** २२.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २९४७/२०२५
श्री.जुबेदा अधिक पाच विरुध्द निरंक
पुढील तारीख ०४.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Zubeda Khatoon w/o. Mohammad Abdul Qaiyyum**
   Age 77 yrs., Occu.- Household
2. **Mohammad Sajid Iqbal , S/o. Mohammad Abdul Qaiyyum**
   Age 57 yrs., Occu.- Business
3. **Mohammad Asif Iqbal S/o. Mohammad Abdul Qaiyyum**
   Age 58 yrs., Occu.- Rtd. Lecturer
4. **Mohammad Abid Iqbal, S/o. Mohammad Abdul Qaiyyum**
   Age 43 yrs., Occu.- Business
5. **Najamunnisa , d/o. Mohammad Abdul Qaiyyum**
   Age 54 yrs., Occu.- Household
6. **Nazema Anjum , d/o. Mohammad Abdul Qaiyyum**
   Age 47 yrs., Occu.- Household
   All R/o. Panch Bungalow, Jail Road, Near National Medical Chaprasipura Camp, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत मोहम्मद अब्दुल कैय्युम S/o. मोहम्मद अब्दुल जाबर हे दि.३०.०९.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार जुबेदा अधिक पाच विरुध्द गैरअर्जदार निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती जुबेदा अधिक पाच विरुध्द गैरअर्जदार निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** ३१.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २८८१/२०२५
श्री.राजु अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख २३.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Raju Narayan Waghpanjar (Wakpanjar)**
   Age 40 yrs., Occu.- Labour
2. **Ayush Raju Waghpanjar (Wakpanjar)**
   Age 12 yrs., Occu.- Education
3. **Anjel Raju Waghpanjar (Wakpanjar)**
   Age 10 yrs., Occu.- Education
   Applicant No. 2 & 3 are minor through legal guardian father i.e. applicant no. 1
   All R/o. Juni Vasti, Mata Fail, Badnera, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत सिमा राजु वाघपंजर हया दि.०२.०७.२०१९** रोजी बडनेरा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार राजु अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री.राजु अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** १८.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**नोटीस**
**(आदेश ५ नियम २० प्रमाणे)**
**विद्यमान ३ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर.) अचलपूर यांच्या न्यायालयात.**

**आर.सी.एस. ३६/२०२५** **ने.ता.२०.०१.२०२६**

**इस्माइल खॉ हसन खान ......वादी**
**...विरुध्द...**
**दत्तात्रय ठाकरे.....प्रतिवादी**

**बनाम -** **१. दत्तात्रय तुकाराम ठाकरे**
**२. बाळकृष्ण तुकाराम ठाकरे**
दोन्ही रा.कैकाडीपुरा, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती

ज्याअर्थी उपरिनामित वादी यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, सोबतच्या अर्जाप्रमाणे,

त्याअर्थी,याद्वारे तुम्हाला फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखवण्याकरिता **दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी १०.३०** वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दिनांक ३१/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

समक्ष प्रतिज्ञेवर

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर), अचलपूर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २७५८/२०२५
लता व इतर विरुध्द निरंक
पुढील तारीख १३.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Lata Mohanrao Anasane ,** Age 61 yrs., Occu.- Household
   R/o. Amba Devi Road, Tuljagir Wada Ghandhi Chowk, Amravati
2. **Jyoti Mohanrao Anasane ,** Age 38 yrs., Occu.- Household
   R/o. Amba Devi Road, Tuljagir Wada Ghandhi Chowk, Amravati
3. **Priti Ashish Chede ,** Age 40 yrs., Occu.- Household
   R/o. Tahasil Road, Abhinao Colony, Achalpur, Tq. Achalpur, Dist. Amravati
4. **Swati Pratikrao Chinchamalatpure,**
   Age 36 yrs., Occu.- Household
   R/o. Near Hanuman Mandir Chowk, Khed, Tq.Morshi, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत मोहन पुंडलिकराव अनासाने हे दि.०८.०८.२००९** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार लता व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार लता व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** ०६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २८८९/२०२५
श्रीमती अर्पणा अधिक एक विरुध्द गैरअर्जदार शशिकला
पुढील तारीख २७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Arpana Arvind Nanwatkar , **Age 47 yrs., Occu.- Housewife**
   **R/o. Mahtmafule Colony Yashoda By pass Amravati, Tq. & Dist. Amravati (Mob.No.-7397877707)**
2. Ved Arvind Nanwatkar , **Age 20 yrs., Occu.- Education**
   **R/o. Mahtmafule Colony Yashoda By pass Amravati, Tq. & Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- 1. Smt. Shashikala Nanwatkar
**Age 79 yrs., Occu.- Retired**
**R/o. Kishor Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
**Mob. No. 9307634958**

**सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,** मयत अरविंद चरणदास नानवटकर हे दि.१२.११.२०२५ **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार अर्पणा अधिक एक विरुध्द निरंक **यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू** मयत **यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** [illegible] **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा **श्रीमती अर्पणा अधिक एक विरुध्द गैरअर्जदार शशिकला** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** २९.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
सहायक अधीक्षक,
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ३ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## सर्व विभागांनी किन्हीराजा या दत्तकगावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध रहावे -जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**मनरेगा अंतर्गत किन्हीराजा दत्तकगावामध्ये केवळ रोजगारनिर्मिती नव्हे, तर जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि पर्यटन विकास यांचा समन्वय साधण्याचा आमचा प्रयत्न आहे. गावातील तलाव, जंगल क्षेत्र, अभयारण्य परिसर आणि समृद्धी महामार्गालगतची भौगोलिक क्षमता लक्षात घेता येथे शाश्वत विकासाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करून संपूर्ण गावाचा नियोजनबद्ध व दीर्घकालीन विकास आराखडा तयार करावा, जेणेकरून किन्हीराजा हे आदर्श दत्तकगाव म्हणून विकसित होईल.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**



मनरेगा अंतर्गत दत्तकग्राम किन्हीराजा येथे जिल्हाधिकाऱ्यांची व्यापक शिवार फेरी

जिल्ह्यातील विकसित किन्हीराजा दत्तकगाव प्रकल्पाअंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रस्तावित विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी किन्हीराजा परिसरात सविस्तर शिवार फेरी केली. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते.

या शिवार फेरीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजीत वायकोस, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी तथा गटविकास अधिकारी आकाश वर्मा, तहसीलदार दीपक पुंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, सहाय्यक गटविकास अधिकारी रमेश कंकाळ, महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण समन्वयक निलेश घुगे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या फेरीत ग्रामविकासासोबतच पर्यटन, पर्यावरण संवर्धन व रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या संकल्पनांवर भर देण्यात आला.जिल्हाधिकाऱ्यांनी फेरीदरम्यान मोठा तलाव, पौराणिक महत्त्व असलेला छोटा तलाव, डॉ. सलीम अली कॅम्प – काटे पूर्णा अभयारण्य, सोनल धरण परिसरातील ई-क्लास जमीन तसेच काटेपूर्णा इंटरचेंज – समृद्धी महामार्ग आदी ठिकाणांची पाहणी केली. या ठिकाणी उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत व नियोजनबद्ध वापर कसा करता येईल, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

पर्यटन विकासाच्या दृष्टीने जंगल सफारी, फळबाग लागवड, रेशीम उद्योग विकास, शेततळे निर्मिती, रोपवे, बांबुवन विकास, तलावांचे सौंदर्यीकरण, तसेच समृद्धी महामार्गावरील प्रवाशांसाठी माहिती फलक व दिशादर्शक सुविधा उभारण्याबाबत विविध संकल्पना मांडण्यात आल्या. यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन गावाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

किन्हीराजा गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एकात्मिक व दूरदृष्टीपूर्ण नियोजन आवश्यक असून, त्यासाठी संपूर्ण गावाचा विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादनही जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी केले. या अनुषंगाने सर्व विभागांनी समन्वयाने काम करून संपूर्ण नियोजनाचा प्रारूप आराखडा लवकरात लवकर तयार करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. मनरेगा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कामांमुळे जलसंधारण, पर्यावरण संरक्षण, पर्यटन विकास व रोजगारनिर्मिती या सर्व बाबी एकाच वेळी साध्य होतील, तसेच विकसित किन्हीराजा हे दत्तकगाव प्रकल्पातील आदर्श गाव म्हणून उभे राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## नगर परिषद कारंजा भाजप गटनेतेपदी शालिनी ठाकरे यांची निवड



■ प्रतिनिधी | कारंजा ■

नगर परिषद कारंजा (लाड) येथील भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांच्या बैठकीत भाजप गटनेतेपदी शालिनी प्रशांत ठाकरे यांची एकमताने निवड करण्यात आली. ही बैठक आमदार सईताई डहाके यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. तसेच भाजपा वाशीम जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमजी चितलांगे आणि महामंत्री राजीव पाटील काळे, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली.



या बैठकीस नगर परिषदेमधील भाजपचे सर्व नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्षसंघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने व नगरपरिषदेमध्ये विकासाभिमुख भूमिका प्रभावीपणे मांडण्यासाठी अनुभवी व सर्वसमावेशक नेतृत्वाची गरज असल्याने शालिनी ठाकरे यांच्या नावावर सर्वानुमते शिक्कामोर्तब करण्यात आले. शालिनी प्रशांत ठाकरे यांनी यापूर्वी पंचायत समिती सदस्य म्हणून प्रभावी कामकाज केले आहे. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत त्यांनी सर्वाधिक मताधिक्याने विजय संपादन केला असून, गेल्या वीस वर्षांपासून स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाशी एकनिष्ठ राहून सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय अनुभवाची व संघटनात्मक बांधिलकीची दखल घेत त्यांची भाजप गटनेतेपदी निवड करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

निवडीनंतर बोलताना आमदार सईताई डहाके यांनी शालिनी ठाकरे यांचे अभिनंदन करत नगर परिषदेमध्ये जनहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडून विकासकामांना गती देण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच भाजपा नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली कारंजा (लाड) शहराच्या सर्वांगीण विकासासाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले.या निवडीमुळे नगर परिषद कारंजा (लाड) मध्ये भाजपचे नेतृत्व अधिक सक्षम झाले असून आगामी काळात शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांचा पदग्रहण सोहळा आज

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

स्थानिक नगरपंचायतचे नव्याने निवडून आलेले नगराध्यक्ष चा पदग्रहण समारंभाचा कार्यक्रम आज दि ३ जानेवारी रोजी नगर पंचायत कार्यालयात पार पडणार आहे. या कार्यक्रमाला विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला शहरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन रामदास काटेकर व त्यांच्या मित्र मंडळी तर्फे करण्यात आलेले आहे.



नवीन नगराध्यक्ष व नगरसेवक पदभार स्वीकारणार असून शहराच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांवर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या पदग्रहण समारंभाला विविध मान्यवर उपस्थित राहणार असून शांततेत व उत्साहात हा कार्यक्रम पार पडणार आहे. नुकत्याच झालेल्या नगरपंचायत निवडणुकीमध्ये शिवसेनेचे नगराध्यक्ष म्हणून ओमप्रकाश खुरसडे हे विजयी झाले होते त्यांचे आठ सदस्य नगरसेवक निवडून आले असून काँग्रेसचे सहा सदस्य निवडून आलेले आहेत तर भारतीय जनता पार्टीचे तीन सदस्य निवडून आलेले आहेत अजून युतीची अधिकृत घोषणा न झाल्याने सत्तेमध्ये कोणते दोन पक्ष बसणार याची नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. या पदग्रहण सोहळ्याला शहरातील मान्यवरांनी नागरिकांनी तसेच कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन रामदास काटेकर यांनी केले आहे.

## स्पदभरतीला मुदतवाढ

**अकोला :** सैनिक कल्याण विभागाच्या लिपीक टंकलेखक पदांच्या भरतीसाठी ९ जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. यापूर्वी ऑनलाईन अर्जासाठीच्या वेबलिंकबाबत तांत्रिक त्रुटी आल्याने मुदतवाढ देण्यात आली आहे.

# नागरिकांसाठी 'अकोला कॉप कनेक्ट' व्हॉट्सॲप चॅटबॉटचा शुभारंभ

## अकोला पोलीस दलाचा 'स्मार्ट पोलिसिंग'कडे पाऊल

■ प्रतिनिधी | अकोला ■

नागरिक आणि पोलीस दलातील संवाद अधिक जलद, सुलभ व पारदर्शक व्हावा, या उद्देशाने अकोला जिल्हा पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत 'व्र्दर्ृ णदज्ण्दहहाू' या व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवेचा शुभारंभ केला. महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२६ चे औचित्य साधून शुक्रवार, २ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या शुभहस्ते या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत 'स्मार्ट पोलिसिंग' संकल्पनेला गती देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित (ँद) हा व्हॉट्सॲप चॅटबॉट नागरिकांच्या सेवेत दाखल करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, मनपा आयुक्त




सुनील लहाने, डीएफओ सुमन सोळंके, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधीक्षक ईशानी आनंद यांच्यासह पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

अकोला पोलीस दलाने नागरिकांच्या सोयीसाठी ९४०३५५३११७ हा अधिकृत व्हॉट्सॲप चॅटबॉट क्रमांक सुरू केला असून, या एकाच क्रमांकावरून पोलिसांच्या विविध सेवांची माहिती घरबसल्या उपलब्ध होणार आहे.

**एका क्लिकवर १७ सेवा**

या चॅटबॉटद्वारे जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांची माहिती, संपर्क क्रमांक, प्रभारी अधिकाऱ्यांची नावे, ई-मेल, सोशल मीडिया अकाउंट्स तसेच गुगल लोकेशन मिळणार आहे. याशिवाय व्हॉट्सॲपवरून ऑनलाईन तक्रार नोंदणी व तक्रारीची सद्यस्थिती तपासण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

ई-चालान भरणे, पासपोर्ट व चारित्र्य पडताळणीसाठी मार्गदर्शन, विविध कार्यक्रमांची माहिती अशा एकूण १७ प्रकारच्या सेवा या चॅटबॉटमध्ये समाविष्ट आहेत.

**मराठी-इंग्रजीत २४ तास सेवा**

'अकोला कॉप कनेक्ट' हा चॅटबॉट मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध असून, २४ तास नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत राहणार आहे. वापरासाठी नागरिकांनी संबंधित क्रमांक सेव्ह करून 'हाय' किंवा 'नमस्कार' असा संदेश पाठवल्यानंतर भाषा व सेवा निवडण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

**विद्यार्थ्यांचे योगदान उल्लेखनीय**

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल जुमळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीषा तायडे, सायबर पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अकोला येथील संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी या चॅटबॉटच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले.

## अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

### महसूल अधिकाऱ्यांची संयुक्त धडक कारवाई



**अकोट :** अवैध रेती वाहतुकीविरोधात महसूल विभागाने धडक कारवाई करत ट्रॅक्टर जप्त केल्याची घटना ३१ डिसेंबर रोजी घडली. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला करण्यात आलेल्या या कारवाईमुळे अवैध रेती तस्करांना चांगलीच चपराक बसली आहे. अकोट तालुक्यात अवैधरीत्या रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर (क्र. श्प २७ॅ ४०४६) कोणतीही अधिकृत परवानगी न घेता रेतीची वाहतूक करत असल्याचे निदर्शनास येताच महसूल पथकाने तात्काळ कारवाई करत सदर ट्रॅक्टर जप्त केला.

ही कारवाई नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नरेंद्र सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्या समवेत मंडळ अधिकारी गणेश भारती, ग्राम महसूल अधिकारी गोपाल वानरे (अकोट भाग क्र. १ व २) तसेच रितेश मेंढे (मूळ मोहाळा) यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. या प्रकरणी पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महसूल विभागाकडून देण्यात आली आहे.

## अंतिम पैसेवारी जाहीर

**अकोला :** जिल्ह्यात एकूण १ हजार १२ गावांपैकी ९९० गावांची पैसेवारी काढण्यात आली आहे. या गावांची पैसेवारी ५० पेक्षा कमी (४८ पैसे) अशी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबत पत्र जारी केले.


### जाहीरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार श्री संजिव नारायण मनवर रा नांदखेडा ता मंगरुळपीर जि वाशिम यांचा अर्जान्वये सुरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे नांदखेडा येथील सर्वे क्र/गट क्र ३९ मधील एकुण क्षेत्र ७.४१ आर पैकि हिसा १.२१ आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये साधे कुळ नारायण सोन्या प्रमाणे या नावाचे कुळ दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप / हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून ( कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून ) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक - १४/१०/२०२५

शिक्का

**स्वा**
**तहसिलदार,**
**मंगरुळपीर**

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २००६/२०२५ — प्रोसेस नं.१८९६५/२०२५
चौ.ता. ०७/०२/२०२६ — दिनांक : १८/११/२०२५

**अर्जदार :** १. नलिनी रामराव देशमुख २. अर्चना कुमार देशमुख लग्नानंतरचे नाव उर्फ अर्चना रामराव देशमुख लग्नाआधीचे नाव रा. बी-ईएम-१०१, डी-१, पांढर, लोकमान्य टिळक वार्ड, नेपानगर, बुऱ्हानपुर,मध्यप्रदेश ४५०२२१ ३. अतुल रामराव देशमुख अर्जदार क्र. १ व ३ रा. साउथ गल्ली नं. २, सिद्धेश्वर मंदिर जवळ, ऑटोस्माईल गॅरेजच्या मागे, शास्त्री नगर, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामराव कृष्णराव देशमुख
**पत्ता :-** रा. साउथ गल्ली नं. २. सिद्धेश्वर मंदिर जवळ, ऑटोस्माईल गॅरेजच्या मागे, शास्त्री नगर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामराव कृष्णराव देशमुख यांचे दि. ०३/१०/२०२५ रोजी साउथ गल्ली नं. २, सिद्धेश्वर मंदिर जवळ, ऑटोस्माईल गॅरेजच्या मागे, शास्त्री नगर, अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी.अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३१९/२०२५ — प्रोसेस नं.२११९१/२०२५
चौ.ता. १०/०२/२०२६ — दिनांक : ३१/१२/२०२५

**अर्जदार :** १. सुरेखा सुनिल मोरे २. भावेश सुनिल मोरे ३. ओम सुनिल मोरे ४. अनुसया रमेश मोरे सर्व रा. धनगरपुरा, बोरगांव, बोरगांव मंजू, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुनिल रमेशराव मोरे
**पत्ता :-** रा. धनगरपुरा, बोरगांव, बोरगांव मंजू, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुनिल रमेशराव मोरे यांचे दि. ३१/१०/२०१७ रोजी बोरगांव मंजू, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३३८/२०२५ — प्रोसेस नं.२११९७/२०२५
चौ.ता. १६/०२/२०२६ — दिनांक : ३१/१२/२०२५

**अर्जदार :** १. सुनंदा प्रल्हाद तायडे २. सुनिता वासुदेव वावकार रा. मु. पो. चांदुर, ता. जि. अकोला. ३. कल्पना राजकुमार गाडगे रा. वाशिम रोड, पातूर, ता. पातूर, जि. अकोला. ४. सुलभा गोपाल निमकर्दे रा. अंबाझरी, नागपूर, ता. जि. नागपूर ५. संतोष प्रल्हादराव तायडे ६. निलेश प्रल्हाद तायडे क्र. १, ५ व ६ रा. मंगरूळपीर रोड, खडकी, अकोला. ता. जि. अकोला. ७. छाया किशोर खडके रा. मु. पो. सस्ती, ता. पातूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. प्रल्हाद सखाराम तायडे २. देवकाबाई प्रल्हाद तायडे
**पत्ता :-** रा. मंगरूळपीर रोड, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रल्हाद सखाराम तायडे यांचे दि. १९/१०/२०२० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत देवकाबाई प्रल्हाद तायडे यांचे दि. १६/०१/२००९ रोजी कान्हेरी जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६ / ०२ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३३९/२०२५ — प्रोसेस नं.२१०१६/२०२५
चौ.ता. ०४/०२/२०२६ — दिनांक : २४/१२/२०२५

**अर्जदार :** १. विलास नामदेव खंडारे २. उमेश नामदेव खंडारे दोघेही रा. मु. पो. माझोड, ता. जि. अकोला. ३. सुनंदा प्रल्हाद सदार रा. डुप्लेक्स नं. २०, विंग नं ५ यमुना नगर, मलकापुर, अकोला. ता. जि. अकोला. ४. पुष्पा प्रकाश वाकोडे रा. दगडपारवा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. ५. महानंदा चंद्रमणी हिवराळे रा. एरंडा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. नामदेव जामाजी खंडारे २. राधाबाई नामदेव खंडारे
**पत्ता :-** रा. मु. पो. माझोड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नामदेव जामाजी खंडारे यांचे दि. १७/१०/२०२५ रोजी व तसेच मयत राधाबाई नामदेव खंडारे यांचे दि. ०५/०९/२०२१ रोजी मु. पो. माझोड, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०२ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/१२/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०७१/२०२५ — प्रोसेस नं.०३/२०२६
चौ.ता. ०२/०२/२०२६ — दिनांक : ०१/०१/२०२६

**अर्जदार :** १. नजराना परवीन सय्यद समीर २. सय्यद अमीर सय्यद समीर ३. आयत फातेमा सय्यद समीर ४. बिल्किस खातुन सय्यद अय्युब सर्व रा. कल्याण वाडी, सोनटक्के प्लॉट, ख्वाजा नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सय्यद समीर सय्यद अय्युब
**पत्ता :-** रा. कल्याण वाडी, सोनटक्के प्लॉट, ख्वाजा नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सय्यद समीर सय्यद अय्युब यांचे दि. २९/०८/२०२५ रोजी सोनटक्के प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३०१/२०२५ — प्रोसेस नं.२०९३७/२०२५
चौ.ता. ०२/०२/२०२६ — दिनांक : २३/१२/२०२५

**अर्जदार :** १. विष्णुप्रसाद मोहनलाल तिवारी २. स्वीटी विष्णुप्रसाद तिवारी ३. विवेक विष्णुप्रसाद तिवारी सर्व रा. खोलेश्वर मंदिराजवळ, खोलेश्वर अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत :चंदा विष्णुप्रसाद तिवारी
**पत्ता :-** रा.खोलेश्वर मंदिराजवळ, खोलेश्वर अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंदा विष्णुप्रसाद तिवारी यांचे दि. २०/११/२०२५ रोजी अकोला निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३९ ■ शनिवार, ३ जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## समृद्धी महामार्गावरील हिट अँड रन प्रकरणाचा उलगडा; १३०० वाहनांची तपासणी करून फरार ट्रेलर चालक अटकेत

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावरील वर्धा रोडवरील येळाकेळी येथील पेट्रोल पंपाजवळ घडलेल्या भीषण अपघातातील हिट अँड रन प्रकरणाचा अखेर उलगडा करण्यात वर्धा पोलिसांना यश आले आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व स्पष्ट सीसीटीव्ही फुटेज नसतानाही तांत्रिक तपास आणि अथक प्रयत्नांच्या जोरावर पोलिसांनी १३०० वाहनांची तपासणी करून फरार ट्रेलर चालकाला अटक केली.



दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे सुमारे २.३० वाजताच्या सुमारास आयशर ट्रक (क्र. एमएच १२ पीक्यू १२२०) ला एका अज्ञात कंटेनर/ट्रेलरने जोरदार धडक दिली. या अपघातात आयशरचा चालक लखन चंद्रकांत काळुंके (वय २२, रा. आंबेडकर नगर, साईबाबा मंदिराजवळ, मार्केट यार्ड, पुणे) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा सहकारी इस्माईल इक्बाल सैदुवाले (वय २५) गंभीर जखमी झाला. अपघातानंतर संबंधित ट्रेलर चालक घटनास्थळावरून फरार झाला होता.

या प्रकरणी सांवगी मेघे पोलीस ठाण्यात फिर्यादीच्या तक्रारीवरून विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसणे आणि घटनास्थळाच्या आसपास स्पष्ट सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

तरीही पोलिसांनी तांत्रिक पद्धतींचा वापर करत समृद्धी महामार्गावरील प्रवास नोंदी, वाहनांच्या हालचाली आणि इतर उपलब्ध माहितीच्या आधारे सुमारे १३०० वाहनांची बारकाईने तपासणी केली. अखेर अपघात करणारा ट्रेलर (क्र. एमएच ४० बीजी ८८६७) निष्पन्न करण्यात आला. सदर ट्रेलरचा चालक शामकिशोर मुरलीप्रसाद पांडे (वय ४२, रा. देवरी, ता. लालगंज, जि. मिर्झापूर, उत्तर प्रदेश; सध्या रा. महालगाव, टाटा यार्ड, भंडारा रोड, नागपूर) यास दि. १ जानेवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशीव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पोउपनि संदीप सावले, पोउपनि सचिन कानडे, पोशी हर्षल मुन, पोशी अमोल जाधव तसेच मपोशी अंजली गाडेकर यांच्या पथकाने केली.

## सेलूत जेसीबीचा धडाका; 'बड्यां'समोर प्रशासनाची मान तुकवली

### -अतिक्रमण हटाव मोहीम अर्ध्यावरच थांबली; दबावापुढे कायद्याची हार

**-लहानांवर कारवाई, मोठ्यांना मोकळे रान : नागरिकांचा संताप अनावर**





**सेलू जनमाध्यम :** सेलू शहरातील रस्त्यांवर वर्षानुवर्षे माजलेल्या अतिक्रमणाविरोधात शुक्रवारी नगरपंचायत प्रशासनाने जेसीबीचा धडाका लावत अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली खरी; मात्र ही मोहीम काही तासांतच 'बड्यां'च्या दबावाखाली गारद झाल्याचे चित्र समोर आले. मुख्याधिकारी अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली कारवाई प्रभावशाली व्यापाऱ्यांच्या अतिक्रमणाजवळ पोहोचताच अचानक थांबविण्यात आल्याने कायदा सर्वांसाठी समान आहे का असा खळबळजनक प्रश्न उपस्थित झाला आहे.

**शहर अतिक्रमणाच्या मगरमिठीत**

रेहकी चौक, बसस्थानक चौक, वडगाव रोड, मेडिकल चौक ते यशवंत चौक या शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांवर व्यापाऱ्यांनी दुकानाबाहेर शेड, फूटपाथ, साहित्य टाकून रस्ते अक्षरशः गिळंकृत केले आहेत. परिणामी वाहतूक कोंडी, किरकोळ अपघात, पादचाऱ्यांची गैरसोय आणि आपत्कालीन वाहनांना मार्ग मिळण्यात अडचणी नित्याच्या झाल्या आहे.

वाढते अतिक्रमण आणि संभाव्य दुर्घटना लक्षात घेऊन नगरपंचायतीने दहा दिवसांपूर्वी अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या होत्या. स्वेच्छेने अतिक्रमण काढण्याचे आदेश देण्यात आले, मात्र अनेक व्यापाऱ्यांनी प्रशासनाच्या सूचनांना केराची टोपली दाखवली. अखेर कारवाई हा एकमेव मार्ग उरल्याने शुक्रवारी जेसीबी मैदानात उतरली.

**कारवाईत दुजाभाव; 'बड्यांना' अभयदान?**-सुरुवातीला काही लहान व्यावसायिकांचे अतिक्रमण हटविण्यात आले. मात्र काही प्रभावशाली व्यापाऱ्यांच्या दुकानांसमोर पोहोचताच जेसीबी थांबली, अधिकारी नरमले आणि कारवाई अचानक गुंडाळण्यात आली. यामुळे प्रशासन दबावाखाली झुकल्याचा थेट आरोप होत असून, लहानांवर हातोडा, मोठ्यांना मोकळे रान अशी अवस्था निर्माण झाली आहे.

**विरोध, गदारोळ आणि नागरिकांचा संताप**-कारवाई दरम्यान काही ठिकाणी व्यापाऱ्यांनी तीव्र विरोध केला, तर नागरिकांनी प्रशासनाच्या अर्धवट भूमिकेवर संताप व्यक्त केला. आज अतिक्रमण हटवले नाही तर उद्या अपघाताची जबाबदारी कोणाची असा प्रश्न उपस्थित होत आहे. अतिक्रमण हटाव मोहीम ही केवळ दिखावा न राहता सर्वांवर समानपणे राबवावी, अन्यथा जनआंदोलन उभे राहील, असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे. एकीकडे 'शहर सुंदर आणि सुरक्षित करण्याच्या घोषणा, तर दुसरीकडे दबावाखाली थांबलेली कारवाई या दुहेरी भूमिकेमुळे नगरपंचायत प्रशासनाची विश्वासार्हता पणाला लागली आहे. येत्या काळात पुन्हा धडक कारवाई होणार की 'बड्यां'पुढे कायदा कायमचा हरला, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## परिसर पिंजून काढून शोधमोहीम; ठोस माहिती अद्याप नाही

### -पीएमचा प्राथमिक अहवाल सादर; कारणांवर गूढ कायम

**-ठोस सुरागासाठी वनविभागाची धडाकेबाज सर्च मोहीम**

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील सेलू-मुरपाड परिसरातील कॅनलमध्ये ३१ डिसेंबर रोजी सुमारे ३ ते ४ वर्ष वयोगटातील वाघिणीचा संशयास्पद मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण वनविभाग हादरून गेला आहे. वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर मानल्या जाणाऱ्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे.



घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तत्काळ पंचनामा करण्यात आला. त्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या त्रि-सदस्यीय तज्ज्ञ चमूने वाघिणीचे शवविच्छेदन केले. या तज्ज्ञांनी आपला प्राथमिक पीएम अहवाल वनविभागाकडे सादर केला असून, अहवालातील निरीक्षणे अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे वाघिणीचा मृत्यू अपघाती, आजारपणामुळे की मानवी हस्तक्षेपातून झाला, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

वनविभागाने केवळ मृत्यूचे कारणच नव्हे, तर वाघिणीची ओळख पटविण्यावरही लक्ष केंद्रित केले आहे. ती जिल्ह्यातीलच होती की बाहेरून भटकत आली होती, याचा शोध सुरू आहे. यासाठी जंगलालगतचे पट्टे, कालव्याचे दोन्ही काठ, शेतशिवार तसेच वन्यजीवांच्या हालचालींचे संभाव्य मार्ग तपासण्यात येत आहेत. १ जानेवारी रोजी वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चार स्वतंत्र पथकांच्या माध्यमातून व्यापक सर्च मोहीम राबविली. संपूर्ण परिसर अक्षरशः पिंजून काढण्यात आला. मात्र सायंकाळपर्यंत कुठलाही ठोस पुरावा हाती लागला नाही. त्यामुळे तपासाची दिशा अधिक कठीण झाली आहे. शुक्रवार, २ जानेवारी रोजीही शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली. नव्या जोमाने तपास सुरू ठेवत सायंकाळी अंधार पडेपर्यंत पथके कार्यरत होती. तरीही संशय दूर करणारा ठोस सुराग मिळालेला नसल्याची माहिती आहे. दरम्यान, प्राथमिक पीएम अहवाल सादर झाल्याची खात्रीलायक माहिती समोर आली असून अंतिम निष्कर्षासाठी पुढील तांत्रिक तपास आणि नमुन्यांचे विश्लेषण सुरू आहे.

वाघिणीच्या मृत्यूमागील सत्य काय, हे लवकरच उघड होईल, असा दावा वनविभागाकडून केला जात आहे. मात्र तोपर्यंत या संशयास्पद घटनेने वनविभागाची झोप उडवली असून, जंगलातील सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ना पैसा., ना सत्ता...तरीही माणुसकी श्रीमंत

### कचरा वेचून उपाशी पोटं भरवणारी आजी चर्चेत

### कचऱ्यातून करुणेचा घास देणाऱ्या सुभद्राबाईंचा समाजाला थरकाप उडवणारा आदर्श

**सेलू अभय बेदमोहता :** स्वतःच्या पोटाची भ्रांत असताना दुसऱ्याची भूक ओळखणं म्हणजे माणुसकीचा कळस आजच्या स्वार्थी, संवेदनाहीन समाजात जिथे नात्यांनाही किंमत उरलेली नाही, तिथे सुरगावच्या ८० वर्षीय सुभद्राबाई कांबळे या वृद्धेने कचऱ्यातून उचललेली माणुसकी समाजाच्या तोंडावर जोरदार चपराक मारते आहे.

सुरगावसारख्या छोट्याशा खेडेगावात राहणाऱ्या सुभद्राबाई रोज पहाटे उठून सेलू शहराकडे तब्बल दहा किलोमीटर पायपीट करतात. अंगात ताकद उरलेली नाही, पाय थकतात, डोळे पाणावतात; पण तरीही त्या कचरा वेचण्याचे काम करतात. दिवसभर उन्हातान्हात, धुळीत-कचऱ्यात राबून मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशातून त्या केवळ स्वतःचं पोट भरत नाहीत, तर दुसऱ्याच्या भुकेवरही फुंकर घालतात.

गेल्या एक वर्षापासून केळझर येथे धम्म प्रशिक्षणासाठी आलेल्या श्रामणेरांना तसेच परिसरातील गोरगरीब, उपाशी मुलांना सुभद्राबाई



अधूनमधून अन्नदान करतात. कोणताही गाजावाजा नाही, कुठलाही बॅनर नाही, कुठलीही प्रसिद्धी नाही. हातात काठी, अंगावर फाटकी साडी, पण मनात अफाट करुणा, हाच त्यांच्या जगण्याचा खरा ठेवा आहे.

आज समाजात लाखो रुपये असणारे लोक दारात आलेल्यालाही ओळख न देता दार लावतात. पण स्वतःकडे काहीच नसताना दुसऱ्याला मायेचा घास देणारी सुभद्राबाई ही व्यवस्था, समाज आणि माणुसकीवर प्रश्नचिन्ह उभं करतात. माणूस मोठा पैशाने नसतो, तर मनाने मोठा असतो हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं आहे. केळझर येथील धम्म प्रशिक्षणार्थी श्रामणेर, स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये सुभद्राबाईंच्या या निःस्वार्थ सेवेची मोठी चर्चा आहे. अनेकजण त्यांच्या चरणी नतमस्तक होत आहेत. उपाशी माणसाला दिलेला एक घास किती मोलाचा असतो, हे सुभद्राबाईंच्या कृतीतून पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. आजच्या काळात जिथे माणूस माणसापासून दूर जातोय, तिथे सुभद्राबाई कांबळे या वृद्धेने समाजाला माणुसकीची आठवण करून दिली आहे. गरिबीतही सेवा, त्याग आणि करुणेचा मार्ग स्वीकारणाऱ्या सुभद्राबाई खऱ्या अर्थाने समाजाच्या जिवंत प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांच्या या कार्याला शासन आणि समाजाने हात द्यावा, हीच आज काळाची गरज आहे.

## माहेश्वरी मंडळ ट्रस्टतर्फे ४ जानेवारीला भव्य निःशुल्क नेत्ररोग शिबीर

**वर्धा जनमाध्यम :** समाजातील गरजू व दुर्बल घटकांना उत्तम आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने माहेश्वरी मंडळ ट्रस्ट, वर्धा यांच्या वतीने २४ वे भव्य निःशुल्क नेत्ररोग निदान व शल्यक्रिया शिबीर रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी माहेश्वरी भवन, वर्धा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार असून यावेळी ट्रस्टच्या दिनदर्शिकेचे विमोचनही करण्यात येणार आहे.

या शिबिरात सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत नेत्रतपासणी, मोतीबिंदू तपासणी, आवश्यक औषधोपचार तसेच शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांची निवड केली जाणार आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत हे शिबीर पार पडणार असून, अनेक रुग्णांना याचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. उल्हास जाजू (एम.डी. मेडिसिन) उपस्थित राहणार आहेत. तसेच विशेष आमंत्रित म्हणून महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विशाल धिरन व बुलडाणा अर्बन क्रेडिट सोसायटीचे रिजनल मॅनेजर राजेश बगाडे यांची उपस्थिती लाभणार आहे. माहेश्वरी मंडळ ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य, शिक्षण व सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबवत आहे. नेत्ररोग शिबिराच्या माध्यमातून आतापर्यंत शेकडो रुग्णांची दृष्टी उजळली असून, अंधत्व निवारणासाठी ट्रस्टचे कार्य उल्लेखनीय ठरत आहे.

याच सामाजिक उपक्रमांच्या पुढील टप्प्यात २६ जानेवारी २०२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून, जीते जी रक्तदानष्ठ मरणोपरांत नेत्रदानष्ठ हा संदेश समाजात पोहोचवण्याचा संकल्प ट्रस्टने केला आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष विजय राठी व राहुल राठी, सचिव धर्मेंद्र मुंधडा व आकाश मुंदडा तसेच प्रकल्प संयोजक राजेंद्र राठी, अनिल केला, संजय मोहता व लोकेश कुलधरीया परिश्रम घेत आहेत. नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा व सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नवशक्ती अंबिका भक्तीधाम येथे खा.अमर काळेंची भेट

**देवळी (बोपापूर) जनमाध्यम :** नवशक्ती अंबिका भक्तीधाम संस्थान, श्रीक्षेत्र बोपापूर (वाणी), ता. देवळी येथे आयोजित शतचंडी महायज्ञाला भक्तीमय वातावरणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दिनांक २८ डिसेंबर २०२५ ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या महायज्ञास अमर काळे यांनी २ जानेवारी २०२६ रोजी भेट दिली.



खासदार अमर काळे यांनी सामूहिक आरतीत सहभाग नोंदवत देवी अंबिकेचे दर्शन घेतले. आरतीनंतर मंदिर परिसरात फेरफटका मारून त्यांनी भाविकांशी संवाद साधला. या वेळी संस्थानच्या वतीने अध्यक्ष मनोहर तारणकर यांच्या हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर प. पू. महंत आई अंबिका भारती यांनी प्रसाद व श्रीफळ देऊन त्यांना आशीर्वाद दिला. भक्तीमार्गावर उपस्थित भाविकांना संबोधित करताना खासदार अमर काळे यांनी धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात, असे मत व्यक्त केले. त्यांनी नवशक्ती पीठाचे दर्शन घेतले तसेच उपस्थित भक्तांसोबत महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संस्थानचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## शिवणफळमध्ये वाघाचा धुडगूस

### -शेतकऱ्याच्या डोळ्यादेखत बैल फस्त

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील शिवणफळ परिसरात पट्टेदार वाघाच्या मुक्त संचारामुळे प्रचंड दहशत पसरली असून शुक्रवारी (दि. ३) सायंकाळी घडलेल्या घटनेने शेतकरी अक्षरशः हादरून गेले आहेत. जुडपात दबा धरून बसलेल्या वाघाने शेतकऱ्याच्या डोळ्यादेखत बैलावर झडप घालत काही क्षणांतच त्याचा फडशा पाडला. या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत बैल हा शिवणफळ येथील शेतकरी देवराव नैताम यांच्या मालकीचा होता. बैल शेतीच्या कामासाठी महत्त्वाचा आधार असल्याने या घटनेमुळे नैताम कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. नुकसानभरपाई म्हणून तातडीने शासकीय मदत देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याच गावातील शेतकरी कृष्णा उमाटे हे आपल्या शेतात ओलिताचे काम करीत असताना शेजारी बांधलेला बैल अचानक जोरजोरात हंबरडा फोडू लागला. आवाज ऐकताच काहीतरी अनर्थ घडत असल्याची शंका येऊन त्यांनी पाहणी करण्याचे धाडस केले. मात्र, जुडपात लपून बसलेल्या पट्टेदार वाघाने क्षणाचाही विलंब न करता बैलावर झडप घातली. काही सेकंदांतच बैल ठार झाला. हा संपूर्ण थरार उमाटे यांनी प्रत्यक्ष अनुभवला.

शिवणफळसह समुद्रपूर तालुक्यातील काही भागांत गेल्या काही दिवसांपासून वाघाचा मुक्त संचार वाढल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकरी, मजूर व नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. अनेकांनी रात्रीच्या वेळी शेतात जाणे टाळले असून जनावरेही सुरक्षित ठिकाणी बांधण्यात येत आहेत.

या घटनेनंतर वनविभाग ॲक्शन मोडवर आला आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनकर्मचाऱ्यांची गस्त वाढविण्यात आली असून नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वाघाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी संवेदनशील भागात ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

दरम्यान, वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, बाधित शेतकऱ्यास तातडीने नुकसानभरपाई द्यावी आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व शेतकरी संघटनांकडून होत आहे.

## राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी महाराष्ट्राला ६,८९१ कोटींची मंजुरी

### खासदार अमर काळेंच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई / वर्धा जनमाध्यम :** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी ६,८९०.८७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी ऑक्टोबर २०२५ पर्यंत १,२७४.९३ कोटी रुपये वितरित करण्यात आल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी दिली आहे. याबाबत अमर काळे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. महाराष्ट्रात केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कुटुंब कल्याण कार्यक्रम, जननी-शिशू सुरक्षा योजना, मातृ सुरक्षा योजना, कुपोषित बालकांसाठी पोषण आहार यांसारख्या महत्त्वाच्या योजना राबविल्या जातात. या योजनांतर्गत कार्यरत सुमारे ३३ हजार डॉक्टर, परिचारिका व कर्मचारी यांचे वेतन केंद्राच्या सहाय्य निधीतून दिले जाते. मात्र निधी वेळेवर न मिळाल्याने अनेक कर्मचाऱ्यांचे ५ ते ६ महिन्यांचे वेतन रखडले होते व आरोग्य योजना प्रभावहीन ठरत होत्या.

ही गंभीर बाब आरोग्य क्षेत्रातील संघटनांनी खासदार अमर काळे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी जगतप्रसाद नड्डा यांना पत्र देऊन प्रत्यक्ष भेटीत राज्यातील परिस्थिती मांडली. या पत्राची तात्काळ दखल घेत निधी वितरित केल्याबद्दल खासदार अमर काळे यांनी केंद्र शासनाचे आभार मानले.

## निसर्गाच्या दणक्यात खरीप कोसळला

### -जिल्ह्याची अंतिम पैसेवारी अवघी ४७ पैसे; शेतकऱ्यांच्या पदरात निराशाच

**वर्धा जनमाध्यम :** लहरी पाऊस, अतिवृष्टी, पुरस्थिती आणि रोगराईच्या दुहेरी संकटाने यंदाचा खरीप हंगाम जिल्ह्यात अक्षरशः उद्ध्वस्त झाला असून जिल्ह्यातील खरीप पिकांची अंतिम पैसेवारी केवळ ४७ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी या अंतिम पैसेवारीला अधिकृत मंजुरी दिल्याने शेतकरी वर्गाच्या चिंतेत आणखी भर पडली आहे.

शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांसाठी हा आकडा धक्कादायक ठरला आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मोठा वर्ग शेती व शेतीपूरक व्यवसायावरच उदरनिर्वाह करीत असल्याने कमी पैसेवारीचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक कंबरड्यावर होणार आहे.

**३.९३ लाख हेक्टरवर पेरणी, तरीही पदरात तोटा**

जिल्ह्यात एकूण ४ लाख ३४ हजार ४४२ हेक्टर लागवडयोग्य क्षेत्र आहे. त्यापैकी यंदा खरीप हंगामात ३ लाख ९३ हजार ९५८ हेक्टरवर कापूस, सोयाबीन, तूर आदी पिकांची लागवड करण्यात आली होती. मात्र तब्बल ४० हजार ४८४ हेक्टर जमीन पडीक राहिली, ही बाब चिंताजनक आहे.

खरीप हंगामाच्या सुरुवातीला पावसाने शेतकऱ्यांची कसोटी पाहिली. पेरणीसाठी आवश्यक असलेला पाऊस उशिरा मिळाल्याने अनेकांनी जोखमीने पेरण्या केल्या. मात्र पीक वाढीच्या टप्प्यात अचानक झालेल्या अतिवृष्टीने पुरस्थिती निर्माण झाली आणि उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सोयाबीनवर रोगांचा हल्ला, उत्पादन घटले शेंगा भरण्याच्या अवस्थेत असलेल्या सोयाबीन पिकावर यलो मोझॅक आणि चारकोल रॉट या रोगांनी अक्षरशः धडक दिली. परिणामी अनेक भागांत सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले. कापूस व तुरीलाही या नैसर्गिक संकटांचा फटका बसला. एकूणच निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित उत्पन्न आले नाही. या सर्व घटकांची सविस्तर पाहणी, क्षेत्रनिहाय पडताळणी आणि अहवालांच्या आधारेच जिल्हा प्रशासनाने खरीप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर केल्याचे सांगण्यात आले.

**कारंजा तालुक्यात सर्वाधिक पडीक क्षेत्र-** यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील ४० हजार ४८४ हेक्टर जमीन पडीक राहिली.

वर्धा : ७४१ हेक्टर
सेलू : ५,४७४ हेक्टर
देवळी : ३,३७५ हेक्टर
आर्वी : ६,६३१ हेक्टर
आष्टी : १,५९१ हेक्टर
हिंगणघाट : ४,४३४ हेक्टर
समुद्रपूर : ५,१५५ हेक्टर
कारंजा : १३,०८३ हेक्टर (सर्वाधिक)

**५० पैशांचा टप्पाही कोणालाच नाही-** जिल्ह्यातील एकूण १,३८७ गावांपैकी पाण्याखाली गेलेली, अकृषिक किंवा प्रकल्पग्रस्त अशा कारणांमुळे ४८ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही.

उर्वरित १,३३९ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पैसेवारी जाहीर न झालेल्या गावांमध्ये वर्धा (१), सेलू (९), देवळी (२), आर्वी (१४), आष्टी (१८), कारंजा (१) व समुद्रपूर (३) तालुक्यांचा समावेश आहे.

**तालुकानिहाय अंतिम पैसेवारी**

वर्धा : ४५ पैसे
सेलू : ४७ पैसे
देवळी : ४६ पैसे
आर्वी : ४७ पैसे
आष्टी : ४८ पैसे
कारंजा : ४८ पैसे
हिंगणघाट : ४६ पैसे
समुद्रपूर : ४७ पैसे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मुलांनो खूप खूप शिका...मेहनत करा, मोठे व्हा! राज्यपाल


**नाशिक / प्रतिनिधी :** पिंपरखेड, ता. दिंडोरी येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी सकाळच्या नाश्त्याच्यावेळी त्यांनी संवाद साधला. यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डा. प्रवीण गेडाम, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, कश्मिरा संख्ये, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त दिनकर पावरा आदी उपस्थित होते.राज्यपाल देवव्रत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याबरोबर नाश्ता घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थी कोणत्या वर्गात शिक्षण घेत आहे. कुटुंबात सदस्य किती, आईवडील काय करतात, अशी आपुलकीने चौकशी केली. त्यांनी आयुक्त श्रीमती बनसोड यांच्याकडून आश्रमशाळा तेथील शिक्षणाचे माध्यम याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. यावेळी राज्यपाल श्री. देवव्रत यांना विद्यार्थिनीने काढलेले लहानसे चित्र भेट दिले. राज्यपालांसमवेत नाश्ता करतांना विद्यार्थ्यांच्या चेह-यावर आनंद ओसंडून वाहत होता.



अस्वच्छता दूर करणे हेच चांगल्या माणसाचे काम-राज्यपाल आपण रस्त्यावर कचरा टाकून अस्वच्छता करतो. स्वच्छता कर्मचारी अस्वच्छता दूर करतात. अस्वच्छता दूर करणे हेच चांगल्या माणसाचे काम असल्याने प्रत्येकाने गाव स्वच्छ ठेवण्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.पिंपरखेड, ता. दिंडोरी येथे मारुती मंदिर परिसरातआज सकाळी राज्यपाल श्री. देवव्रत यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. राज्यपाल . देवव्रत यांनी मोहिमेत सहभाग घेतांना स्वच्छतेचे महत्व सांगितले. प्रत्येकाने स्वच्छता ठेवून गाव सुंदर ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. राज्यपाल देवव्रत यांनी गावातील स्वच्छता कर्मचा-यांचा सत्कार केला. यावेळी विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.राज्यपालांनी दिला फिटनेसचा मंत्रराज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सकाळी पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसमवेत योगाभ्यास केला. त्यांनी विविध योग प्रात्यक्षिके दाखवितांनाच विद्यार्थ्यांना 'फिटनेसचा डोस, आधा घंटा रोज' असे सांगत तंदुरुस्तीचा मार्ग सांगितला.राज्यपाल देवव्रत यांच्यासमवेत विभागीय आयुक्त डा. प्रवीण गेडाम, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे या योगाभ्यासात सहभागी झाले होते. राज्यपाल देवव्रत यांनी विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे महत्व सांगत त्याचे लाभ सांगितले. ते म्हणाले, नियमितपणे योग केल्याने शरीर तंदुरुस्त आणि लवचिक राहते आणि सोबतच आपले आरोग्यही चांगले राहण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने रोज किमान अर्धा तास योग प्रात्यक्षिके केली पाहिजेत. देवव्रत यांनी विद्यार्थ्यांसमवेत प्राणायाम, अनुलोम विलोम, सेतुबंध, सर्वांगासन, वज्रासन, वक्रसन, मत्स्यासन, सूर्य नमस्कार, शशांकासन, योग मुद्रासन आदी आसने करीत विद्यार्थ्यांना योगासनांचे धडे दिले. ही सर्व आसने केल्याने मन शांत आणि निरोगी राहण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

## इंदूरची घटना प्रशासनासाठी लज्जास्पद : उमा भारती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यप्रदेशच्या इंदूर शहरात दूषित पाण्यामुळे झालेल्या मृत्यूंच्या घटनेवर माजी मुख्यमंत्री व भाजप नेत्या उमा भारती यांनी राज्य सरकारवर तीव्र टीका केली आहे. ही घटना राज्य, सरकार आणि संपूर्ण प्रशासनासाठी लज्जास्पद असल्याचे सांगत दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.इंदूरमध्ये दूषित पाणी पिल्यामुळे आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे २८०० नागरिक आजारी पडले आहेत. गुरुवारी ३३८ नवे रुग्ण आढळून आले, तर ३२ रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. यासंदर्भात ट्विटरवर (एक्स) प्रतिक्रिया देताना उमा भारती म्हणाल्या की, २०२५ च्या अखेरीस घडलेली ही घटना अत्यंत गंभीर असून तिने संपूर्ण व्यवस्था कलंकित केली आहे. देशातील सर्वात स्वच्छ शहराचा मान मिळालेल्या इंदूरमध्ये अस्वच्छता आणि विषारी पाण्यामुळे नागरिकांचे प्राण जाणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी नमूद केले.राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलेली आर्थिक मदत अपुरी असल्याचे सांगत भारती म्हणाल्या, जिंदगीची किंमत २ लाख रुपये नसते. मृतांच्या कुटुंबीयांना आयुष्यभर दु?ख सहन करावे लागते. या पापाचे घोर प्रायश्चित्त करणे आवश्यक आहे. पीडितांची माफी मागावी लागेल आणि खालपासून वरपर्यंत जे कोणी दोषी आहेत, त्यांना कमाल शिक्षा दिली पाहिजे. ही मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासाठी कसोटीची वेळ असल्याचे उमा भारती यांनी म्हंटले आहे.दरम्यान, इंदोरच्या भागीरथपुरा येथील आरोग्य केंद्रात सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत रुग्णांची गर्दी होती. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत अनेक नागरिक उपचारासाठी येत असून बहुसंख्य रुग्ण उलटी व जुलाबाच्या तक्रारी घेउन आले आहेत. अनेक कुटुंबांतील सर्व सदस्य आजारी पडल्याने परिसरात तीव्र संतापाचे वातावरण आहे.



## भाजपचा एकमेव अजेंडा शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसला संपवणे- सतेज पाटील



**कोल्हापूर :** कोल्हापूर इचलकरंजी महापालिकेत भाजपकडून शिवसेनेला मिळालेल्या जागेवरून काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. शिंदे शिवसेनेला इचलकरंजीत मताधिक्य मिळून देखील ते कार्यकर्त्यांना न्याय देउ शकत नाहीत. काँग्रेसने किमान कार्यकर्त्यांना न्याय दिला आहे. स्वत: शिंदे सेना असो किंवा अजित पवार राष्ट्रवादी गट असो भाजपचा एकमेव अजेंडा यांना संपवणे, त्याची प्रचिती आता महापालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने येत आहे. असा टोला आमदार सतेज पाटील यांनी लगावला. कोल्हापुरात ते बोलत होते. कृपाशंकर सिंग यांच्यावरून बोलताना, भाजपचे नेहमीच दुटप्पी भूमिका दिसून आली आहे. निवडणुकीत फायदा घेण्यासाठी एका नेत्याने एक वक्तव्य करायचे. दुसरा नेत्याने त्याचे खंडन करायचे. मीडिया स्पेस स्वतःकडे राहील. दोन्ही घटकांना फायदा करून आपल्याला निवडणुकीत याचा वापर करता येतं का हे भाजप नेहमी पाहत. मराठा समाज आंदोलन असेल, ओबीसी आंदोलन असेल यामध्ये सरकारचा प्लॅन एकाने एका बाजूने बोलायचं दुस-याने दुस-या बाजूने बोलायचे.

# घोळ घालणा-यांवर कारवाई करणार

### अखेर मुख्यमंत्री मैदानात; दिले आश्वासन एबी फॉर्म घोटाळा नाट्य

नाशिक/**प्रतिनिधी :** भाजपमध्ये उमेदवारीसाठी यापूर्वी असे प्रकार कधीही घडले नाहीत. जे झाले ते वाईट झाले. तिकिटांसाठी कुणी दलाली करत असेल हा गंभीर प्रकार आहे. यापुढे पक्षात असे दलाल दिसणार नाहीत, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संघटक शिवकुमार यांनी दिल्याचे समजते.

भाजपच्या तिकीट वाटपात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर आ. सीमा हिरे आणि काही पदाधिका-यांनी गुरुवारी मुंबईत मुख्यमंत्री फडणवीस आणि शिवकुमार यांची भेट घेतली. त्यात तिकीट वाटपाच्या दिवशी झालेला गोंधळ आणि एबी फार्मचे वाहनातून होता असलेले वाटप, त्यानंतर फार्म हाउसबस घडलेल्या नाट्याची माहिती देण्यात आली. यावर नाराजी व्यक्त करता मुख्यमंत्र्यांसह शिवकुमार यांनी खेद व्यक्त केला. सिडकोत आमदार सीमा हिरे आणि सुधाकर बडगुजर यांच्यातील वाद टाळण्यासाठी भाजपच्या मुळ यादीनुसार उमेदवारी पुरस्कृत केली आण्याची शक्यता आहे. सुधाकर बडगुजर यांचे पुत्र दीपक बडगुजर यांनी प्रभाग क्रमांक २९ आणि २५ अशा दोन प्रभागात अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी प्रभाग २० मधून त्यांना उमेदवारी करण्यात सांगण्यात येईल. प्रभाग २२ अधिकृत उमेदवार मुकेश शहाणे यांना आता भाजप पुरस्कृत अपक्ष करण्यात येईल तसेच प्रभाग क्रमांक २५ मधील पक्षाच्या अधिकृत उमेदवार भाग्यश्री डोमसे आता अपक्ष असल्या तरी त्यांना पुरस्कृत केले जाउ शकते, अशा वेळी बडगुजर यांना स्वतः आणि पत्नी हर्षा बडगुजर आणि मुलगा दीपक बडगुजर यापैकी दोघांनाच संधी देता येईल.



**नाराजी दूर होईल-**माघारी अंतिम मुदतीपर्यंत अंतर्गत मोडीत निघालेली असेल यासाठी पक्षाने आदेश जे पाळणार नाहीत त्यांच्यावरही कारवाई होईन. मग त्या जागी बडगुजर असतील तरी त्यांना वगळले जाणार नाही, असेही केदार यांनी स्पष्ट केले.

## जमिनीचे वाद मिटवणारी सलोखा योजना 2027 पर्यंत राहणार सुरू

**पुणे/प्रतिनिधी :** शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतक-यांतील आपआपसांतील वाद मिटविण्यासाठी असलेली सलोखा योजनेला दि. १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ आहे. या योजनेअंतर्गत नाममात्र एक हजार रुपये नोंदणी शुल्क आणि एक हजार रुपये मुद्रांक शुल्काच्या बदल्यात शेतक-यांना आपल्या ताब्यातील शेतजमिनीची अदलाबदल करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेतजमिनीचे वाद हे अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालयातील व प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी सदर वाद वर्षानुवर्षे चालू आहेत. शेतजमीन हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा व संवेदनशील विषय असल्यामुळे त्यातील वादांमुळे कौटुंबिक नात्यांमध्ये एकमेकांबद्दल असंतोषाची भावना व दुरावा निर्माण झाला आहे. या वादांमुळे अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असून, आजच्या पिढीचाही खर्च व वेळेचा अपव्यय होत असून, अशा प्रकारचे वाद संपुष्टात येण्यामध्ये म्हणावी अशी प्रगती झालेली दिसत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर वाद संपुष्टात येउन समाजामध्ये सलोखा निर्माण व्हावा व एकमेकांतील सौख्य, शांतता व सौहार्द वाढीस लागावे, यासाठी शासनाने सलोखा योजना आणली आहे.

## दिल्लीत रंगणार अस्सल मराठमोळी 'हुरडा पार्टी' आणि संक्रांत महोत्सव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राजधानी दिल्लीत सध्या कडाक्याच्या थंडीचा जोर वाढला असून धुक्याची चादर पसरली आहे. अशा वातावरणात दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीची उब देण्यासाठी कस्तुरबा गांधी मार्ग स्थित नवीन महाराष्ट्र सदनात हुरडा पार्टी आणि मकर संक्रांत महोत्सवाचे ९ ते ११ जानेवारी या कालावधीत दु. १२ ते ९.३० या वेळेत आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला यांनी दिली.महाराष्ट्र सदनात डिसेंबर महिन्यात पार पडलेल्या महाराष्ट्र खाद्य महोत्सवाला दिल्लीकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, आता विशेषत? हिवाळी हंगामाची मेजवानी म्हणून 'हुरडा पार्टी'चे आयोजन करण्यात आले आहे. मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या महोत्सवात 'तिळगूळ' आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. पुणे, सोलापूर, नाशिक आणि मराठवाड्यातील शेतांमध्ये ज्याप्रमाणे शेकोटीवर हुरडा भाजून आनंद साजरा केला जातो, तसाच अनुभव येथे दिला जाणार आहे. हुरड्यासोबतच खमंग लसूण चटणी, शेंगदाणा कूट, पिवळाधमक गूळ, साजूक तूप, ताक आणि चुलीवरचे वाफाळलेले पिठलं-भाकरी,भरीत भाकरी, बटाटेवडा, भजी सोबतच उस, बोरं, ओला हरबराअशा अस्सल गावरान पदार्थांची रेलचेल येथे असणार आहे.थंडी, शेकोटीची उब आणि संगीत मैफिलीत हुरड्याचा आस्वाद, असा दुग्धशर्करा योग या निमित्ताने जुळून येणार आहे. याबरोबरच संक्रात वाणासाठी महिलांनी बनविलेल्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. शहर आणि गाव यांना जोडणारा हा भावनिक पूल दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या अधिक जवळ घेउन जाणारा ठरणार आहे. ९ ते ११ जानेवारी दरम्यान नवीन महाराष्ट्र सदन येथे होणा-या या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होउन महाराष्ट्राच्या आदरातिथ्याचा आणि चवीचा आनंद घ्यावा, असे आवाहन निवासी आयुक्त आर विमला आणि गुंतवणूक निवासी आयुक्त सुशील गायकवाड यांनी केले आहे.

## दिल्लीत धुक्याचा कहर; आजही विमाने आणि 45 हून अधिक रेल्वे उशिराने

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीत कडाक्याच्या थंडीमुळे प्रवाशांची गैरसोय कायम आहे. शुक्रवारीही दाट धुक्यामुळे अनेक विमानसेवा तसेच ४५ हून अधिक रेल्वेगाड्या उशिराने धावत असल्याचे चित्र आहे. दिल्लीसह देशातील विविध राज्यांमध्ये धुके पडल्यामुळे रेल्वे वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे.शुक्रवारी दिल्लीकडे येणा-या भुवनेश्वर राजधानी, रांची राजधानीसह ४५ पेक्षा अधिक गाड्या दोन तासांहून अधिक विलंबाने धावत आहेत. अनेक गाड्यांच्या सुटण्याच्या वेळेतही बदल करावा लागला आहे. तर नवी दिल्ली-दरभंगा हमसफर विशेष गाडी साडेसहा तास उशिराने, नवी दिल्ली-सोगरिया (कोटा) सुपरफास्ट एक्सप्रेस दोन तास उशिराने, तर नवी दिल्ली-लखनउ गोमती एक्सप्रेस दीड तास विलंबाने रवाना होणार आहे. संध्याकाळपर्यंत आणखी काही गाड्यांच्या प्रस्थान वेळेत बदल होण्याची शक्यता आहे.लांब पल्ल्याच्या गाड्यांसोबतच अनेक लोकल गाड्याही उशिराने धावत असल्याने सकाळी कामावर पोहोचताना प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रेल्वे अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. वंदे भारत गाड्यांसाठी अतिरिक्त डबे लावण्यात आले असून, त्या वेळेत धावू शकतील यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) स्थापन करण्यात आला आहे.

## पुण्यात भाजपने उघडले खाते; मंजूषा नागपूरेंची बिनविरोध निवड

**पुणे/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाने निवडणूकी आधीच पुण्यात खाते उघडले आहे. भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग ३५ (ब) मधील उमेदवार मंजूषा नागपूरे या बिनविरोध निवडून आलेल्या आहेत. नागपूरे यांच्यासह या प्रभागात सहा उमेदवारांचे अर्ज होते. त्यातील दोन अर्ज छाननीत बाद झाले होते. त्यानंतर चार अर्ज शिल्लक होते. त्यातील तीन उमेदवारांनी शुक्रवारी अर्ज मागे घेण्याच्या भरण्याच्या शेवटच्या दिवशी माघार घेतली. त्यामुळे नागपूरे यांची बिनविरोध निवड झाली असून त्या सलग तिस-यांदा निवडून आलेल्या आहेत. या प्रभागात मागील दहा वर्षांपासून त्या सातत्याने कार्यरत असून नागपूरे यांचे पती दिपक नागपूरे हे भाजपचे सरचिटणीस आहे. या प्रभागात शहरात सर्वाधिक कमी अर्ज आले होते. तर, उर्वरीत उमेदवारांचे अर्ज माघारी घेण्यात भाजपला यश आले असल्याने नागपूरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

## राहुल नार्वेकरांची दादागिरीच-हरिभाउ राठोड यांचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईत मोठा वाद निर्माण झाला आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरू दिले नाहीत, असा गंभीर आरोप हरिभाउ राठोड यांनी केला होता.



पत्रकारांशी बोलताना हरिभाउ राठोड म्हणाले, राहुल नार्वेकर मला म्हणाले की माझे सगळे प्रिव्हीलेज मी काढून घेईन. मी म्हटले साहेब तुम्ही मला फाशीवर चढवू शकता. त्यावर ते म्हणाले की तुम्हाला माहित असून सुद्धा माझ्यासोबत का पंगा घेताय मग? हे सगळे मी रेक?र्ड केले आहे. मी त्यांना म्हटले की मला माहीत आहे की तुम्हाला तुमच्या भावाला, बहिणीला आणि वाहिनीला उमेदवारी द्यायची आहे. यासाठी धमक्या देत आहेत. आमच्या बीएसपीच्या कार्यकर्त्यांना धमक्या दिल्या, त्यांना बाहेर काढले. पुढे बोलताना हरिभाउ राठोड म्हणाले, संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीने हे सगळे केले आहे. तो कृष्णा जाधव, तो म्हणतो की टोकन आम्ही नाही दिले. मी म्हटले तुमचे लोक काउंटरवर बसवले आहेत, तो म्हणतो ते आमचे लोक नाही. मग चोर आहेत का? कोण आहेत ती माणसे? असा सवाल राठोड यांनी उपस्थित केला.

**..अन्यथा आम्ही कोणालाही सोडणार नाही-**या संदर्भातील सगळी माहिती आम्ही गागरानी साहेबांना सांगितली आहे. आम्ही १२ लोक आहोत, आताही वेळ गेली नाही. आमचे अर्ज घेण्यात यावे, अन्यथा आम्ही कोणालाही सोडणार नाही, असा इशाराही हरिभाउ राठोड यांनी दिला आहे. हरिभाउ राठोड यांनी पालिका आयुक्तांची भेट घेत या संदर्भात तक्रार दाखल केली आहे. तसेच निवडणूक आयोगाने संबंधित प्रकरणावर तातडीने पावले उचलत पालिका आयुक्तांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**काय आहे प्रकरण?**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी ३० डिसेंबर हा अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस होता. याच दिवशी कुलाबा विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक २२५, २२६ आणि २२७ मधून राहुल नार्वेकर यांचे नातेवाईक, बंधू मकरंद नार्वेकर, बहीण गौरवी शिवलकर आणि वहिनी हर्षदा नार्वेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. या अर्ज प्रक्रियेदरम्यान राहुल नार्वेकर स्वतः उपस्थित होते. याच उपस्थितीवरून वादाला तोंड फुटले आहे. इतर राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आरोप केला आहे की, नार्वेकर यांच्या उपस्थितीमुळे दबावाचे वातावरण निर्माण झाले आणि काही उमेदवारांना अर्ज भरण्यापासून रोखण्यात आले.

## मनसेत नाराजीनाट्य; 11 पदाधिका-यांनी दिले राजीनामे

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील प्रभाग क्रमांक ९७ आणि ९८ मध्ये मनसेच्या ११ पदाधिका-यांनी राजीनामे दिले. वांद्रेतील प्रभाग ९७ हा ठाकरेंच्या उमेदवाराला गेल्याने, तर प्रभाग ९८ मधील मनसेचा उमेदवार मान्य नसल्याने ११ पदाधिका-यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले. प्रामुख्याने विभाग पातळीवरील अंतर्गत नाराजी या राजीनामा सत्रामागे असल्याचे बोलले जात आहे.मुंबई महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. दरम्यान मनसेच्या वांद्रे परिसरात पक्ष स्थापनेपासून म्हणजेच तब्बल १९ वर्षांहून अधिक काळ पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या ११ महत्त्वाच्या पदाधिका-यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, ठाकरे बंधूंच्या युतीनंतर जागावाटपाची समीकरणे बदलली आहेत. वांद्रे येथील उपरोक्त दोन प्रभागांपैकी एक जागा शिवसेना उबाठा गटाकडे गेली आहे, तर दुसरी जागा मनसेच्या दीपिका काळजे यांना देण्यात आली आहे. जागावाटपात आपल्या विभागातील कार्यकर्त्यांना डावलले गेल्याची भावना किंवा उमेदवारी देताना स्थानिक पदाधिका-यांना विश्वासात न घेतल्याने ही टोकाची भूमिका घेतली गेल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे या ११ नाराज पदाधिका-यांची मनधरणी करणार की वांद्र्यासाठी नवीन फळी उभी करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान मनसेला वार्ड क्रमांक ९७ मध्ये भाजपाकडून खिंडार पाडण्यात आले आहे. मनसेच्या सर्वच प्रमुख जुन्या नेत्यांचा भाजपात पक्षप्रवेश झाला. ही जागा ठाकरेंच्या शिवसेनेला गेल्यामुळे नाराज असलेल्या जुन्या मनसेच्या कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश संपन्न झाला.मनसेच्या स्थापनेपासून हे पदाधिकारी पक्षासोबत होते. अनेक वर्षे निष्ठावंत कार्यकर्ते मनसेसाठी काम करत होते, परंतु उद्धव ठाकरेंच्या मशाल चिन्हावर उमेदवार रिंगणात असल्याने नाराजी व्यक्तकरण्यात आली. मशाल चिन्हावर उमेदवारी दिल्याने मनसेच्या सर्व जुन्या कार्यकर्त्यांनी राजीनामा दिला.

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक १२.१२.२०२५

**आज दि.१२.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार** घाटलाडकी, **निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत** घाटलाडकी, **यांनी बोलाविल्यानुसार .................. येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव** शाईस्ता बानो शे.हातम **अर्जात नमूद जन्म दिनांक** ०५.०६.१९७६ **च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.**

१) **जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे** घाटलाडकी **येथील स्थानिक रहिवासी आहेत.**
२) **सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.**
३) **सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण** अज्ञानता व माहिती नसणे **हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा**
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

**करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.**

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

**जाहीर नोटीस**

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,
जि.अमरावती यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.७२९/२०२५** **ने.ता.०६.०२.२०२६**

अर्जदार : १. **रमेश मोतीराम बेहरे, वय ६२ धंदा - शेती**
२. **सतीश मोतीरामजी बेहरे, वय ४९ धंदा - शेती**
**दोघेही रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
३. **बेबी दादाराव निचत, वय ६४ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
४. **मंदा सुरेश निचत, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
**दोघीही रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती**
५. **नलिनी रमेशराव डकरे, वय ५९ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
**रा.अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती**
६. **शालिनी निरंजन लाडोळे, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
**रा.पांढरी खानमपूर, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती**
-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.** मयत मोतीराम गंगाराम बेहरे **यांचा मृत्यू दिनांक** १७.१२.२००१ **रोजी घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच** मृतक बहिणाबाई मोतीराम बेहरे **यांचा दि.**१९.०१.२०११ **रोजी घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावले. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.७२९/२०२५ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.**०१.०१.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,**
**चांदूर बाजार**

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक ०५.१२.२०२५

**आज दि.०५.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार** घाटलाडकी, **निबंधक, जन्म नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत** घाटलाडकी, **यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव** म.सलीम अ.सलाम **अर्जात नमूद जन्म दिनांक** ३०.०७.१९५७ **च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.**

१) **जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे** घाटलाडकी **येथील स्थानिक रहिवासी आहेत.**
२) **सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.**
३) **सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण** अज्ञानता व माहिती नसणे **हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा**
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

**करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.**

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

**जाहीर नोटीस**

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,
जि.अमरावती यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.७२७/२०२५** **ने.ता.०५.०२.२०२६**

अर्जदार : १. **शामराव बाजीराव गणोरकर, वय ७४, धंदा - मजुरी**
२. **रामराव बाजीराव गणोरकर (मयत)**
**२अ) जनार्दन रामराव गणोरकर, वय ५५ धंदा - मजुरी**
**अर्जदार नं.१ व २अ) रा.खालतीपुरा शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**२ब) वंदना सुरेशराव जावरकर, वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
**रा.टाकरखेडा संभू, ता.भातकुली, जि.अमरावती**
**२क) सूर्यकांता गणेश कविठकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
**रा.नायगांव बोर्डी, ता.अचलपूर, जि.अमरावती**
-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.** मयत बाजीराव हरी गणोरकर उर्फ गणोस्कर **यांचा मृत्यू दिनांक** २३.११.१९७८ **रोजी शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच** मृतक जनाबाई उर्फ मनाबाई बाजीराव गणोरकर **यांचा दि.**२४.०३.१९९३ **रोजी शिरजगांव कसबा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावले. तसेच मृतक** रामराव बाजीरावजी गणोरकर **यांचा मृत्यू दिनांक** ०५.११.२०१२ **रोजी त्याचबरोबर** मृतक लिलाबाई रामरावजी गणोरकर **हिचा मृत्यू दिनांक** २०.१०.१९८६ रोजी **शिरजगांव कसबा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.७२७/२०२५ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.**०१.०१.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,**
**चांदूर बाजार**

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक ....१२.२०२५

**आज दि.३०.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार** घाटलाडकी, **निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत** घाटलाडकी, **यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत,** घाटलाडकी **येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव** मोहम्मद साजीद मोहम्मद हनिफ **अर्जात नमूद जन्म दिनांक** २५.०१.१९८८ **च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.**

१) **जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे** घाटलाडकी **येथील स्थानिक रहिवासी आहेत.**
२) **सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.**
३) **सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण** अज्ञानता व माहिती नसणे **हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा**
४) **आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.**

**करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.**

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## कार्यकर्ते हताश

नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीत महायुतीने बाजी मारली आणि महाविकास आघाडीतील पक्षांचा खुर्दा उडाला. आता राज्यातील महापालिका निवडणुकांची रणधुमाळी जोरात सुरू आहे. २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा धुरळा सध्या पाहायला मिळत आहे. १५ जानेवारी रोजी मतदान पार पडून, १६ जानेवारीला निकाल जाहीर होतील. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. निवडणूक आयोगाच्या अंतिम अहवालानुसार, राज्यातील सर्व महापालिकांसाठी मिळून तब्बल ३३ हजारांवर उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यावेळी राज्यातील २,८६९ नगरसेवक पदांसाठी होणाऱ्या निवडणुकीत राजकीय पक्षांसह अपक्षांनीही मोठ्या प्रमाणावर उडी घेतली आहे. पुणे महापालिकेत १६५ जागांसाठी सर्वाधिक ३,१७९ उमेदवारांनी अर्ज भरले असून, मुंबई महापालिकेत २२७ जागांसाठी २,५१६ जणांनी दंड थोपटले आहेत.नाशिक, पिंपरी-चिंचवड आणि छत्रपती संभाजीनगर यासारख्या शहरांमध्ये उमेदवारांची संख्या लक्षणीय असल्याने, अनेक ठिकाणी चौरंगी किंवा पंचरंगी लढती होत आहेत. बऱ्याच वर्षांत निवडणुकाच झाल्या नसल्यामुळे, अनेकांना संधीच मिळालेली नव्हती. नगरसेवक ही लोकप्रतिनिधींची पहिली पायरी असते. गावोगावच्या स्थानिक गोविंदा किंवा गणेशोत्सव मंडळांपासून ते पक्षाच्या स्थानिक शाखेपर्यंत वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते वर्षानुवर्षे काम करत असतात. अनेकजण स्वतःची पदरमोड करून लोकांना मदत करत असतात. सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्याला पक्षाकडून थोडीफार तरी मदत मिळण्याची शक्यता असते. परंतु, विरोधी पक्षांकडे साधसामग्रीची कमतरता असल्यामुळे त्या कार्यकर्त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.दिनदर्शिका वा दैनंदिनी वाटण्यापासून ते घरोघरी जाऊन पत्रके वाटणे, मतदारांना निवडणुकीत मतदानकेंद्रांवर आणणे अशी अनेक कामे या कार्यकर्त्यांना करावी लागतात. आजारी व्यक्तींना इस्पितळात खाट मिळवून देणे, रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे, शाळेत प्रवेश मिळवून देणे अशी अनेक कामे कार्यकर्ते करत असतात. त्याचे श्रेय त्यांना मिळतेच असे नाही. २०१९ पासून राज्याच्या राजकारणाचा सारीपाटच बदलून गेला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी विरुद्ध भाजप-शिवसेना अशा सरळसोट लढतीचे चित्र आता राहिलेले नाही. मात्र, पालिका निवडणुकांमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी हे चित्रदेखील विस्कटले आहे. विदर्भातील चार महापालिकांपैकी नागपूर आणि चंद्रपूरमध्ये भाजप-सेना युती झाली, तर अमरावती व अकोला महापालिकांत युती फिस्कटली. चारही महापालिकांमध्ये महाविकास आघाडीत बिघाडी झाली.छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील पाचही महापालिकांमध्ये युती विस्कटली. स्थानिक नेत्यांच्या अहंकारामुळे युती तुटल्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट म्हणाले; तर शिरसाट हे त्यांच्या घरातील उमेदवारासाठी वाद घालत होते आणि त्यांच्या मागण्याही अवास्तव होत्या, असे प्रत्युत्तर दुग्ध व्यवसायमंत्री अतुल सावे यांनी दिले! नाशिक, मालेगाव व धुळे या तिन्ही ठिकाणी भाजप स्वतंत्रपणे मैदानात आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार असल्याचे चित्र आहे. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांसाठी हा निर्णय स्थानिक पातळीवर झाला, असे आमदार रोहित पवार यांनी म्हटले असले, तरीदेखील यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांचे मत कितपत विचारात घेतले जात होते, हा प्रश्नच आहे. अनेक वर्षे काँग्रेसच्या नावाने खडे फोडणाऱ्या वंचित बहुजन आघाडीने मुंबई महानगरपालिका निवडणुकांत काँग्रेसशी आघाडी केली. शेवटच्या दिवशी वंचितने काही ठिकाणी उमेदवार देण्याबाबत असमर्थता व्यक्त केली आणि त्यामुळे गोंधळ झाला. मुंबईत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे पक्ष एकत्र लढत असून, त्यांचा सामना भाजप आणि शिंदे यांची शिवसेना यांच्याशी आहे. मुंबईत दलित व मुस्लिम मते विभागली जाण्याची शक्यता आहे. मराठी विरुद्ध परप्रांतीय असा वादही उकरून काढला जात आहे. त्यामुळे वातावरण गढूळ होऊ नये, अशी अपेक्षा आहे. या निवडणुकीत सर्वच पक्षांमधील घराणेशाहीचे दर्शन उमेदवारांच्या यादीत दिसून आले. उमेदवारी मिळावी, म्हणून तासन्तास तिष्ठत राहिलेल्या इच्छुकांच्या समर्थकांनी पक्षांच्या कार्यालयांवर दगडफेक करणे, नेत्यांच्या कार्सचा पाठलाग करणे, त्यांच्या कानशिलात मारणे, शिवीगाळ करणे आणि उमेदवारी अर्जांचीच पळवापळवी करणे असे अनेक प्रकार घडले. पुण्यात एकाने दुसऱ्या उमेदवाराचा एबी फॉर्मच गिळला; तर चंद्रपूरमध्ये परस्पर यादी बदलल्यामुळे भाजपच्या तेथील अध्यक्षाची हकालपट्टी करण्यात आली. हे कुठल्या प्रकारचे राजकारण आहे? पक्षासाठी अहोरात्र राबणाऱ्या कार्यकर्त्यांना जेव्हा आश्वासन देऊनही फसवले गेल्याचा अनुभव आला, तेव्हा अनेकांच्या डोळ्यांत पाणी आले. कोणाला हृदयविकाराचा झटका आला, तर कित्येक महिला आक्रोश करू लागल्या. एकीकडे भाजप असो, शिंदे यांची शिवसेना अथवा अजित पवारांचा पक्ष, सर्वांनीच गुंडांना तिकिटे दिली आहेत. एकाच कुटुंबातील तीन-तीन जणांना तिकिटे देण्याचे प्रकार अन्य पक्षांसह भाजपतही झाले.आमचा पक्ष सत्ताधारी असल्यामुळे एकेका जागेसाठी इच्छुक उमेदवारांची संख्या प्रचंड होती, त्यामुळे कोणाला ना कोणाला नाराज करणे भाग पडले, असे स्पष्टीकरण भाजप नेते, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे; मात्र असे म्हणणे, ही आत्मवंचना ठरेल. भाजप हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष असला, तरी या पक्षात अन्य पक्षांतून येणाऱ्यांची गर्दी झालेली आहे. केवळ सत्तेसाठी पक्षात येणाऱ्यांना पायघड्या घातल्या जात आहेत आणि आम्ही मात्र वर्षानुवर्षे केवळ सतरंज्याच उचलायच्या का, अशी भाजपतील सामान्य कार्यकर्त्यांची भावना आहे. पक्षासाठी निरपेक्षपणे लढणाऱ्या व झटणाऱ्या कार्यकर्त्यांची सर्वच पक्षांत उपेक्षा होत आहे. नेत्यांनी कोणत्याही पक्षाशी व कशीही युती-आघाडी करावी आणि आम्ही फक्त हे सर्व बघत नेत्यांचा जयजयकार करावा, अशी अपेक्षा आहे का, हा कार्यकर्त्यांचा रास्त सवाल आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात तत्त्व व निष्ठा यांना किंमत राहिलेली नसून, केवळ पैसा बोलायला लागला आहे. राजकारणाची पातळी नीचांकाला पोहोचली असून, यामुळे सामान्य जनताच नव्हे, तर विविध पक्षांचे कार्यकर्तेही उद्विग्न व हताश झाले आहेत. जनतेला प्रबोधनाचे डोस पाजणाऱ्या नेत्यांनीच याबाबत कठोर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

# भिकार राजकारणाचा बेकार निकष

**महापालिकेत निवडून येणारा जर पाच वर्षात बंगले, गाड्या, जमिनी, फ्लॅट्स, झोपड्या, गाळे इत्यादी घेण्याच्या, लाटण्याच्या, कमावण्याच्या उद्देशानेच आलेला असेल तर मग कुणाला कुठेकुठे आणि कशाकशात रोखायचे?**

कार्य, कर्तृत्व, वैचारिक प्रगल्भता, सामाजिक पार्श्वभूमी, स्वीकृती, निष्ठा, ध्येय – उद्दिष्टे वगैरे अशा अनेक निकषांतून पाझरत येणाऱ्यांपैकी एका इच्छुकाला पक्षाकडून निवडणुकीत उमेदवारी दिली जायची. ही प्रक्रियाच मुळी लोकप्रतिनिधींसाठी सामाजिक व राजकीय वर्तवणुकीचा एक आदर्श निर्माण करायची. अशातूनच या देशाला सुसंस्कारी, तत्त्वनिष्ठ, प्रामाणिक लोकप्रतिनिधी लाभत आले होते. त्यामुळेच काही तुरळक अपवाद वगळता, साधुसंतांच्या या भारतभूमीतील जननायक हे संस्कारांच्या चौकटीत राहून जबाबदारीने वागत. परंतु स्वार्थांधपणाच्या विकृतीचे इथे संक्रमण झाले आणि सारेच बदलले, बदलत चालले आहे. नैतिकतेला प्राधान्य देणारी ती निवड प्रक्रिया आता दुर्मिळ नाही तर नामशेष झाली असल्याचे दिसते. त्याचेच परिणाम म्हणजे, 'आजचे राज्यकर्ते'.

राजकारणात आजकाल उमेदवारी देताना एकच निकष बघितला जातो आणि तो म्हणजे 'जिंकून येण्याची क्षमता'. इच्छुक उमेदवार या एकाच निकषामध्ये जरी अव्वल असेल आणि बाकीच्या सर्व निकषांमध्ये तो नालायक असला तरी त्यालाच प्रथम पसंती असतो, ही आजची शोकांतिका राजकारणातील 'न्यू नॉर्मल' झाली आहे. आजचा राजकीय गलिच्छपणा, पक्षव्यभिचार, निर्लज्जपणा आणि त्यातून केवळ जिंकून येण्याचीच क्षमता असलेले राजकारणी ही सारी याच निकषाची कटु फळे आहेत.

आता निवडून येण्याची क्षमता म्हणजे नक्की काय ? या चिखलात बरेच काही सामावलेले असले तरी, 'मनी पॉवर अँण्ड मसल पॉवर' या दोन गोष्टी सर्वाधिक प्रभावी. या श्रेणीत येणाऱ्यांमध्ये 'मसल पॉवरद्वारे मनी पॉवर' उभी करणाऱ्यांना अधिक पसंत केले जाते. दहशत हे यांचे सर्वात प्रभावी अस्त्र होय आणि याच्याच सहाय्याने त्यांचे हात मतदारसंघात सर्वत्र पोहोचलेले व सगळ्यात रुतलेले असतात. या दृष्टिकोनातून सगळ्यांना त्यांचा परिचय असणे स्वाभाविकच नव्हे तर अपरिहार्य होते. यालाच काहीजण 'अफाट जनसंपर्क' समजतात. त्यातून लाभलेल्या सुप्रसिद्धी वा कुप्रसिद्धीमुळे त्यातील बरेच निवडूनदेखील येतात वा येऊ शकतात. एखाद्या मतदारसंघात जेव्हा अशा प्रकारचे व्यक्तिमत्व राज्य करते तेव्हा त्या मतदारसंघाची याच्या विळख्यातून सहजासहजी लवकर सुटका होणे मुश्किल होऊन बसते. राजकीय पक्षांना हे माहीत असल्याकारणाने ते आपल्या पक्षाला बहुमत मिळावे यासाठी असल्यांना आपलेसे करतात.



अगोदर राज्यात एक कोणीतरी असा बाहुबली हेरला जायचा. पुढे प्रत्येक विभागाचा, जिल्ह्याचा, तालुक्याचा, गावाचा, मतदारसंघाचा आणि आज तर प्रत्येक गल्लीत आपला असा एखादा हस्तक असलाच पाहिजे अशा मनस्थितीत आजचे राजकीय पक्ष पोहोचले आहेत. गुन्हेगारांना जेव्हा असा राजाश्रय प्राप्त होतो तेव्हा त्यांच्या कुकर्मांना मर्यादा राहत नाहीत. हे असे जेव्हा निवडून येतात तेव्हा मग पुढे काय ? भ्रष्टाचार, अत्याचार, दुराचार आणि सारे काही अवैध, असंवैधनिक, अन्यायकारक. निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवार जर करोडो रुपये खर्च करत असेल तर निवडून आल्यावर या खर्चाच्या कमीतकमी पन्नास पट वसूल करण्याची त्याची नियोजित महत्त्वाकांक्षा त्याला सारे गैर मार्ग पत्करायला प्रोत्साहित करते. महापालिकेत निवडून येणारा जर पाच वर्षात बंगले, गाड्या, जमिनी, फ्लॅट्स, झोपड्या, गाळे इत्यादी घेण्याच्या, लाटण्याच्या, कमावण्याच्या उद्देशानेच आलेला असेल तर मग अशाला कुठेकुठे आणि कशाकशात रोखायचे ?

सर्वात आश्चर्याची बाब ही की हे सगळे केवळ गुन्हेगारी प्रवृत्तीचेच करतात असे नाही तर, व्हाईट कॉलर, सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणून राजकारणात आलेलेसुद्धा पुढे हेच वळण घेताना दिसतात. त्यामुळे राजकारण या क्षेत्राचीच बदनामी झाली आहे. मतदाराला काय अपेक्षित आहे, हे कधीच जाणुन घेतले जात नाही आणि जरी याची जाण असली तरी, सत्ताखुर्चीसाठीच्या राजकारणात कराव्या लागणाऱ्या तडजोडीत अगोदर बळी दिला जातो तो मतदाराच्या याच आशा – अपेक्षांचा, पक्षाच्या विचारधारेचा, संघटनेच्या तत्त्वांचा, निष्ठेच्या सन्मानाचा.

जनता प्रत्येक वेळेस काही अपेक्षा ठेवून एखाद्याला निवडून आणत असते पण त्यापैकी किती गोष्टींची पूर्तता होते? तेव्हा, असलेले व येणारे हे सारेच जर एका माळेचे मणी असणार असतील तर मग त्यावर स्वताचे सांत्वन करण्यासाठी 'नोट दो – वोट लो' चा उपचार अनेकांनी स्विकारला आहे. आपण आयकराच्या रूपात भरलेले आणि यांनी ते भ्रष्टाचार करून लुटलेले जर आपल्याला पाच वर्षातून एकदा येणाऱ्या निवडणुकीच्या माध्यमातून परत मिळवता येऊ शकत असतील तर काहीच चुकीचे ठरत नाही, असा विचार आता पैसे घेणारा मतदार करू लागला आहे. आता हे पाप मतदारांवर शेकू शकत नाही कारण त्यांना याची सवय याच पैसे वाटणाऱ्या नेतेमंडळींनी घालून दिली आहे. एकेका मताला दहा ते पंधरा हजारांचा आकडा आज ऐकायला मिळणे म्हणजे 'एकदमच भारी' आणि याचसाठी राजकीय पक्ष त्या तोडीचा भारी उमेदवार मिळावा म्हणून 'सगळे सोडून' शोधत फिरत असतात. असा आणि इतका पैसा ओतू शकणारा कोणी सापडलाच की हे त्याला गडप करण्यासाठी त्यावर तुटून पडतात. मग, तो कसाही – कितीही भयानक- भयंकर असला तरी चालतो. या अशा घृणास्पद राजकारणात जो सर्वात कुशल आहे, मुरलेला आहे, धूर्त आहे तोच सत्ताखुर्ची जिंकून त्यावर विराजमान होऊ शकतो, असे म्हणण्यात अतिशयोक्ती काय आहे!

देशाचे – राज्याचे – शहराचे भावी नेतृत्व हे आजच्या अशा निवडणुकींच्या पायऱ्या चढूनच येत असते आणि म्हणून आपण स्थानिक पातळीवर कसा उमेदवार दिला पाहिजे, याचे भान आणि जबाबदारी प्रत्येक राजकीय पक्षाची आहे. उमेदवार निवडीचे निकष हे स्वच्छ, आदर्श, अनुकरणीय असावेत. या प्रक्रियेतून निवडून येणारा लोकप्रतिनिधी उद्या कसा निघेल हे जरी आज सांगता येऊ शकत नसले तरी, सर्वच पक्षांनी याबाबत दक्षता आणि कटाक्ष ठेवला तर राजकारणात चांगल्या लोकप्रतिनिधींची एक परिसंस्था तयार होण्यास मदत होईल आणि ज्यातून राजकीय विकृती आपसूकच बाहेर फेकली जाणारे वातावरण निर्माण होईल. त्यासाठी आजच्या 'भिकार राजकारणाचे बेकार निकष' खोडून काढणे आवश्यक आहे.

**– अजित कवटकर**

## महापालिका निवडणुकीसाठी भाजपला पसंती

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत चांगले यश मिळवून सत्ताधारी झालेल्या भाजप आणि मित्रपक्षांनी विरोधकांना नामोहरण करण्याची एकही संधी सोडलेली नाही. त्यांचाच एक भाग म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतदेखील भाजपची रणनीती दिसून येत आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीत देखील एकट्या भाजपचेच मोठे वर्चस्व राहिले आहे. त्यानंतर महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपकडे चाललेल्या नेत्यांची संख्या वाढतच आहे. त्यामुळे सध्या राज्यभरातील महापालिका निवडणुकीसाठी भाजपला सर्वोच्च पसंती मिळताना दिसत आहे. सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांचे मानसिक खच्चीकरण करण्यात भाजपने कमालीचे यश मिळविले आहे. त्यामुळे भाजपशिवाय सध्या पर्याय नाही, असे चित्र निर्मासन झाले आहे. त्यातच देशपातळीवरील प्रमुख माध्यमांकडून देखील भाजपचीच पाठराखण केली जात आहे. परिणाम जनतेपुढे येणाऱ्या सगळ्या बातम्या भाजपपूरकच असत आणि त्याचा फायदा सर्वच सत्ताधारी भाजप नेत्यांना होत आहे.

राज्यात महापालिका निवडणुकीची भाजपची जोरदार तयारी सुरु आहे. त्यासाठी विरोधकातील इच्छुकांना आवाहन केले जात आहे.त्याचबरोबर त्यांच्यामागे तपासयंत्रणा लागण्याची भीती आहे. त्यामुळेच भाजपमध्ये घाऊक भरती होण्यास सुरुवात झाली आहे. काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील वर्षानुवर्षे सत्ता भोगलेले नेते आणि त्यांचा परिवार सर्व काही विसरून भाजपमध्ये सहभागी होत आहेत. सर्वच पक्षातील सत्ताकांक्षी राजकीय नेते आज भाजपला पसंती देत आहेत. कार्यकर्त्यांच्या दबावाच्या नावाखाली सर्वानाच सत्ताधारी होण्याची घाई लागली आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीतील राजकीय चुरस दिवसेंदिवस वाढत जात आहे. आणि त्यातही राज्यात सत्ताधारी असल्याचा भाजपला अपूर्व लाभ मिळताना दिसत आहे. त्यातूनच आठ वर्षाच्या खंडानंतर होत असलेल्या या महापालिका निवडणुकीत कोण बाजी मारणार हे उघड आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

## 'कौडिंण्य ' गौरवशाली इतिहासाचे प्रतीक

'लुक ईस्ट अँक्ट ईस्ट' ही संकल्पना या लाकडी शिडाच्या जहाजाच्या माध्यमातून साकार झाली आहे. भारतीय नौसेना आणि भारतीय संस्कृती मंत्रालय यांच्या एकत्रित सहभागाने या जहाजाची निर्मिती झाली आहे यामध्ये आयआयटी मद्रास मधील वैज्ञानिकांचाही मोठा सहभाग आहे. हेजहाज म्हणजे भारतीय प्राचीन गौरवशाली इतिहासाचे प्रतीक आहे. याच्या निर्मितीसाठी लाकडाची तावदाने, नारळाच्या झाडापासून बनवलेले दोरखंड आणि राळ, कापूस आणि माशाचे तेल यापासून तयार केलेला डिंक या केवळ तीन गोष्टीच वापरल्या आहेत. याच्या बांधणीत केरळ मधील पारंपारिक करागिरांचा मोठा सहभाग आहे. याची लांबी१९.६मीटर आणि रुंदी६.५मीटर आहे. यावर सूर्य म्हणजे सौर ऊर्जेचे प्रतीकआणि शक्तीचे प्रतीक म्हणून 'याली' या दोन मुखे असलेल्या प्राण्याचे चित्र रेखाटले आहे. महाराष्ट्रातील अजिंठा येथील दगडी शिल्पात साकारलेल्या जहाजाच्या प्रतीकृतीवरून या जहाज बांधणीची कल्पना मूर्त स्वरूपात आली. INSV 'कौडिंण्य' या नावातही मोठाअर्थ सामावलेला आहे.कोणत्याही आधुनिक उपकरणाशिवाय या जहाजा मार्गे होणारा प्रवास हे ... मोठे आव्हान आहे हे आव्हान १५ जणांच्या चमुने स्वीकारले आहे. या प्रवासासाठी त्यांना खास प्रशिक्षण देण्यात आले आहे. समुद्राच्या उत्तुंग लाटा आणि सतत बदलणारी वाऱ्याची दिशा या अडथळ्यांवर मात ...रून कोणत्याही आधुनिक उपकरणाशिवाय हा प्रवास म्हणज एक मोठे आव्हान आहे.या लाकडी जहाजाची निर्मिती बघून चीन आणि अमेरिकेने तोंडात बोटे घातली आहेत.कौडिंण्यचा प्रवास म्हणजे 'आत्मनिर्भर' भारत या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे.

**संध्या काटदरे**

## स्मृती मानधनाचा प्रेरणादायी प्रवास !

१०,००० धावांचा टप्पा पार केल्यामुळे स्मृती जागतिक क्रिकेटमधील एलिट खेळाडूंमध्ये सामील झाली आहे. हा टप्पा गाठणाऱ्या सर्वात वेगवान महिला क्रिकेटपटूंपैकी ती एक आहे, जे तिचे उल्लेखनीय सातत्य दर्शवते. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या खेळात, तिच्या कामगिरीने लोकांच्या धारणा बदलण्यास आणि महिला खेळाडूंना अधिक ओळख मिळवून देण्यास मदत केली आहे.स्मृती मानधनाचा प्रवास खूप प्रेरणादायी आहे, विशेषतः भारतातील तरुण मुलींसाठी. आव्हाने, दुखापती, टीका आणि अपेक्षांना सामोरे जाऊनही, ती लक्ष केंद्रित करून आणि खंबीर राहिली आहे. शिस्त, कठोर परिश्रम, कुटुंबाचा पाठिंबा आणि आत्मविश्वास हे तिच्या यशाचे आधारस्तंभ आहेत.तिचे यश एक शक्तिशाली संदेश देते: समर्पण आणि दृढनिश्चयाने कोणतेही अडथळे पार केले जाऊ शकतात.ती नवनवीन विक्रम रचत असताना, ती एका पिढीला मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि उच्च ध्येये ठेवण्यासाठी प्रेरित करते. स्मृती मानधनाचे मन:पूर्वक अभिनंदन.

**- प्रा. विजय कोष्टी**

# आई सावित्रीबाई फुले स्त्रियांसाठी वरदान

**'जा जा माझ्या मुलींना शिकवा
त्यांना ज्ञानाचे दान द्या
त्यांना स्वतः च्या पायावर उभे राहु द्या.
त्यांना स्वतःच्या जीवनाचे निर्णय घेऊ द्या'**

या चार ओळींमध्ये माईची खूप मोठी शिकवण आहे. आम्हा सर्वांचे शिक्षणाने बुद्धीमत्ता वाढते, विचार करण्याची दिशा मिळते, आपण नवे निर्णय घेण्यास सक्षम होतो,खरे खोट्याची जाणीव होते. ही शक्ती शिक्षणामुळे स्त्रियांना मिळाली आहे, ते एका महान व्यक्तिमत्व म्हणजे माई सावित्रीबाई फुले.जी भारतातील पहिली शिक्षिका झाली.

आजच्या पिढीला आम्ही काय देतो, काय दाखवतो आणि काय ऐकवतो यावरच उद्याचा भारत उभा राहणार आहे म्हणून त्यांच्यात नवा जोश, नवे विचार, नवा संकल्प भरत असतांना थोर व्यक्तींचे चरित्र्याची माहिती देणे, हे आजच्या पालकांची व शिक्षकांचे कर्तव्य आहे. भारतीय संस्कृती म्हणजे पुरुष प्रधान आणि स्त्री फक्त चूल आणि मुले साभाळावे अशी मान्यता होती. स्त्री म्हणजे भोगवस्तु, स्त्रीचे नख सुद्धा दिसू नये.परंतु एका पुरुषाला दहा बायका करता येत होत्या जर पुरुषाच्या आदी मृत्यू झाला तर स्त्रीला तिचा पतीच्या प्रेताच्या सरणावर बसावे लागत होते व धगधगत्या आगी वर बसून भस्म व्हावे लागत होते.

सनातन्यांकडून स्त्री शिक्षणाला कसून विरोध होता परंतु ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी अंगीकारले कार्य सोडणार नाही या विचाराने ठाम होते. सावित्रीबाईचा मानसिक छळ नातेवाईकांने, सनातन ब्राह्मणनांनी केला व समाजातील पुरुष व महिला सुद्धा शारीरिक छळ केले.स्त्री शिक्षणासाठी माईंनी खूप अपमान सहन केले आणि प्रतीउत्तर देवून आपला व्यक्तीमत्व चा एक ठसा तयार केले. मुलींची शाळा सुरू होताच



सनातन ब्राह्मणनांनी धर्मशास्त्र उघडले. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नाही हा अधर्म आहे, भयंकर पातक, स्त्री अविचारी असते ती शिकली तर कुमार्गाला लागेल, जात बुडेल, धर्म बुडेल असे धर्म पंडित बोलू लागले. फुले दांपत्याला फक्त स्त्री शिक्षण दिसत होते. विद्या, विद्या, विद्या दुसरे काही नाही. 'नाहि ज्ञानेन सदृश्य पवित्रमहि विद्यते' ही गीतेची ओळ त्यांनी आत्मसात केली होती. पुण्यात एक शाळा उघडून फुले दाम्पत्य थांबले नाही.अवघ्या चार वर्षांत पुण्यात सात शाळा उघडले.

बाल हत्याप्रतिबंधक गृहात फुले दाम्पत्ययांनी आठ ते दहा वर्षांची बालवधू आणि पन्नाशी ओलांडलेल्या वर सोबत लग्न व्हायचे. समाजात बालविधवेचे प्रमाण अधिक होते कौमार्य येताच तिच्यावर अत्याचार आणि जन्मभर पांढऱ्या कपाळाची म्हणून आईबाबाकडून आणि समाजाकडून अवहेलना सोसावी लागत होती. बाल विधवाचे व सोबतच पोटात वाढणाऱ्या बालकाची जगात येताच हत्या केली जात होती. म्हणून बाल हत्याप्रतिबंधक गृह अश्या बालविधवा व त्यांच्या बाळाला आश्रय देण्यासाठी स्थापित करण्यात आले होते .

बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना २८ जानेवारी, १८५३ साली केली दोन ते चार वर्षांत बाल हत्याप्रतिबंधक गृहात शंभराहून अधिक विधवांची बाळंतपण झालीत. सावित्रीबाई स्वतःचा बाळ आणि बाळंतीण ची काळजी घेत होत्या.

नवरा मेल्यावर विधवाचे नातेवाईक जबरदस्तीने केश कापत होते त्यांचे दुःख ज्योतिबा आणि सावित्रीबाई बघू शकले नाही. त्यांनी केशवपनाविरुदध चळवळ सुरू केली. ज्योतिबा यांनी पाणी चळवळ केले. पाणी ही निसर्गाची देन आहे हे पाणी सुद्धा या देशातील अस्पृश्यांना मिळत नव्हते एक दोन दिवस नाही तर शतकानुशतक ते पाणी पाणी करीत या विहिरी वरुन त्या विहिरीत, या तलवावरुन त्या तलवात. पाणी वाढा, पाणी वाढा करीत परंतु कोणीही पाणी वाढले नाही म्हणून अस्पृश्यांसाठी पाणी ही चळवळ सुरू केली.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी २३ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यसोधक समाजाची स्थापना केले. १८९० पर्यंत ज्योतिबाने समाजाची धुरा आपल्या समर्थ खांद्यावर घेतली. परंतु त्यांचा मृत्यू नंतर १८९३ साली सत्यशोधक समाजाचे मोठे अधिवेशन भरले होते. या अधिवेशन ची अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले होत्या.

महाराष्ट्रात १८७६ साली मोठा कोरडा दुष्काळ पडला होता कमी पाऊस, पिकांची पेरणी सुद्धा झाली नव्हती अशा वेळी ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले दुष्काळग्रस्तांच्या मदतीला धावून आले. सावित्रीबाई फुले यांचे लेखन म्हणजे सामाजिक जाणीव असलेल्या कविता आणि बोधानं ओथंबलेले विचार नव्या युगाची वाट दाखवित असतांना 'जुने जाऊ द्या मरुणालागुनी' या केशवसुतांच्या ओळीची आम्हाला आठवण येते. सावित्री बाई फुले यांच्या दुसरा प्रसिद्ध काव्य संग्रह म्हणजे बावन्नकशी सुबोध रत्नाकर हा ग्रंथ १८९२ साली वऱ्हाड्यातील अमरावती जिल्ह्यातील करंजगाव या गावी सत्यशोधक समाजाचे स्वामी लक्ष्मणशास्त्री सोनार यांच्याकडे प्रकाशित झाले. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी निस्वार्थीपणे समाजाची सेवा केली. १८९७ साली पुण्यात प्लेग आला १० मार्च, १८९७ रोजी आम्हा सर्वांची माई सावित्रीबाई फुले प्लेग या आजारामुळे जगाचा निरोप घेतला .

**प्रा. अनिता एस. धुर्वे**
चांदुर रेल्वे

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# पारदर्शक प्रशासन, महिला सुरक्षेला प्राधान्य..!

# नगरपरिषदेसाठी १०० दिवसांचा विकास आराखडा जाहीर

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांचा पदभार स्वीकारताच ठोस निर्णयांचा धडाका

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - भाजपच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी आज यवतमाळ नगरपरिषदेत अधिकृतरित्या आपला पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेला भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चौहान,जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार, नगर परिषद गटनेते नितीन गिरी उपस्थित होते. उईके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या महाराष्ट्राच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या धर्तीवर यवतमाळ नगर परिषदेचाही स्वतंत्र, पारदर्शक आणि जनाभिमुख १०० दिवसांचा विकास आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती दिली.

हा आराखडा पूर्णतःपारदर्शक राहणार असून शहरातील प्रशासन अधिक गतिमान, नागरिक केंद्रित व उत्तरदायी बनविण्यावर भर देण्यात येणार आहे, असे नगराध्यक्ष उईके यांनी स्पष्ट केले. महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी निर्भया, दामिनी व चार्ली पथक अधिक सक्षम करण्यात येणार असून त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा, मनुष्यबळ व वाहनांची संख्या वाढविण्यात येणार आहे. शहरातील संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पोलीस गस्त वाढविणे व त्वरित कारवाईची यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे. शहरातील शिवाजी गार्डन परिसरात सुरू असलेल्या अश्लील प्रकारांबाबत जनमाध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नावर नगराध्यक्ष उईके यांनी तेथे तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवून पोलीस गस्त वाढविण्याचे निर्देश देण्यात येतील, असे सांगितले. तक्रार निवारणासाठी 'एक शहर एक ॲप' नागरिकांच्या तक्रारी त्वरित आणि प्रभावीपणे सोडविण्यासाठी नगरपरिषदेत संपर्क कक्ष व तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यात येणार आहे. 'एक शहर एक ॲप'



संकल्पनेतून नागरिकांना थेट तक्रार नोंदवता येईल.संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध असल्यास २४ तासांत जन्म दाखला देण्याची व्यवस्था 'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून केली जाणार आहे. शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमण व बेकायदेशीर वाहन पार्किंग हटवून सुलभ दळणवळण सुनिश्चित करण्यात येणार आहे. रस्ते स्वच्छ ठेवणे, वाहतूक व्यवस्था सुधारणा आणि सार्वजनिक जागांचे सौंदर्यीकरण हे देखील आराखड्यातील महत्त्वाचे मुद्दे आहेत. युवक-युवती साठी रोजगार व कौशल्य विकास युवक व युवतींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी कर्ज सुविधा, तसेच स्मार्ट ॲप्स व इनोव्हेशनसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामधून रोजगाराच्या संधी निर्माण करून तरुणांना सक्षम बनविण्यावर भर दिला जाणार आहे. शाळा व कोचिंग क्लास परिसरात मुलींना होणाऱ्या त्रासाच्या तक्रारींसाठी तक्रार पेटी बसविण्यात येणार असून प्राप्त तक्रारींचे थेट पोलिसांकडून निराकरण केले जाणार आहे. दामिनी व निर्भया पथकाकडून ठोस, भक्कम व परिणामकारक कारवाई अपेक्षित असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.नगराध्यक्ष पदाचा कारभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच निर्णयात दामिनी पथक अद्यावत करण्याचा आदेश देण्यात आला. महिला सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश नगराध्यक्ष उईके यांनी दिला. यवतमाळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि नागरिक यांच्या समन्वयातून हा १०० दिवसांचा आराखडा प्रभावीपणे राबविला जाईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शिवाजी गार्डन परिसरात पोलिसांची तत्काळ कारवाई

## वाहतूक पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांच्या पुढाकाराने गस्त वाढवली, रोड रोमिओंवर कारवाई नागरिकांनी व्यक्त केला समाधानाचा सूर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शहरातील शिवाजी गार्डन परिसरात समाजविघातक व अनुचित प्रकार घडत असल्याबाबत जनमाध्यम वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेत प्रभावी कारवाई केल्याचे चित्र समोर आले आहे. या संदर्भात वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांच्याशी संपर्क साधून वस्तुस्थितीची माहिती दिल्यानंतर त्यांनी तत्काळ संबंधित अवधूत वाडी पोलिस ठाण्याला सूचना देत आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिले.

त्याअनुषंगाने अवधूतवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत कार्यरत पोलिस कर्मचारी व 'चार्ली' पोलिस पथकाने शिवाजी गार्डन परिसरात सकाळी व रात्री नियमित गस्त सुरू केली. या गस्ती दरम्यान अनुचित वर्तन करणाऱ्या समाजविघातक प्रवृत्तींची चिडीमारी करत त्यांची हकालपट्टी करण्यात आली. पोलिसांच्या या सतर्कतेमुळे परिसरात कोणताही गैरप्रकार घडलेला नाही. विशेष म्हणजे नववर्षाच्या रात्रीपासून पोलिसांनी या परिसरात विशेष बंदोबस्त ठेवत थंडीच्या प्रतिकूल परिस्थितीतही आपली जबाबदारी चोख पार पाडली. चौकाचौकात पोलिसांची उपस्थिती, नियमित गस्त आणि दक्षतेमुळे नववर्षाचा स्वागत सोहळा शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडला. पोलिस प्रशासनाच्या तत्परते मुळे परिसरातील नागरिक, पालक व व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, सार्वजनिक ठिकाणी शिस्त व सुरक्षितता राखण्यासाठी अशाच प्रकारची सतत गस्त व नियंत्रण राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. शिवाजी गार्डन प्रकरणी पोलिसांनी दाखविलेली ही सकारात्मक भूमिका शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, प्रशासनाच्या सजगते मुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.



शिवाजी गार्डन परिसरात सकाळी व रात्री नियमित गस्त घालताना अवधूतवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी व चार्ली पथक. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेत परिसरात बंदोबस्त वाढविल्याने अनुचित प्रकारांना आळा बसला आहे.

"शिवाजी गार्डन परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने कॅमेरे बसवणे व चौकी उभारणे आवश्यक असल्याबाबत सुमारे दहा दिवसांपूर्वीच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी (CO) यांच्याशी चर्चा करण्यात आली आहे. यासाठी निधीची तरतूद होत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. मात्र नगरपरिषदेकडून वेळेत कार्यवाही न झाल्यास, पोलिस विभागाच्या जनसंपर्क (PR) माध्यमातून आवश्यक उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल."
**– ज्ञानोबा देवकते, पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, यवतमाळ**

# वेचक



## ग्रामस्वच्छता–प्रबोधनातून सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयाने गावकऱ्यांसह साजरे केले नववर्ष

यवतमाळ - युवकांनी नव्या वर्षाचे स्वागत विधायक उपक्रमांतून करावे, व्यसनापासून दूर राहावे आणि समाजाशी नाते दृढ करावे या उद्देशाने सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या नववर्ष आरंभ उपक्रमाचे यंदाचे १८ वे वर्ष उत्साहात पार पडले. यंदाही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ही सामाजिक परंपरा अखंड ठेवत तब्बल ९ गावांमध्ये जाऊन गावकऱ्यांसह नववर्ष साजरे केले. जांब, गणगाव (ता. आर्णी), फाळेगाव, गळव्हा, घारफळ (ता. बाभूळगाव), हिरडी, आमला, तीरझडा व राजुर (ता. कळंब) या गावांमध्ये ३१ डिसेंबर रोजी दुपारपासून विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. प्रत्येक गावात शेतकरी, शेतमजूर, युवक व महिलांसोबत संवाद बैठका घेऊन स्थानिक समस्या जाणून घेतल्या व त्यावर संभाव्य उपायांवर चर्चा केली. रात्री प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम, गीत–नृत्य व सादरीकरणातून प्रसन्न वातावरणात नववर्षाचे स्वागत करण्यात आले. १ जानेवारी रोजी ग्रामस्वच्छता अभियान राबवून टाळ,मृदंग,ढोलकीच्या गजरात ग्रामदिंडी काढण्यात आली. गावकऱ्यांनी रांगोळ्यांद्वारे पारंपरिक पद्धतीने नववर्षाचे स्वागत केले. व्यसनमुक्ती,अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या सामाजिक विषयांवरील पथनाट्ये व भूमिका नाट्यांमधून मनोरंजनासोबत प्रभावी प्रबोधन झाले. शाळा व ग्रामपंचायतीत वृक्षारोपण करण्यात आले.

## युवा ग्रामीण पत्रकार संघ ढाणकी अध्यक्षपदी गजानन आजेगावकर, उपाध्यक्षपदी शेख शाहरूख शेख आलम तर सचिवपदी शेख इरफान शेख गुलाब




ढाणकी - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात ढाणकी युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये युवा ग्रामीण पत्रकार संघाची २०२६ - २७ ची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे मावळते अध्यक्ष शेख इरफान शेख गुलाब यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांच्या अध्यक्षते खाली नवीन कार्यकारिणीचे गठन करण्यात आले असून युवा ग्रामीण पत्रकार संघ पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी गजानन चंद्रकांत आजेगावकर, उपाध्यक्षपदी शेख शाहरूख शेख आलम तर सचिवपदी शेख इरफान शेख गुलाब यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यांची अविरोध निवड करण्यात आली. यावेळी सदस्य म्हणून मिलींद चिकाटे, बन्टी फूलकोडवार, प्रशांत आरेवाड, राजू गोपेवाड, उपस्थित होते.

## झरी-जामणी येथे दुचाकी अपघातात तरुण व्यावसायिकाचा मृत्यू



झरी - जामणी तालुक्यातील पाटणबोरी येथील रहिवासी राहुल अशोक बोगावार (वय ३०) यांचा गुरुवारी रात्री झालेल्या भीषण दुचाकी अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण झरी-जामणी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. राहुल बोगावार हे झरी-जामणी येथे इलेक्ट्रॉनिक व मोबाईल दुरुस्ती तसेच विक्रीचा व्यवसाय करीत होते. गुरुवारी रात्री सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास माथार्जुन–बोरी मार्गावर, अंदाजे ९०० मीटर अंतरावर त्यांच्या दुचाकीला (क्र. एम.एच.२९ सी.एच. ६६६२) अपघात झाला. अपघातात राहुल बोगावार यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे प्राथमिक माहितीतून स्पष्ट झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अमलदार रितेश वानखेडे, सचिन गाडगे, हेमंत कामतवार व अरविंद जाधव यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह शवविच्छेदनासाठी झरी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे पाटणबोरी तसेच झरी-जामणी परिसरात शोककळा पसरली असून, तरुण व्यावसायिकाच्या अकाली मृत्यूमुळे कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. अपघात नेमका कशामुळे झाला, याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# प्रधानमंत्री आवास योजनेचे थकीत अनुदान दोन दिवसांत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार : नगराध्यक्ष सुनंदा कोपरकर



**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव : महागाव नगरपंचायत हद्दीत प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) सन 2017-18 पासून प्रभावीपणे राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत थकीत अनुदान येत्या दोन दिवसांत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी दिली. महागाव शहरासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन डीपीआर मंजूर असून, पहिल्या डीपीआरमध्ये 275, दुसऱ्यात 401 तर तिसऱ्यात 180 लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. नगरपंचायतीमार्फत नियुक्त सेवाभावी संस्थेच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य शासनाच्या निकषांनुसार लाभार्थ्यांची निवड झाली आहे. मागील काही वर्षांपासून निधीअभावी अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले होते. मात्र, आता बांधकाम पूर्ण केलेल्या साडेतीनशेहून अधिक लाभार्थ्यांच्या खात्यात टप्प्याटप्प्याने निधी जमा केला जाणार आहे. नगरपंचायतीने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने महागाव नगरपंचायतीला सुमारे 2 कोटी 85 लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीचे वाटप पूर्वीप्रमाणेच समान व नियमाप्रमाणे केले जाईल, असेही नगराध्यक्षांनी स्पष्ट केले. अनेक लाभार्थ्यांनी उसनवारी करून घरकुलांचे बांधकाम पूर्ण केले असल्याने त्यांना दिलासा मिळणार आहे. उपाध्यक्ष प्रमोद रामराव भरवाडे यांनी कोणत्याही अफवांना बळी न पडण्याचे आवाहन करत, योजनेत कोणत्याही कर्मचाऱ्याने पैशांची मागणी केल्यास तात्काळ तक्रार करण्याचे सांगितले. नगरपंचायतचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली निधी वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचा एकही पात्र लाभार्थी अनुदानापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या निधीसाठी पात्र असलेल्या नागरिकांनी व लाभार्थ्यांनी आपले कडील नगरपंचायतची थकीत करवसुली नियमित करावी असे आवाहन सुद्धा महागाव नगरपंचायत चे नगरसेवक महेश गजानन पाटील यांनी केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात निधी टाकण्याची कार्यवाही महागाव नगरपंचायतचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनात त्यांचे कर्मचारी करीत आहेत.

## शेतकरी आत्महत्या मिशन उभारी अंतर्गत आर्णी तहसीलची जोरदार कामगिरी

# तालुक्यात तब्बल ६० लाभार्थी कुटुंबांना मदतीचे वाटप



**जनमाध्यम प्रतिनिधी**

आर्णी - तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांचे मार्गदर्शनाखाली संपूर्ण तालुक्यात तब्बल साठ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील वारसांना मदत देण्यात आली. शेतकरी आत्महत्या मिशन उभारी अंतर्गत ही मदत 1 जानेवारी 2026 वर्षारंभाच्या दिवशी देण्यात आली आहे.

तहसील कार्यालय आर्णी अंतर्गत मिशन उभारी या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना विविध योजनांचा लाभ देणे संदर्भात आज 1जानेवारी नवीन वर्षाच्या निमित्ताने मागील पाच वर्षात झालेल्या आत्महत्याग्रस्त कुटुंबांना तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कृषी अधिकारी कार्यालय व हाजी नासिर यांच्या सहकार्याने किराणा किट व ब्लँकेट चे वाटप करण्यात आले.

यामध्ये संपूर्ण तालुक्यातून 60 लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला. आर्णी तालुक्यातील विविध गावातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना गावोगावी जाऊन तसेच तहसील कार्यालय आर्णी येथे ही मदत देण्यात आली आहे. शेतकरी आत्महत्या मिशन उभारी अंतर्गत तहसील कार्यालय आर्णी, कृषी अधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय तसेच हाजी नासिर यांच्या मार्फत विविध संसार उपयोगी साधनातून ही मदत देण्यात आली आहे. आर्णीचे तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांनी यापूर्वीही अनेक समाजउपयोगी कार्यक्रम राबविले आहे. त्यामुळे गरीब व गरजू लोकांना वेळोवेळी मदत मिळू शकली आहे. आर्णी तालुक्यातील कुऱ्हा, तळणी, जवळा, खेड, ब्राह्मणवाडा, लोणी, मौजा भंडारी शिवार, नाईक नगर हेटी, सेलू व इतर गावात 2026 या वर्षाच्या पहिल्या दिवशी एक जानेवारीला विविध संसार उपयोगी साहित्याची मदत देण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून मिशन उभारी अंतर्गत, आर्णी तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी 1जानेवारीला, आर्णी तालुक्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त वारस कुटुंबीयांना मदत करून आनंदित करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये तालुक्यातील अनेक गावातील लाभार्थ्यांना किराणा किट व मायेची ऊब म्हणून थंडीच्या दिवसांत ब्लँकेट वाटप करण्यात आले. यावेळी विशेष करून हाजी नासिर यांनी सुद्धा सहभाग घेतला, सर्वांचे धन्यवाद व तालुक्यातील जनतेस नवीन वर्षाच्या शुभेच्छा. **– वैशाख वाहूरवाघ, तहसीलदार आर्णी**

# स्वीकृत सदस्य म्हणून काँग्रेस जाफरखान यांना संधी देण्याची मागणी

## काँग्रेस नेत्यांकडे साकडे

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत काँग्रेसने १५ जागांवर विजय मिळवत आपले नवे वर्चस्व निर्माण केले आहे.आता या यशानंतर नगर परिषदेत मुस्लिम समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य प्रतिनिधित्व मिळावे आणि प्रलंबित विकासकामांना गती मिळावी, यासाठी मुस्लिम समाजातून एका स्वीकृत सदस्याची निवड करण्याची मागणी जोर धरत आहे.

या पदासाठी काँग्रेस अल्पसंख्याक आघाडीचे शहराध्यक्ष आणि प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते जाफर खान अफसर खान यांचे नाव आघाडीवर असून, समाजाच्या वतीने त्यांच्या नावाचा प्रस्ताव पक्षश्रेष्ठींकडे मांडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३, १४, १५ आणि १६ या मुस्लिम बहुल भागात काँग्रेसला अपेक्षित यश मिळवून देण्यातजाफर खान यांनी मोलाची



भूमिका बजावली. नियोजित प्रचार यंत्रणा आणि जनसंपर्काच्या जोरावर त्यांनी या प्रभागांमध्ये काँग्रेसचा झेंडा फडकविण्यासाठी मेहनत घेतली. आता त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी द्यावी, असा सूर मुस्लिम समाजातून आणि त्यांच्या कार्यकर्त्यांत उमटत आहे. जाफर खान यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात यावी, यासाठी आमदार बाळासाहेब मांगुळकर, जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष प्रफुल मानकर, माजी मंत्री शिवाजीराव मोघे,काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे आणि इतर वरिष्ठ नेत्यांकडे मुस्लिम समाजाच्या वतीने मागणी करण्यात आली आहे. काँग्रेसच्या विचारधारेशी वर्षानुवर्षे एकनिष्ठ राहून त्यांनी सर्वधर्मीय समाजासाठी केलेल्या कार्याचा हा सन्मान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जाफर खान यांना नगर परिषदेत पाठवल्यास मुस्लिम बहुल भागातील नागरी समस्या मार्गी लागतील. नियोजनबद्धरित्या विकासकामांची अंमलबजावणी होईल.समाजाला स्थानिक प्रशासनात हक्काचे प्रतिनिधित्व मिळेल.अशी भावना मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी व्यक्त केली आहे. आता काँग्रेसचे वरिष्ठ नेतृत्व या जनभावनेचा किती गांभीर्याने विचार करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# संकल्प करणे सोपे पूर्णत्वास नेणे कठीण ; सुभाष कोसलगे

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - सर्व विद्यार्थ्यांनी विचारपूर्वक संकल्प सादर केले हि आनंदाची बाब आहे परंतु तो पूर्णत्वास नेण्यास जिद्द,चिकाटी,संयम,सातत्य,निरंतर स्मरण व सतत प्रयत्नशील असणे आवश्यक आहे त्यामूळे घेतलेला संकल्प पूर्णत्वास नेण्याचा निर्धार करून पूर्णत्वास नेऊन परिवार, विद्यालय, समाज व राष्ट्राचे नावलौकिक करा असे प्रतिपादन प्रमुख अतिथी संस्थाध्यक्ष सुभाषभाऊ कोसलगे यांनी केले.

मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार माध्यमिक विद्यालय श्रीरामपूर येथे दरवर्षी प्रमाणे नववर्ष दिन संकल्प दिना म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुख्याध्यापक गणेश धर्माळे, विशेष अतिथी, बाळकृष्ण



मंदाडे व सुनीता चव्हाण विनोद पदघने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज व क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी चंचल राठोड,चांदणी आडे, नेहा राठोड यांनी सुरेल आवाजात स्वागतगीत सादर केले. मान्यवरांनी संपूर्ण वर्गातील रांगोळी,फलकलेखन, सुबक चित्रे व चार्ट, फुगे,पताका, रंगरंगोटी व वर्ग स्वच्छता विद्यार्थ्यांचे संकल्प सादरीकरण यांची पाहणी केली. यावेळी प्रमुख अतिथी बाळकृष्ण मंदाडे यांनी ०१ जानेवारी रोजी भारतातील मुलींची पहिली शाळा क्रांतिज्योती सावित्री फुले व क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी स्थापन केल्याचे स्मरण देऊन शिक्षणासह नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करा, ध्येय निश्चित करा, अडचणींवर मात करायला शिका एकमेकास सहकार्य करा असे आवाहन केले, विशेष अतिथी सुनीता चव्हाण यांनी विद्यार्थी जीवनात प्रत्येक दिवस नवीन समजून काहीतरी शिकण्याचा व सुप्त गुणांना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी देणारा असतो असे समजून जीवनाची वाटचाल करा असे मत व्यक्त केले तर विनोद पदघने यांनी आपल्यातील दुर्गुण व व्यसन असल्यास कायमचे काढून टाकण्याचा संकल्प करून शिक्षणासह प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवून जीवन सफल करा असे विचार प्रगट केले.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकडून गरजूंना ब्लँकेट वाटप



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - गेल्या काही दिवसांपासून राज्यात थंडीची तीव्र लाट असून, या पार्श्वभूमीवर गरजू व्यक्तींना मदतीचा हात देण्यासाठी येथील शिवरामजी मोघे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला. "उघड्या-नागड्यांना वस्त्र" या वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराजांच्या शिकवणीनुसार समाजोपयोगी कार्य करण्याचा नववर्षाचा संकल्प करीत स्वयंसेवकांनी गरजूंना ब्लँकेट वाटप केले.

थंडीच्या रात्री पुलाखाली, रस्त्याच्या कडेला, दुकानांसमोर तसेच बसस्थानक परिसरात झोपलेल्या गरजूंना ब्लँकेट देण्यात आले. यासोबतच काही निराधार वृद्धांची माहिती घेऊन त्यांच्या घरीही ब्लँकेट वाटप करण्यात आले. मागील वर्षीही अशाच प्रकारे थंडीच्या काळात हा उपक्रम राबविण्यात आला होता. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी यांनी सांगितले की, "थंडीच्या काळात गरजूंना मदत करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. स्वयंसेवकांनी घेतलेले परिश्रम निश्चितच कौतुकास्पद आहेत." या उपक्रमाचे महाविद्यालयाचे संस्था सचिव मा. विजयराव मोघे, प्राचार्य डॉ. अजय सोळंके तसेच शहरातील नागरिकांनी कौतुक केले. मागील वर्षीप्रमाणेच हा उपक्रम पुढेही सुरू राहावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी व डॉ. उषा राखुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेयस राठोड, कु. साक्षी भोयर, कु. कोमल सपाटे, कु. फिजा खान, कु. पुनम पुजारी, कु. निकिता झाडे, अंकिता झाडे, अनुष्का इंगोले, जयश्री गुमुलवार, अन्सर सय्यद, आदित्य राऊत व जयंत वासरीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# न.प.पाण्याची टाकी 'ओव्हर फ्लो' झाल्याने पाण्याचा मोठा अपव्यय

## नगर प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांचा संताप अनावर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - शहरातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना रांगा लावाव्या लागत असताना, दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागात शुद्ध पेयजल अक्षरशः रस्त्यावर वाहत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पुसद नगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचे हे जिवंत उदाहरण सध्या टिळकनगर परिसरात पाहायला मिळत आहे.

टिळकनगर येथे असलेली तब्बल २० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी गेल्या तीन दिवसांपासून रात्रीच्या वेळेस सातत्याने ओव्हरफ्लो होत आहे. टाकी भरल्यानंतर पंपिंग तात्काळ बंद करणे अपेक्षित असताना, संबंधित कर्मचारी आणि अधिकारी मात्र नेहमीप्रमाणे गाफील असल्याचे



स्पष्ट झाले आहे. परिणामी शुद्धीकरण प्रक्रिया पूर्ण झालेले मौल्यवान पेयजल रस्त्यावरून खळाळत वाहत असून, मोतीनगर बगिच्याच्या समोरील संपूर्ण रस्ता जलमय झाला आहे. पंपिंग पूर्ण झाल्यानंतर टाकीवर नियुक्त कर्मचाऱ्यांनी वेळीच सूचना देणे व पंप बंद करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेला हा प्रकार पाहता, नगर प्रशासनाला पाण्याची किंमत आणि नागरिकांच्या गरजांशी काहीही देणेघेणे नसल्याचे स्पष्ट होते. शुद्ध पेयजलाचा असा उघड अपव्यय सुरू असताना प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत मोतीनगर गृहनिर्माण सोसायटीचे अध्यक्ष रवी देशपांडे यांनी पाणीपुरवठा अभियंता माधव पाटील यांच्याशी संपर्क साधून गंभीर बाब निदर्शनास आणून दिली. मात्र माहिती देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब अधिक संतापजनक आहे. शहरात सध्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष पदारूढ व्हायचे आहे तर मुख्याधिकारी अतुल पंत यांचे अमरावती येथे स्थानांतरण झाल्याने पुसद नगरपालिकेला सध्या अक्षरशः 'वालीच नाही' अशी अवस्था निर्माण झाली आहे. एकीकडे तहानलेले नागरिक आणि दुसरीकडे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे वाहून जाणारे पाणी, हा विरोधाभास पुसद नगरपालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. या प्रकाराबद्दल मोतीनगर मधील नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# स्वयंशिस्त अंगीकारल्यास अपघातांचे प्रमाण घटेल-अरविंद देसाई

## रस्ता सुरक्षा अभियान २०२६ ला अमरावतीत प्रारंभ



**अमरावती/का.प्र.**

'वाहन चालविताना स्वयंशिस्त अंगीकारल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होऊ शकते. चालकांनी मोबाईलचा वापर टाळावा, तसेच चारचाकी वाहनचालकांनी अवश्य सीट बेल्टचा वापर करावा,'असे प्रतिपादन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी अरविंद देसाई यांनी केले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयात 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६' चा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी लेखाधिकारी गजानन देशमुख, सहायक मोटार वाहन निरीक्षक कांचन जाधव, स्वीय सहायक प्रदीप गुडदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या अभियानाचे उद्घाटन करताना देसाई बोलत होते.कार्यक्रमाला आरटीओ कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक, डीलर असोसिएशनचे सदस्य व वाहनचालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. 'महिनाभर राबविण्यात येणारे हे अभियान प्रत्यक्षात वर्षभर चालू असते. वाहनचालकांना वेळोवेळी वाहतुकीचे नियम, सुरक्षा उपाय आणि मार्गदर्शक सूचना देण्यात येतात. वाढत्या अपघातांना आळा घालणे हेच या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट आहे,' असेही देसाईंनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान वाहतूक चिन्ह पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. मोटार वाहन निरीक्षक दर्शना पिंपळकर, अंकिता सराफ, दिशा आढाव, ऐश्वर्या बळखंडे, अक्षय राठोड, अभिजित गावंडे, यशवंत रामटेके, संजय चौधरी, प्रमोद राजनेकर, मीनल गिरे, संगीता भिलावेकर, चौधरी, खोब्रागडे, साजिद अली, पराग जाधव, आशिष मातुरकर, रश्मिता पवार, वर्षा कोटरंगे, प्रीती मेहेत्रे, अश्विनी वानखडे, शिला रणदिवे, अरुण वाघमारे, अमोल माटोडे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले, तर आभार सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमोल बोरे यांनी मानले.'सडक सुरक्षा – जीवन रक्षा' ही यंदाच्या रस्ता सुरक्षा अभियानाची थीम असून, सुरक्षित वाहतूक संस्कृती रुजविण्याचा निर्धार या उपक्रमातून व्यक्त करण्यात आला.

## अ.भा. आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती/का.प्र.**



भारथीदासन युनिर्व्हसिटी, पलकालैपेरुर, तिरुचिरापल्ली (तामिळनाडू) येथे १४ ते १७ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉल बॅडमिंटन (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूंमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, आसेगांव पूर्णाचा सौरभ राखुंडे, भूषण गायगोले व प्रफुल्ल पचारे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा पवन चुटे व यश रंगारी, मानव स्कुल ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, व्याळाचा श्रेयस देशमुख, प्रो. राम मेघे इन्स्टिटट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड रिसर्च, बडनेराचा ओम लंगोटे व रुपेश ठाकरे, आर.आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शीचा क्रिश कांबळे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा साहील राऊत व ऋषिकेश घोडेस्वार, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा मोरेश्वर महल्ले, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोडचा क्रिश जयस्वाल व तिलक तिवारी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा ज्ञानेंद्र प्रताप याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. पुरुष व महिला चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे ०२ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## ब्राह्मणवाडा गोविंदपूर येथे जिल्हास्तरीय कब बुलबुल उत्सव

### जिल्हातील ४२पथकातील ३००विद्यार्थी सहभागी

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण विभाग अमरावती व अमरावती भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ व २७ डिसेंबर २०२५ या कालावधीत दुसऱ्या कब बुलबुल उत्सवाचे आयोजन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा गोविंदपुर ता. जि.अमरावती येथे करण्यात आले. कब बुलबुल उत्सवाचे उद्घाटन सतीश मुगल, शिक्षणाधिकारी प्राथमिक तथा जिल्हा मुख्य आयुक्त यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रवींद्र निंघोट मुख्याध्यापक उच्च प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा गोविंदपुर हे होते या उद्घाटनाप्रसंगी मुख्य अतिथी निखिल मानकर उपशिक्षणाधिकारी माध्यमिक तथा जिल्हा सचिव, इम्रान खान, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक, माननीय प्रवीण दिवे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष, माननीय सुनिता इथापे जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड, माननीय संजय रामावत जिल्हा प्रशिक्षण



आयुक्त स्काऊट, गोकुळदास राऊत (अध्यक्ष )जि. प. अमरावती शिक्षक सहकारी बँक लिमिटेड अमरावती, स्नेहलताई भुयार, सरपंच राजेंद्र भोयर उपसरपंच तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रेम कुमार बागडे उपाध्यक्ष प्रशांत धोत्रे, श्रीरामजी बनसोड (सेवानिवृत्त) मुख्याध्यापक हरिश्चंद्रजी खौर गटशिक्षणाधिकारी (सेवानिवृत्त) अतिथी म्हणून उपस्थित होते. कब बुलबुल उत्सवाची सुरुवात लॉर्ड बेडन पावेल, लेडी बेडन पोवेल व सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा पूजन करून व मान्यवरांचे स्वागत करून करण्यात आले. यानंतर बुलबुल यांनी पोत्याची शर्यत, लिंबू चमचा, बॉल गेम, हस्त कौशल्य, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमाचा आनंद घेतला बुलबुल उत्सवात दुसऱ्या दिवशी भव्य दिव्य अशा ङशोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. शोभायात्रेमध्ये विविध शाळांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारे कार्यक्रम सादर केले.बक्षीस वितरण समारंभ माननीय रविकांत जी वानखडे, सेवानिवृत्त (प्राचार्य,)जिल्हा संघटक गाईड प्रीती गोल्हार, एस.पी. आठवले, जिल्हा संघटक स्काऊट,डॉ.देवकी औगड, सहसचिव,दिनेश शर्मा, मुख्याध्यापक, रामविलास मुंदडा विद्यालय, उदखेड, विजय भनग मुख्याध्यापक छत्रपाल भुयार विद्यालय ब्राह्मणवाडा, रवींद्र निंघोट मुख्याध्यापक (मेळावा स्वागताध्यक्ष,)गावातील सन्माननीय सरपंच उपसरपंच यांच्या उपस्थितीत वितरण करण्यात आले.या कब बुलबुलउत्सवांमध्ये अमरावती जिल्ह्यातील ४२ पथकातील ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी सानप यांनी केले. प्रास्ताविक एस. पी आठवले जिल्हा संघटक स्काऊट यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रीती गोल्हार जिल्हा संघटक गाईड यांनी केले. या कब बुलबुल उत्सव यशस्वी करिता दादाराव भोंगळे, कार्यालयीन कर्मचारी उमेश नवरे, प्रीती नन्नावरे, नंदकिशोर रामावत, संतोष खारोडे,स्वप्निल रोडगे, प्रेमदास बागडे, मिलिंद रंगारी यांनी कार्य केले. बक्षीस वितरण व प्रमाणपत्र वाटप करून उत्सवाचे सांगतात करण्यात आला या कब बुलबुल उत्सव यशस्वी ते करिता जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा गोविंदपुर व छत्रपती भुयार विद्यालय ब्राह्मणवाडा येथील सर्व सन्माननीय सभासदांचे मोठे सहकार्य लाभले.

## एम.बी.ए. विभागाच्या विद्यार्थीनींना कलर कोट पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**



संत गाडगे बाबा अमरवती विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन (एम.बी.ए.) विभागाच्या विद्यार्थीनी समिक्षा घाटोळ व पल्लवी वानखडे यांच्या 'इन्नोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' या प्रकल्पाला कलर कोट पुरस्कार मिळाला आहे. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते सदर विद्यार्थीनींना पुरस्काराने गौरविण्यात आले.

विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत एम.बी.ए. विभागातील विकी कालबांडे, सोनाली खोब्रागडे, अभिषेक गुल्हाने याही विद्यार्थ्यांनी आपापले संशोधन प्रकल्प सादर केले होते. समिक्षा व पल्लवी यांनी सादर केलेल्या 'इन्नोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' प्रकल्पास पुरस्कार प्राप्त झाला. 'इन्नोव्हेशन : हिडन व्हॅल्यू ऑफ विड' या प्रकल्पात उपद्रवी तणापासून डास प्रतिबंधक स्प्रे आणि रुम फ्रेशनर अशी हर्बल उत्पादने तयार करण्यात आली आहेत. ही उत्पादने स्वस्त, पर्यावरणपुरक व लहान मुले तसेच मोठयांसाठी सुरक्षित आहेत. त्यामुळे सदर उत्पादने ही रासायनिक घरगुती वस्तुंना चांगला पर्याय ठरू शकतात. त्याचबरोबर घर, कार्यालये, शाळा, रुग्णालये, वसतिगृहे, सार्वजनिक ठिकाणी वापरण्यासाठी उपयुक्त असून पर्यावरणाशी संबंधित समस्या सोडविण्यास मदत होते. विद्यार्थ्यीनींच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

## अवैध गौणखनिजा विरोधात महसूल अॅक्शन मोडवर

**अचलपूर/वार्ताहर**

महसूल विभागाने रेती चोरी व विना पासेस गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्यां विरोधात मोहीम उघडली आहे. विविध पथके स्थापित केले असुन दिवसासह रात्री उशीरापर्यंत वाहनचालकांकडून रॉयल्टी तपासणी करण्यात येत आहेत.व विनापासेस असलेल्या वाहनावर कारवाऱ्या केल्या जात असल्याचे चित्र आहे.



रीतसर परवाना घेऊनच गौन खनिज वाहतूक करावी तसेच मध्य प्रदेश रेती वाहतूक पास व महाराष्ट्राची झीरो रॉयल्टी घेऊनच रेती व गौन खनिजाची वाहतूक करावी. पासेस क्षमतेपेक्षा अधिकची वाहतूक करू नये. नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे.

**-सुदर्शन सहारे,** तहसीलदार, अचलपूर

तालुक्यात गेल्या काही वर्षांमध्ये वाढलेल्या रेती चोरीच्या घटना व विनापासेस कीवा क्षमते अधिक गौनखनिज वाहतूक बघता महसूल विभागाकडून सुरू असलेले प्रयत्न आता गतिमान व अधिक सक्षमपणे सुरू केले आहे. नुकताच तहसीलदार पदाचा पदभार स्वीकारलेल्या सुदर्शन सहारे यांनी अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या बैठकीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना केल्यात.तसेच रेती चोरीच्या घटना व विनापासेस कीवा क्षमते अधिक गौनखनिज करणाऱ्यांची नाकेबंदी करण्याकरिता विविध चेकपोस्ट २४ तास वॉच ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत .अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन सहारे यांनी दिलेल्या सूचनानंतर सध्या चेक पोस्टवरील पथकाद्वारे सकाळपासुन मध्यरात्री सुद्धा रॉयलटी तपासणी ला वेग आला आहे. त्यामुळे अचलपूर तालुक्यात अवैध गौन खनिज वाहतुकीला आळा बसण्याच्या दृष्टीने महसूल विभागाने अधिक सक्षमपणे पावले उचलली असल्याचे बोलले जात आहे.

# वीज कनेक्शन हमखास वेळेत मिळण्यासाठी महावितरणची नवी व्यवस्था

**अमरावती/का.प्र.**

१ जानेवारी २०२६: ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीज पुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अर्जासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा



मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते.

सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महानगरांसाठी तीन दिवस, शहरांसाठी सात दिवस आणि ग्रामीण भागात १५ दिवसात कनेक्शन देण्याची तरतूद केली असली तरी ती जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, त्यासाठी ही कालमर्यादा आहे. विजेचे खांब उभारून व तारा जोडून वीज पुरवठा उपलब्ध करण्यासारखी पायाभूत सुविधांची कामे गरजेची असतील तर तेथे ९० दिवसात वीज जोडणी देण्याची कालमर्यादा आयोगाने निश्चित केली आहे.

नव्या वर्षात सुरुवात - महावितरणच्या प्रशासनाने केलेल्या सुधारणेमुळे नवीन वीज कनेक्शन देण्याच्या कामात गतीमानता येईल आणि अधिक पारदर्शकता येईल, असाही विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवे वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कोठे दिरंगाई होत असेल तर माहिती तंत्रज्ञानामुळे नेमक्या कोणत्या टप्प्यावर विलंब झाला हे समजेल. परिणामी एकूण प्रक्रियेची गती वाढविणे शक्य झाले आहे. महावितरणची ही व्यवस्था १ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली आहे.

## संक्षिप्त

### नागपूर विद्युत लोकपालपदी भालचंद्र खंडाईत



**अमरावती -** विद्युत क्षेत्रात सुमारे ३५ वर्षांचा अनुभव असणारे तसेच महावितरणचे सेवानिवृत्त संचालक भालचंद्र खंडाईत यांनी विदर्भ व मराठवाडा कार्यक्षेत्र असलेल्या नागपूर विद्युत लोकपाल पदाचा नुकताच कार्यभार स्वीकारला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांची नियुक्ती केली आहे. महावितरणचे नागपूर प्रादेशिक संचालक म्हणून त्यांनी प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागासह विदर्भामध्ये नवीन वीजजोडणी व विद्युतीकरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे केली. तसेच महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून भालचंद्र खंडाईत यांनी राज्यभरात राज्य व केंद्र शासनाच्या विविध प्रकल्पांना व योजनांना गती दिली.महावितरणचे संचालक म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर भालचंद्र खंडाईत यांची विद्युत नियामक आयोगाने नागपूर विद्युत लोकपालपदी नियुक्ती केली होती. या पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर खंडाईत यांची विद्युत लोकपाल म्हणून आयोगाकडून पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे.

### प्राथमिक शालेय व सांस्कृतिक क्रीडा महोत्सव



**खल्लार -**जि. प. पूर्व माध्यमिक शाळा, रोहना येथे नुकताच नांदगाव बिटस्तरीय शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजित करण्यात आले होते.या क्रीडा स्पर्धा मधे नांदगाव मांजरी म्हसला आणि शिवणी केंद्रातील केंद्रस्तरीय विजयी चमू सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पंकज फिसके, अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती उपस्थिती होते.महोत्सवाचे उद्घाटन प्रसाद संकपाळ, गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख अतिथी म्हणून निलेश ठाकरे , सहाय्यक गटविकास अधिकारी, अनिल कोल्हे, अविनाश आढाव, केंद्रप्रमुख, उपस्थित होते. उद्घाटणीय सोहळ्याच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचिन अवघड यांनी केले तर प्रास्ताविक अनिल कोल्हे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरज मंडे यांनी पार पाडले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रध्दा सार्वे यांनी केलं. तर आभार प्रदर्शन राजेंद्र बांडाबूचे यांनी केले.या महोत्सवातील जनरल चॅम्पियनशिप जिल्हा परिषद शाळा, शिवनी रसूलापूर यांनी पटकावून आपले खेळातील वर्चस्व सिद्ध केले.कार्यक्रमास शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

### नवीन वर्षानिमित्त भक्तिमय भजनसंध्या



**चांदूर रेल्वे-** येथुन जवळच असलेल्या निंभा (ता. चांदूर रेल्वे) येथे नवीन वर्षाच्या निमित्ताने भक्तिभावपूर्ण वातावरणात भजन संध्येचे आयोजन करण्यात आले होते. प्रमोद देशमुख यांच्या 'राजवाडा' तसेच स्व. नरहरी शेषराव देशमुख वाचनालयाच्या परिसरात हा कार्यक्रम झाला.या भजन संध्येत श्रद्धा आणि भक्तीचा सुरेख संगम पाहायला मिळाला. हरीपाठ व भजनांच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता. उपस्थित भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा आनंद घेतला.या कार्यक्रमाला भगवान डोंगरे, खडसे साहेब, बोरकर साहेब, श्रीकृष्ण मेश्राम साहेब, भार्गव देशमुख, पिंटू चव्हाण, गजानन श्रीरामे, दिलीप देशमुख, प्रमोद इंगळे, दिवाकर जाधव, निशांत देशमुख, उदय झाडे, हसंता, आकाश देशमुख, विशाल देशमुख, खुशाल ठाकर, रवींद्र जगताप आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात एकोप्याची भावना वृद्धिंगत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत पुस्तक प्रदर्शना



**चांदूर रेल्वे-**येथील राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांच्या हस्ते संपन्न झाले.हा कार्यक्रम ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच राजर्षी शाहू सायन्स व अतुल जगताप आर्ट्स कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक डॉ. एम. पी. वाघमारे, डॉ. जी. बी. संतापे (एनएसएस कार्यक्रम अधिकारी), डॉ. आर. एन. भगत (महिला कार्यक्रम अधिकारी, एनएसएस), पी. डब्ल्यू . चव्हाण व के. के. सोळंके यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. एस. ए. वाणी आणि स्व. अतुल जगताप माध्यमिक विद्यालय, चांदूर रेल्वेचे मुख्याध्यापक पी. एस. तळोकार यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.पुस्तक प्रदर्शनात विविध विषयांवरील दर्जेदार व माहितीपूर्ण पुस्तके मांडण्यात आली होती. महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे व वाचन संस्कृतीला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



अमरावती - महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिकिट वाटपावरून झालेल्या गदारोळात भाजपच्या पदाधिका-यांची अनेकांशी जुंपली. यावेळी कालीमाता संस्थानचे शक्ती महाराज यांनी भाजपच्या पदाधिका-यांनी संत महात्मांना शिव्याशाप दिल्याचा आरोप केला आहे. या बाबीमुळे सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत असून राजकमल येथे आज आंदोलन करण्यात आले. यावेळी शक्तीमहाराज यांच्यासह त्यांचे भाविक भक्त उपस्थित होते.

# भाजपाचे राजेश शादी यांचे नामांकन रद्द, ठाकरे अपक्ष

## निवडणूक आयोगाचा दणका

**अमरावती/का.प्र.**

महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १८ चे भाजप उमेदवार राजेश शादी यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये खळबळ उडाली आहे. भाजप उमेदवार राजेश शादी यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना संपत्तीचे विवरण सादर न केल्याने विरोधक उमेदवारांनी या प्रकरणाची तक्रार आणि आक्षेप नोंदवला होता. यात काँग्रेसचे उमेदवार मुन्ना राठोड आणि समीर जवंजाळ यांचा समावेश होता.

या दोघांनी बुधवारी सकाळपासून निवडणूक अधिकाऱ्यांना संपूर्ण कागदपत्रे आणि दस्तावेज सादर करून राजेश शादीच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. दिवसभर निवडणूक आयोगाकडून भाजप उमेदवार राजेश शादी यांच्या अर्जावर बारकाईने तपासणी सुरू होती. अखेरीस सायंकाळी निवडणूक आयोगाने राजेश शादी यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच याच प्रभागात भाजप उमेदवार अपर्णा ठाकरे यांनाही मोठा धक्का बसला आहे. तपासणीत अपर्णा ठाकरे यांच्या उमेदवारी अर्जामध्ये भाजप एबी फार्म नसल्याने निवडणूक आयोगाने अपर्णा ठाकरे यांना अपक्ष उमेदवार म्हणून घोषित केले आहे.

त्यामुळे प्रभाग क्रमांक १८ मध्ये भाजपला निवडणूक निकालापूर्वीच मोठा धक्का बसला आहे.

हा निर्णय निवडणूक अधिकारी आणि उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे यांनी जाहीर केला आहे.

# शहरातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता

## तीन माजी दिग्गज नगरसेवक मैदानातून बाहेर



**अमरावती/का.प्र.**

सन २०१७ मध्ये मनपा निवडणुकीत विजय मिळवून नगरसेवक झालेले तीन चर्चित व्यक्ती, दिनेश बूब, बलदेव बजाज आणि अब्दुल नाजीम, या वर्षीच्या मनपा निवडणुकीत सहभागी होत नाहीत. तीनही माजी नगरसेवकांनी वैयक्तिक कारणांचा हवाला देत या निवडणुकीत स्वतःचा सहभाग टाळला असून, त्यांनी आपले नामांकनही दाखल केले नाही. त्यामुळे मागील कार्यकाळातील या तिन्ही दिग्गजांचे नगरसेवक म्हणून योगदान पाहता, त्यांची अनुपस्थिती निवडणूक प्रक्रियेत विशेष लक्षवेधी ठरणार आहे. दिनेश बूब हे सलग चार वेळा नगरसेवक राहिले असून, मागील २० वर्षे अमरावती मनपाच्या सभागृहाचा भाग राहिले. मागील निवडणुकीत ते जवाहर स्टेडियम प्रभागातून एकमेव निर्दलीय नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यांनी कट्टर शिवसैनिक म्हणून ओळख मिळवली, नंतर प्रहार जनशक्ती पार्टीत प्रवेश केला आणि २०२४ च्या संसदीय निवडणुकीतही सहभाग घेतला होता. निवडणूक सुरू होण्याच्या काळात, अनेकांना अपेक्षा होती की ते सलग पाचवे कार्यकाळासाठी लढतील; परंतु त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, या वेळी ते निवडणूक लढणार नाहीत. भाजपाचे बलदेव बजाज, जे प्रभाग क्र. १८ (राजापेठ-संत कंवरराम) मधून २०१७ मध्ये पहिल्यांदाच नगरसेवक झाले होते, त्यांना या वेळी पक्षाची पाठबळ असूनही नामांकन टाळावे लागले. पारिवारिक कारणे आणि स्वास्थ्याच्या बाबींमुळे त्यांनी निवडणूक लढण्याचे निर्णय घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, पक्षाशी त्यांना काही नाराजी नाही, तसेच स्थानिक नेत्यांशी संबंध उत्तम आहेत: फक्त वैयक्तिक परिस्थितीमुळे त्यांनी निवडणूक टाळली. एमआयएमचे अब्दुल नाजीम, प्रभाग क्र. १६ (अलीम नगर-रहमत नगर) मधून नगरसेवक झाले होते आणि मागील कार्यकाळात पक्षाचे गटनेते राहिले, त्यांनीही या निवडणुकीत सहभाग घेतला नाही. एमआयएमने त्यांना टिकट निश्चित केलेले होते; परंतु स्थानिक गुटबाजी, पैनल निवडीतील मनमानी आणि दलातील अंतर्गत मतभेद यामुळे त्यांनी स्वतः ला निवडणूक प्रक्रियेतून दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सांगितले की, ते आजही पक्षाचे समर्पित कार्यकर्ते आहेत आणि असदुद्दीन ओवैसी यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवतात. तीन प्रमुख नगरसेवकांची अनुपस्थिती निवडणुकीच्या रंगभूमीवर मोठा परिणाम करणार आहे. त्यांच्या जागी नवीन, युवा आणि उदयोन्मुख चेहरे मैदानात येणार आहेत. यामुळे निवडणुकीतील समीकरण बदलण्याची शक्यता आहे, तसेच अमरावतीच्या स्थानिक राजकारणावर याचा खोल परिणाम जाणवणार आहे.

# अमरावती महानगरपालिकेत होणार चौरंगी लढत

**अमरावती/का.प्र.**

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीतील रंगत आता वाढू लागली आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर महायुती आणि महाविकास आघाडी अशी सरळ लढत होईल, असे चित्र होते, परंतु उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आणि महायुती, महाविकास आघाडीमध्ये नाट्यमय घडामोडी घडल्या. निवडणुकीचे चित्र बदलले. महायुतीत फूट पडून चारही पक्ष एकमेकांविरोधात उभे ठाकले. महाविकास आघाडीत काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटात समझोता झाला, पण राष्ट्रवादी शरद पवार गट दूरच राहिला. नवीन समीकरणांमुळे मात्र प्रस्थापितांची धाकधूक वाढली असून बहुतांश ठिकाणी चौरंगी लढतींची शक्यता आहे.

महायुतीचे चारही घटक पक्ष (भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि युवा स्वाभिमान पक्षएकमेकां विरुद्ध उभे ठाकल्यामुळे भाजपच्या पारंपरिक मतपेढीमध्ये फूट पडण्याची शक्यता आहे. अनेक प्रभागांमध्ये मित्रपक्षांचेच उमेदवार समोरासमोर आल्याने मतांचे विभाजन होईल, ज्याचा थेट फटका प्रस्थापितांना बसू शकतो. भाजपने ७९ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत.

### काँग्रेसमध्ये संधी आणि आव्हान

काँग्रेसने अमरावतीत आपली ताकद ओळखून ७५ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. शिवसेना ठाकरे गटासोबत युती करताना काँग्रेसने स्वतःकडे झुकते माप ठेवले आहे, तर मित्रपक्ष ठाकरे गटाला केवळ १२ जागा मिळाल्या आहेत. काही जागांवर या दोन पक्षांमध्ये मैत्रिपूर्ण लढती होणार आहेत. हे चित्र मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करू शकते आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहावर पाणी फेरू शकते. काँग्रेसची संपूर्ण मदार माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या नियोजनावर आहे. अमरावती शहरात मुस्लिम आणि दलित मतदारांची संख्या लक्षणीय आहे. काँग्रेसने या मतदारांवर लक्ष केंद्रित केले आहे. मात्र, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी-संयुक्त मंच यांसारख्या पक्षांमुळे काँग्रेसच्या या पारंपरिक मतांमध्ये घट होऊ शकते.

### अजित पवार गटाचे 'एकला चलो'

महायुतीत (भाजप-शिवसेना शिंदे गट-युवा स्वाभिमान) जागावाटपाचे घोडे अडकले होते, पण, त्याआधीच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके यांनी स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे त्यांना आपल्या कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात संधी देता आली. त्यांच्या या निर्णयामुळे भाजप आणि शिंदे गटाच्या मतांमध्ये मोठी घट होण्याची भीती महायुतीच्या नेत्यांना आहे. अजित पवार गटाने काही प्रभागांत अल्पसंख्याक आणि बहुजन उमेदवारांना प्राधान्य दिले आहे. पक्षाचा 'सेक्युलर' चेहरा कायम ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

### नाराजांचा रोष, ऐनवेळी पक्षांतर

भाजपमध्ये उमेदवारीबाबत कमालीची गोपनीयता पाळण्यात आली होती.

# सार्वत्रिक निवडणूक कामकाजाबाबत महानगरपालिकेत आढावा बैठक



**अमरावती/का.प्र.**

निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी २ जानेवारी २०२६ रोजी येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक कामकाजाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची सविस्तर आढावा बैठक घेतली. ही बैठक ऑनलाईन अमरावती महानगरपालिकेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती.

बैठकीदरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक प्रक्रियेतील सर्व टप्प्यांचा सखोल आढावा घेतला. मतदान केंद्रांची निश्चिती, मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मनुष्यबळ नियोजन, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, निवडणूक साहित्याचे वितरण व संकलन, मतमोजणीची तयारी तसेच आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी या सर्व बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज करण्याचे निर्देश देत आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यावर विशेष भर दिला. कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

तसेच, संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांबाबत विशेष खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय ठेवून आवश्यक उपाययोजना करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. मतदारांना मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त दादाराव डोलारकर, ऑनलाईन पध्दतीने सात झोनचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच निवडणूक कामकाजाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या आढावा बैठकीमुळे अमरावती महानगरपालिकेतील सार्वत्रिक निवडणूक तयारीला अधिक गती मिळाली असून, निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# जनताच योग्य उत्तर देते?

**माझ्या माय-बाप जनतेला,**
**हे पत्र लिहिताना मन शांत नाही.**
**कारण आज जे घडलं आहे,**
**ते फक्त माझ्याबाबत नाही..**
**ते थेट तुमच्याबाबत आहे.**
**२०१२ साली माझा पक्ष अडचणीत होता.**
**त्यावेळी पक्षाला उमेदवार मिळत नव्हते.**
**अवघड प्रभागात उभे राहण्याचे धाडस**
**कोणीही करत नव्हते.**
**त्या काळात मी स्वतःचा विचार केला नाही.**
**मी माझ्या घराचा विचार केला नाही.**
**मी फक्त एकच विचार केला**
**माझा पक्ष कुठेही कमजोर पडता कामा नये.**
**म्हणून मी सर्वांत अवघड अशा**
**प्रभाग १३ मध्ये**
**माझ्या पत्नीला निवडणुकीच्या रिंगणात उभे केले.**
**निकाल आमच्या बाजूने लागला नाही.**
**थोडक्या मतांनी पराभव झाला.**
**पण त्या पराभवातही**
**माझी निष्ठा पराभूत झाली नाही.**
**माझा पक्ष मागे पडू दिला नाही.**
**आज मात्र परिस्थिती वेगळी आहे.**
**आज मला बाजूला केले गेले.**
**का? याचे उत्तर दिले गेले नाही.**
**माझी चूक काय ते सांगितले गेले नाही.**
**फक्त नाव काढण्यात आले.**
**दुःख पद गेल्याचे नाही.**
**दुःख आहे ते**
**निष्ठेला किंमत उरली नाही याचे.**
**मी सौदेबाजी केली नाही.**
**मी मलीद्यासाठी कधी हात पसरला नाही.**
**मी राजकारणाला बाजार बनू दिला नाही.**
**तरीही मी अपात्र ठरलो.**
**आज अनेक नागरिक मला विचारतात..**
**'आता काय?'**
**त्या प्रश्नाचे उत्तर**
**माझ्याकडे नाही.**
**आणि हीच**
**माझी सर्वात मोठी वेदना आहे.**
**मी अपयशी ठरलो नाही.**
**पण माझ्या प्रामाणिकपणाची**
**दखल घेतली गेली नाही.**
**आज मी उमेदवार नाही.**
**पण मी अजूनही**
**तुमचाच आहे.**
**पद तात्पुरते असते.**
**पण नाते कायमचे असते.**
**काळ सगळ पाहतो.**
**जनता सगळ लक्षात ठेवते.**
**आणि योग्य वेळी**
**योग्य उत्तर देते.**
**तोपर्यंत, तुमचाच...**

**अजय सारसकर**
प्रभाग क्रमांक १३.

*महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर*

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उद्या शहरात रोड शो

**अमरावती/का.प्र.**

आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जनता पक्षाने प्रचाराच्या औपचारिक सुरुवातीची तयारी तीव्र केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ४ जानेवारी रोजी अमरावती शहरात भव्य रोड शो करून भाजपच्या निवडणूक प्रचाराची सुरुवात करतील. भाजपच्या सूत्रांनी या भेटीला दुजोरा दिला.



अमरावतीमध्ये मुख्यमंत्र्यांचा रोड शो हा भाजपसाठी एक जोरदार प्रचार मोहीम मानला जात आहे. प्रचाराच्या सुरुवातीला मुख्यमंत्र्यांची उपस्थिती पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवेल आणि भाजपसाठी अनुकूल निवडणूक वातावरण निर्माण करेल असा पक्ष नेतृत्वाचा विश्वास आहे. मुख्यमंत्र्यांचे वेळापत्रक अंतिम करण्यात आले आहे आणि रोड शोसाठी मार्ग अंतिम करण्याचे काम सुरू आहे.

मुख्यमंत्र्यांच्या प्रस्तावित रोड शोसाठी सर्व भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते एक व्यापक योजना आणि रणनीती विकसित करण्यात व्यस्त आहेत. शक्य तितक्या जास्त भागात भाजपचा संपर्क मजबूत करण्यासाठी एक मार्ग नकाशा तयार केला जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रोड शो अंदाजे ८ किलोमीटर लांबीचा असू शकतो. प्रस्तावित मार्गानुसार, रोड शो पुढील ठिकाणांपासून प्रवास करण्याची अपेक्षा आहे. गाडगे बाबा समाधी - शेगाव नाका - जयस्तंभ चौक - गांधी चौक - साईनगरमधील गजानन महाराज मंदिरापर्यंत.

वृत्तानुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरात ४० ते ४५ जाहीर सभा आणि रोड शोचे नियोजन केले आहे. निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात, पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ जानेवारी रोजी मुंबईत येणार आहेत, जिथे ते भाजपचा प्रचार करतील.

# ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे ५ प्रभागात ७ उमेदवार मैदानात

**अमरावती/का.प्र.**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेला ऐतिहासिक ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक पक्ष तब्बल अनेक दशकांनंतर अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीत पुन्हा सक्रिय झाला आहे. आगामी महापालिका निवडणुकीसाठी पक्षाने ५ प्रभागांतील ७ उमेदवार विविध आरक्षित व खुल्या प्रवर्गातून अधिकृतरीत्या मैदानात उतरवले असून, हे सर्व उमेदवार 'सिंह' या बोधचिन्हावर संयुक्त आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवत आहेत.

फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचा 'सिंह' बोधचिन्ह अमरावती महापालिका निवडणुकीत प्रथमच दिसणार असून, यामुळे शहराच्या राजकारणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. संबंधित सर्व उमेदवारांचे नामांकन अर्ज निवडणूक प्रशासनाने मंजूर केले आहेत. फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचा अमरावती महानगराचा सर्वांगीण, समतोल व लोकाभिमुख विकास हे पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट असून, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, रोजगार आणि मूलभूत नागरी सुविधा यांवर भर देण्यात येणार आहे. दीर्घ काळानंतर महापालिका राजकारणात पुन्हा सक्रिय होत असलेल्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षाच्या या हालचालींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, 'सिंह' चिन्हावर लढणारे उमेदवार मतदारांचाविश्वास किती मिळवतात, याकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

फॉरवर्ड ब्लॉक पक्षाच्या उमेदवारांची यादी- नवसारी प्रभाग क्र. ३ ब (ओबीसी) डॉ. महफुज खालिद नवसारी प्रभाग क्र. ३ क (खुला, महिला) जयश्रीताई कुबडे नवसारी प्रभाग क्र. ३ ड (खुला) - ॲड. शुमाईल खान महेंद्र कॉलनी-न्यू कॉटन मार्केट, प्रभाग क्र. ५अ (एस. सी.) गोपाल मिलींद ढेकेकर बेनोडा भिमटेकडी, प्रभाग क्र. १० अ (एस. सी., महिला) भारती सुरेंद्र गुडधे स्वामी विवेकानंद कॉलनी-बेलपुरा, प्रभाग क्र. १२ अ (एस. सी.)- धर्मराज इत्तूजी सारवान, साईनगर अकोली, प्रभाग क्र. १९ ड (खुला) रामकृष्ण अडकुजी महाजन.

# भाजपाचा १७ नगरसेवकांना धक्का;नव्यांना संधी

**अमरावती/का.प्र.**

महापालिका निवडणुकीत सर्वाधिक विरोधाचा सामना करणाऱ्या भारतीय जनता पक्षाने २०१७ च्या निवडणुकीत २८ माजी नगरसेवकांना पुन्हा उमेदवारी दिली आहे, तर १७ माजी नगरसेवकांची तिकिटे रद्द केली आहेत. इतर पक्षांमधून सात उमेदवारांना उमेदवारी देण्यात आली आहे. यामध्ये काँग्रेस, बसपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि युवा स्वाभिमान पक्षाचे माजी नगरसेवक समाविष्ट आहेत.

पालिका निवडणुकीत भाजपने युवा स्वाभिमान पक्षासोबत युतीची घोषणा केली होती, पक्षासाठी सहा जागा सोडल्या होत्या. तथापि, युवा स्वाभिमान पक्षानेही ऑफर नाकारली आणि ४१ उमेदवार उभे केले. दरम्यान, तिकीट वाटपात बाहेरील लोकांसाठी लाल कार्पेट अंथरण्यात आला आहे, २०१७ च्या १७ नगरसेवकांना वगळण्यात आले आहे.

महापालिका निवडणुकीत ६९ उमेदवार उभे करणाऱ्या भाजपने ३४ नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. विजय वानखडे, गोपाळ धमारले, बाळू भुवर आणि जयश्री डहाके काँग्रेसमध्ये सामील झाले आहेत आणि अजय गोंडाणे बसपामध्ये परतले आहेत, ज्यामुळे त्यांना कोणताही विचार झाला नाही. भाजपने मुख्य सदस्यांना बाजूला ठेवून इतर पक्षांमधून सात नवीन उमेदवारांना सन्मानाने नामांकित केले आहे. यामध्ये काँग्रेसकडून प्रदीप हिवसे, शिवसेनेकडून स्वाती निस्ताने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून शोभना देशमुख, युवा स्वाभिमान पक्षाकडून नितीन बोरेकर आणि डॉ. मधुरा कहाळे, बसपाकडून ऋषी खत्री आणि मनसेकडून गौरव बांते यांचा समावेश आहे.

भाजपने माजी नगरसेवक चंद्रकांत बोमरे, प्रमिला जाधव, स्वाती जावरे, संजय वनारे, धीरज हिवसे, सोनाली करेसिया, अजय सारस्कर, इंदू सावरकर, सचिन रासने, अनिता राज, बलदेव बजाज, रेखा भुतडा यांची तिकिटे रद्द केली आहेत.

# प्रभाग क्रमांक १६ मधील फरजानाबानो अकीलबाबू यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

**अमरावती/का.प्र.**

प्रभाग क्रमांक - १६ अलीम नगर - रहेमत नगर येथील ताज नगर क्रमांक - २ स्थित रहिवासी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या फरजानाबानो अकीलबाबूसाहब यांनी आपल्या समर्थकांसोबत आ. सुलभा खोडके यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश घेतला.

यावेळी आ. खोडके यांनी फरजानाबानो अकीलबाबू साहब व जनाब अकीलबाबू यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश क्षणी पक्षाचा दुपट्टा देऊन स्वागत केले.



महिलांचे सशक्तिकरण करणे हे केवळ सामाजिक व्यवस्थेसाठीच चांगले आहे असे नाही, तर अर्थ व्यवस्थेला बळकटी आणण्याचाही तो एक योग्य मार्ग आहे. महिलांना त्यांचे हक्क, अधिकार प्रदान करून त्यांना अधिकाधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नरत असलेल्या आ. सुलभा खोडके यांच्या कार्याने प्रभावित व प्रेरित होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला आहे. या शब्दांत फरजानाबानो अकीलबाबू साहब यांनी आपल्या भावना व्यक्त केल्यात. यावेळी यश सुलभा संजय खोडके यांच्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सदस्य व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला जिल्हा विशेष

# माजी महापौर, उपमहापौरांसह १ ६ ४ उमेदवारांची माघार

## ८ ० जागांसाठी ४६ ९ उमेदवार रिंगणात; बंडखोरी आटोक्यात, मात्र काही प्रभागांत अजूनही डोकेदुखी

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

**अकोला महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी मोठ्या प्रमाणात घडामोडी घडल्या. बंडोबांचे बंड थंड करण्यासाठी राजकीय पक्षांच्या नेतृत्वाला मोठी कसरत करावी लागली. बहुतांश प्रभागांमध्ये नाराज उमेदवारांनी नामांकन मागे घेतल्याने भाजपसह इतर पक्षांना दिलासा मिळाला असला, तरी काही ठिकाणी बंडखोरी कायम राहिल्याने पक्षांची डोकेदुखी वाढली आहे.**

अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी माजी महापौर, उपमहापौरांसह तब्बल १६४ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता २० प्रभागांतील ८० जागांसाठी ४६९ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले असून बहुतेक ठिकाणी दुरंगी व तिरंगी लढती पाहायला मिळणार आहेत.

अकोला महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) युतीने निवडणूक लढवत आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) हे दोन्ही पक्ष स्वबळावर मैदानात उतरले आहेत, तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात आघाडी झाली आहे. उमेदवारांच्या याद्या जाहीर होताच अनेक प्रभागांत इच्छुकांमधील नाराजी उफाळून आली होती. काही ठिकाणी अपक्ष उमेदवारी दाखल करत बंडखोरी झाली होती.

भाजपने ८० पैकी ६२ जागांवर उमेदवार दिले असून राष्ट्रवादी अजित पवार गटासाठी १४ जागा सोडल्या आहेत. भाजपमध्ये सर्वाधिक इच्छुक असल्याने उमेदवारीसाठी तीव्र स्पर्धा होती. उमेदवारी न मिळाल्याने काही इच्छुकांनी अपक्ष किंवा इतर पक्षांकडून अर्ज दाखल केले होते. अशा बंडखोरांना माघार घ्यायला लावण्यासाठी नेतृत्वाकडून शेवटपर्यंत प्रयत्न सुरू होते. तर आज झालेल्या माघारीनंतर पक्ष नेतृत्वाला बंडखोरी बऱ्याच प्रमाणात रोखण्यात यश मिळाले असल्याचे दिसून आले आहे.

**भाजप व काँग्रेसच्या माजी महापौरांची माघार**

भाजपच्या माजी महापौर सुमनताई गावंडे, काँग्रेसचे माजी महापौर सुरेश पाटील, भाजपचे माजी उपमहापौर राजेंद्र गिरी, तसेच माजी नगरसेवक गोपी ठाकरे या उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजपला मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांचे पुतणे व प्रभाग क्रमांक १३ चे माजी नगरसेवक आशिष पवित्रकार यांची अपक्ष उमेदवारी कायम राहिली आहे. शिवसेना ठाकरे गटातील काही नाराज उमेदवारांनीही अखेर माघार घेतली आहे. काँग्रेसमध्ये मात्र एक-दोन प्रभागांत बंडखोरी कायम असल्याचे चित्र आहे.

**अशी आहे आकडेवारी :**

महापालिकेच्या ८० जागांसाठी सुरुवातीला ७७७ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीत त्यापैकी ५८ अर्ज बाद ठरले, त्यामुळे ६३३ उमेदवारांचे ७१९ अर्ज कायम होते. त्यातील १६४ उमेदवारांनी माघार घेतल्याची माहिती महापालिका निवडणूक विभागाने दिली. झोननिहाय माहिती पाहता झोन क्रमांक १ मधून २४, झोन २ मधून २५, झोन ३ मधून २६, झोन ४ व ५ मधून प्रत्येकी ३२, तर झोन ६ मधून २५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. १६४ माघारीनंतर आता ४६९ उमेदवार अंतिम रिंगणात असून राजकीय समीकरणे स्पष्ट झाली आहेत. येत्या काळात प्रचाराचा धडाका वाढणार असून अकोल्यातील महापालिका निवडणूक चुरशीची ठरण्याचे संकेत मिळत आहेत.

**पक्षनिहाय उमेदवार**

| | |
|---|---|
| शिवसेना ( शिंदे गट ) | - ७४ |
| भाजपा | - ६२ |
| शिवसेना (उबाठा ) | - ५५ |
| वंचित बहुजन आघाडी | - ५३ |
| काँग्रेस | - ५० |
| एनसीपी ( अजित पवार ) | - १४ |
| एनसीपी ( शरद पवार ) | - २५ |
| एमआयएम | - ३८ |

# महानगराच्या विकासासाठी मनपात भाजपा - राष्ट्रवादी युतीचे सरकार आवश्यक -राज्यमंत्री ना. पंकज भोयर यांचे आवाहन

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

कायदा-सुव्यवस्था, शिक्षक-शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न तसेच राज्यात सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ट्रिपल इंजिन सरकार आवश्यक असून अकोला महानगरपालिकेत भाजप-जनता पार्टी-राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे सरकार स्थापन करण्यासाठी सर्वांनी आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन राज्यमंत्री नामदार पंकज भोयर यांनी केले.



भारतीय जनता पार्टी कार्यालयात विविध समाजबांधव व वेगवेगळ्या क्षेत्रातील नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर होते. मंचावर भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, संगीताताई शिंदे, किशोर पाटील, कृष्णा शर्मा, सुलभाताई दुतोंडे, हर्षद साबळे, मायाताई धुळे, वैशालीताई पालीवाल, रूपाताई काकड, अंबादास उमाळे, माधव मानकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार अनुप धोत्रे म्हणाले की, अकोला शहराचा सर्वांगीण विकास करण्यात आला असून या विकासाला अधिक गती देण्यासाठी केंद्र व राज्यात भाजपचे सरकार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सर्वस्पर्शी विकासासाठी भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले की, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींसह सर्वसामान्यांच्या अपेक्षा जाणून घेत जनतेच्या भावना ओळखून भाजपचा संकल्पनामा तयार केला जात आहे. शहराच्या गतिमान विकासासाठी भाजपला पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, शिक्षक संघटनांनी शिक्षक-शिक्षण क्षेत्रातील वाढत्या समस्यांकडे लक्ष वेधले, तर विविध सामाजिक संघटनांनी आपल्या अपेक्षा मांडल्या. या प्रश्नांवर संवाद साधत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी संबंधित समस्यांबाबत स्पष्टीकरण दिले. कार्यक्रमात सिंधू पतसंस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच विविध शैक्षणिक व सामाजिक संघटनांच्या वतीने आ. भोयर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन मनीष गावंडे यांनी केले.

# कुंभारी येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

## सामाजिक बांधिलकी जपत गोरगरीब रुग्णांनी घेतला मोठ्या प्रमाणात लाभ

**■ प्रतिनिधी | कुंभारी ■**

कुंभारी येथील शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक २ जानेवारी रोजी दमानी नेत्र रुग्णालय, पांडे गुरुजी मित्र मंडळ व शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेले भव्य आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडले.



या आरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार गोपीकिशन बाजोरीया, शिवसेना उपनेते यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीरंगदादा पिंजरकर, शिवसेना जिल्हाप्रमुख होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नारायण गव्हाणकर जिल्हाप्रमुख, आ. विप्लव बाजोरिया, अश्विन नवले जिल्हाप्रमुख, उषा विरक शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख, सौ. रेखाताई राऊत शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख यांची उपस्थिती होती. या मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रशेखर पांडे गुरुजी यांनी केले.

या आरोग्य शिबिरासाठी दमानी नेत्र रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचे विशेष सहकार्य लाभले. यामध्ये सभापती शुक्लजी (डायरेक्टर, दमानी नेत्र हॉस्पिटल), मनीष हर्षे (मुख्य शल्य चिकित्सक), नेत्र चिकित्सक दत्ता पवार, डॉ. सौ. कोमल अंभोरे (त्वचारोग तज्ज्ञ), डॉ. विवेक अंभोरे (हृदयरोग, अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी तज्ज्ञ), डॉ. समीर तायडे (स्पाईन सर्जन), डॉ. मनीषा राठी (स्त्रीरोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ) तसेच डॉ. अमोल राठोड यांचा समावेश होता. या सर्व डॉक्टरांनी रुग्णांची मोफत तपासणी करून मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये एकूण ९४६ रुग्णांची नेत्र तपासणीसह हृदयरोग, अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी, स्पाईन, त्वचारोग तसेच वंध्यत्व निवारण आदी आजारांची मोफत तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यक त्या रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप, औषधे देण्यात आली तसेच पुढील उपचारांसाठी योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाला परिसरातील तसेच कुंभारी व लगतच्या गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून सहभाग नोंदविला.

सामाजिक बांधिलकी जपत पांडे गुरुजी मित्र मंडळ व शिवसेना यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**SAHIDA BEGUM AFZAL KHA**
NEW NAME
**SAIDA BEGUM USMAN KHAN**
DOB is 16/09/1968My Residential Address is :- Gudwala plot Near Rais bhai Chakki old city Akola Maharashtra 444001

**जाहीर नोटीस**

**विदयमान सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर) बाळापुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. क्र. ३१९/२०२५ प्रोसेस नं.३२१०/२०२५
चौ.ता. १६/०२/२०२६

**अर्जदार :** १. मनोहर विठ्ठल कात्रे वय अं.५३ वर्ष, धंदा शेत मजुरी रा. मु.पो. व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत लिलाबाई विठ्ठल कात्रे या दिनांक ११.११.२०१२ रोजी रा.मु.पो. व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार यांना मयत लिलाबाई विठ्ठल कात्रे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक १६.०२.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २६.१२.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३४२/२०२५ प्रोसेस नं.०४/२०२६
चौ.ता. ०६/०२/२०२६ दिनांक : ०१/०१/२०२६

**अर्जदार :** १. प्रियंका दिनेश इंगळे २. आदित्य दिनेश इंगळे ३. व्दारकाबाई शहांबर इंगळे सर्व रा. कृष्णासाई बिल्डिंग, वाशिम बायपास, सागर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिनेश शहांबर इंगळे
**पत्ता :-** रा. कृष्णासाई बिल्डिंग, वाशिम बायपास, सागर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिनेश शहांबर इंगळे यांचे दि. ०२/०९/२०२३ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला, ता. जि. अकोला, निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे संतोष हरिभाऊ जामरे मु. पो. भटोरी, भातोरी, अकोला ता. जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार संतोष हरिभाऊ जामरे, यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- मालमत्ता क्र. ६४३, मौजे - भटोरी, ता. जी.अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ ९००.०० चौ. फुट ज्याचे चातुर्सिमा – पूर्वेस - रस्ता पश्चीमेस – ज्ञानेश्वर श्रीनाथ, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - देवानंद गवळी, या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायानान्स कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु: सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :०१/०१/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९३८२४२

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे गजानन रुपराव दशरथी मु. पो. भटोरी, अकोला ता. जी. अकोला. यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार गजानन रुपराव दशरथी, यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- मालमत्ता क्र. ३०९, मौजे - भटोरी, ता. जी.अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ १३९२.०० चौ. फुट ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - रस्ता, पश्चीमेस – रस्ता आणी अमोल कावरे यांचे घर, उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस - वसंत दशरथी यांचे घर, या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायनान्स कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :-०१/०१/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९३८२४२

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२९८/२०२५ प्रोसेस नं.२१०२०/२०२५
चौ.ता. ०६/०२/२०२६ दिनांक : २४/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती रमा सुरेशचंद्र राठी २. सागर सुरेशचंद्र राठी ३. माधुर सुरेशचंद्र राठी तिघेही रा. लक्ष्मी निवास, माहेश्वरी भवन जवळ, न्यु राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुरेशचंद्र नंदकिशोर राठी
**पत्ता :-** रा. लक्ष्मी निवास, माहेश्वरी भवन जवळ, न्यु राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुरेशचंद्र नंदकिशोर राठी यांचे दि. २१/११/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## महाराष्ट्र शासन
## अकोट वन्यजीव विभाग, अकोट
## वनपरिक्षेत्र अधिकारी (मे.व्या.प्र.) नरनाळा
## ई-मेल - rfonarnala1@gmail.com

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उचित वर्गवारी नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंताकडून नमुन्यातील खालील कामाकरिता निविदा मागवित येत आहेत. सविस्तर निविदा सूचना परिक्षेत्र कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी (मे.व्या. प्र.) नरनाळा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वनपरिक्षेत्र अधिकारी (मे.व्या.प्र.) नरनाळा कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल.

**खालील कामाविषयी या कार्यालयाचे जा.क्र :- व.प.अ./नर/निविदा /८६६/२०२५-२६ नर, दिनांक :- २९/१२/२०२५.**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे ठिकाण | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये) | इसारा / बयाना रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा संचाची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Flush Cause Way Shahanur to Paldari Jungal Safari Road, Bordi Beat, Bordi Round, Narnala Range.No. 04 | Shahanur | 842748 | 8427 | २ महिने | 1000 |
| 2 | Construction of Flush Cause Way Ghatkopar to Mahadev Mandir Jungal Safari Road, S. Shahanur Beat, Bordi Round, Narnala Range. No. 01 | Shahanur | 842181 | 8421 | २ महिने | 1000 |
| 3 | Construction of Flush Cause Way Shahanur to Paldhari Jungal Safari Road, Bordi Beat, Bordi Round, Narnala Range. No.05 | Shahanur | 842151 | 8421 | २ महिने | 1000 |
| 4 | Construction of Retaining Wall Paldhari to Amona Jungal Safari Road, in Narnala Range. No.02 | Shahanur | 841244 | 8412 | २ महिने | 1000 |
| | एकुण | | | | | |

**निविदा अटी व शर्ती :-**

१) कोरे निविदा प्रपत्राची मागणी करताना कार्यालयीन पावती द्वारे निविदा संचाची किंमत स्विकारली जाईल. तसेच इसार रक्कम धनादेशाद्वारे वनपरिक्षेत्र अधिकारी (मे.व्या.प्र.) नरनाळा यांच्या नावे जमा करावे लागेल. तसेच सा. बां. विभाग यांचे वैद्य पंजीकृत प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रमाणित केलेली सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदा प्रपत्रे देण्यात येणार नाही.

२) कोरी निविदा संच वनपरिक्षेत्र अधिकारी (मे.व्या.प्र.) नरनाळा यांच्या कार्यालयात दिनांक ०३/०१/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा पासून ते ०९/०१/२०२६ वेळ १८.०० वाजेपर्यंत कामकाजाच्या दिवशी मिळेल.

३) निविदा या कार्यालयात दिनांक १२/०१/२०२६ वेळ ११.०० वा. उघडण्यात येईल काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक व वेळ मध्ये बदल होऊ शकतो.

४) निविदेतील कामे रद्द करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी (मे.व्या.प्र.) नरनाळा यांना राहतील. कामाचा कार्यारंभ आदेश हा निधी उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच निधी उपलब्ध झाल्यानंतर बिल वितरित करण्यात येईल.

५) निविदा बी १ सादर करतेवेळी कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेवर 1% रकमेचा FDR किंवा DD (धनाकर्ष) सोबत जोडण्यात यावा त्याचप्रमाणे 2% रकमेचा सुरक्षा ठेव (SD) रकमेचा DD (धनाकर्ष) सोबत जोडण्यात यावा अथवा आपला निविदा अर्ज नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करता यांनी राखून ठेवलेला आहे.

६) निविदा घेऊन स्वतःह नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता उपस्थित राहावे प्रतिनिधी पाठवू नये.

७) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.

**वनपरिक्षेत्र अधिकारी**
**(मे.व्या.प्र.)नरनाळा**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

खुर्चीपेक्षा देश मोठा

# वीर जवानाच्या बलिदानासमोर सत्तेचा सोहळा स्थगित

**आर्वी । जनमाध्यम**
आर्वी तालुक्यातील चिंचोली (डांगे) येथील सुपुत्र व भारत-तिबेट सीमा सुरक्षा दल मधील वीर जवान सुरेंद्र बाबाराव कुंभरे यांच्या निधनामुळे संपूर्ण आर्वी विधानसभा क्षेत्र शोकसागरात बुडाले आहे. देशाच्या सीमेचे तब्बल १६ वर्षे अहोरात्र रक्षण करणाऱ्या या वीरपुत्राच्या बलिदानाला मानाचा मुजरा करण्यासाठी आर्वीचे आमदार सुमित वानखेडे यांनी एक अत्यंत भावनिक, संवेदनशील आणि राष्ट्रप्रेमी निर्णय घेतला आहे.

शुक्रवारी मोठ्या थाटामाटात होणारा आर्वी नगरपरिषदेचा नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा पदग्रहण व सत्कार समारंभ आमदार वानखेडे यांच्या सूचनेनुसार स्थगित करण्यात आला असून, तो आज शनिवारी घेण्यात येणार आहे. खुर्चीपेक्षा कर्तव्य मोठे, सत्तेपेक्षा देश श्रेष्ठ हा संदेश या निर्णयातून स्पष्टपणे उमटला आहे.

भारत-तिबेट सीमेवर शून्य अंशांखालील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कर्तव्य बजावत असताना आपल्या मातीतील एक जवान काळाच्या पडद्याआड गेला असताना उत्सव साजरा करणे उचित नाही, अशी भूमिका घेत आमदार वानखेडे यांनी नियोजित कार्यक्रम थांबवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे राजकीय लाभ-तोट्यांपेक्षा देशप्रेम आणि सामाजिक भान अधिक महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित झाले आहे.

वीर जवान सुरेंद्र कुंभरे यांनी २००९ पासून ‍छ्ऊंइ मध्ये प्रामाणिक सेवा बजावत देशाच्या सीमेचे रक्षण केले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच आमदार वानखेडे यांनी तात्काळ कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले तसेच प्रशासनाला शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचे निर्देश दिले. शुक्रवारी चिंचोली येथे त्यांच्या पार्थिवावर शासकीय सन्मानाने अंत्यसंस्कार होणार आहेत.

**राष्ट्रप्रेमाची कृतीतून प्रचिती**

भारतीय जनता पक्षाची ‘राष्ट्र प्रथम’ ही भूमिका केवळ शब्दांपुरती मर्यादित नसून ती कृतीत उतरवली जाते, याचे हे जिवंत उदाहरण ठरत आहे. सत्तेचा सोहळा पुढे ढकलून वीर जवानाला मानवंदना देण्याचा हा निर्णय सर्वसामान्य नागरिकांमध्ये भावनिक प्रतिसाद निर्माण करणारा ठरला आहे.

### आज पदग्रहण व सत्कार

वीर जवानाच्या सन्मानार्थ शुक्रवारी होणारा कार्यक्रम स्थगित करण्यात आला असून, आज शनिवार रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्षा पदभार स्वीकारतील. त्यानंतर सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा पार पडणार आहे. देशप्रेम, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या निर्णयाबद्दल आमदार सुमित वानखेडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रस्त्यासाठी सरपंचासह गावकऱ्यांचे आमरण उपोषण

## तीन वर्षांपासून रखडलेले काम; १२ जानेवारीपासून आंदोलनाचा इशारा

**साहूर/जनमाध्यम**
बोरगाव ते साहूर बायपास रस्त्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले असून रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. वारंवार तक्रारी व लेखी निवेदन देऊनही संबंधित बांधकाम विभागाकडून हेतूपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत बोरगाव येथील सरपंचासह ग्रामस्थांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. आठ दिवसांत रस्त्याच्या कामाला सुरुवात न झाल्यास १२ जानेवारीपासून सरपंचासह गावकरी आमरण उपोषणास बसणार असल्याचा ठाम इशारा देण्यात आला आहे.

याबाबत बोरगावचे सरपंच संजय ठाकरे यांनी पालकमंत्री पंकज भोयर तसेच जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांना लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनात साहूर बायपास ते बोरगाव दरम्यानच्या रस्त्याचे काम तीन वर्षांपूर्वी मंजूर होऊन दोन वर्षांपूर्वी कार्यारंभ आदेश देण्यात आल्याचा उल्लेख आहे. सहा महिन्यांपूर्वी काम पूर्ण करण्याची मुदत संपली असतानाही प्रत्यक्षात कोणतीही प्रगती न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. सध्या या रस्त्यावर केवळ खडी पसरवून ठेवण्यात आली असून कोणतीही प्रक्रिया न केल्याने पादचाऱ्यांसह वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

विद्यार्थ्यांचा शाळा-महाविद्यालयांचा प्रवास जीवघेणा ठरत असून शेतकऱ्यांची वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. रस्ता पूर्णपणे उखडलेला असून मोठमोठे खड्डे पडल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. त्यामुळे ‘बोरगाव रस्ता मरणास सस्ता’ अशी अवस्था झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

या रस्त्याबाबत पालकमंत्री पंकज भोयर व जिल्हाधिकारी वान्मथी सी, यांच्याकडे तक्रार सादर केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरल्याची माहिती आहे. मात्र, तरीही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने ग्रामस्थांचा संयम सुटला आहे. त्यामुळे सरपंच संजय ठाकरे यांच्यासह ग्रामस्थांनी आठ दिवसांत रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्याचा अल्टिमेटम दिला असून अन्यथा १२ जानेवारीपासून आमरण उपोषण छेडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## संक्षिप्त

### कंपनी वसाहतीतील सदनिकेतून सीसीटीव्ही व रोख रक्कम चोरीस

हिंगणघाट - वणी येथील गिमा टेक्स कंपनीच्या वसाहतीतील एका सदनिकेतून अज्ञात चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरा व २१ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना समोर आली आहे.गिमा टेक्स कंपनीत कार्यरत हेमराज सोलंकी (वय ४०) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या सदनिकेचा फायदा घेत चोरी केली. परत आल्यानंतर चोरी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

---

### क्षुल्लक कारणावरून महिलेला मारहाण

**वडनेर** - भिवापूर येथे क्षुल्लक कारणावरून एका महिलेला मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. आशा ससाने (वय ५२) यांना गावातीलच राजू सराटे याने तुझा मुलगा माझ्या भावासोबत का फिरतो असे म्हणत वाद घातला. वादाचे रूपांतर भांडणात होऊन आरोपीने आशा ससाने यांना मारहाण केली. या प्रकरणी वडनेर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

---

### पाणीपुरवठ्याच्या कारणावरून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यास मारहाण

**सिंदी (रेल्वे)** -नळाद्वारे पाणी का सोडले नाही, या कारणावरून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना सिंदी (रेल्वे) येथे घडली आहे.बरबडी येथील भगवान निमसडे (वय ५३) हे ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून मानधनावर काम करतात. गावातील स्वप्नील घोडे याने नळाला पाणी का सोडले नाही, अशी विचारणा केली. त्यावर वीजपुरवठा खंडित असल्याने पाणीपुरवठा होणार नसल्याचे सांगितल्यावरून आरोपीने भगवान निमसडे यांना शिवीगाळ करून मारहाण केली. या प्रकरणी सिंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# होमगार्ड वर्धापण दिनाचा सप्ताह उत्साहात साजरा



**वर्धा जनमाध्यम :** होमगार्ड व नागरी संरक्षण दलाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन सप्ताह साजरा करण्यात आला.

होमगार्ड संघटनेचे काम अतुलनिय असून होमगार्डनी रक्तदान करुन रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी फार मोलाची कामगिरी केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १०० टक्के होमगार्डची पुर्तता होत असते. भविष्यात अशाच प्रकारे कार्य करुन होमगार्ड संघटनेने आपले नाव आणखी उज्वल करावे, असे सदाशिव वाघमारे यांनी सांगितले. होमगार्ड संघटनेची स्थापना ६ डिसेंबर १९४६ साली मुंबई शहरात झाली. जनतेतून जनतेचे संरक्षण करण्यासाठी व कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी होमगार्ड संघटनेच्या जवानाकडून पोलिस यंत्रणेला भरभरुन मदत होत असते. मुबंई शहरात होमगार्ड संघटनेची स्थापना मोरारजी देसाई यांनी केली व आज या छोट्याशा रोपट्याच रुपांतर वटवृक्षामध्ये झाले. संघटना देशपातळीवर कार्य करती आहे. ही गौरवाची बात आहे, असे सदाशिव वाघमारे म्हणाले.

सप्ताहादरम्यान ७० पुरुष होमगार्ड व ३५ महिला होमगार्डचे प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच पथसंलनाचे आयोजन करुन जिल्हा होमगार्ड समादेशक यांना सशस्त्र मानवंदना देण्यात आली. यावेळी होमगार्ड संघटनेच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २२ पुरुष व महिला होमगार्डनी रक्तदान केले. होमगार्डच्यावतीने लक्ष्मीनगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यासाठी नगर सेवक विलास आगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाप्रसंगी वरिष्ठ पलटन नायक बाबा तुरक यांनी राष्ट्रपतीच्या संदेशाचे वाचन केले. तसेच सन २०२५ मध्ये सेवानिवृत्त झालेले मानसेवी अधिकारी मधुकर बागेश्वर, सुरेश कोपरकर, उमेश काबंळे, रेखा मानवटकर यांचा सत्कार करण्यात आला. हिंगणघाट पथकातील समादेशक अधिकारी कैलास रोकडे यांच्या नेतृत्वात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

योग प्रशिक्षक वसंतराव पाल यांनी उत्तमप्रकारे होमगार्डना योग शिकवून सुदृढ आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रदीप बलवीर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रनायक प्रमोद वानखेडे, प्रशासकिय अधिकारी संजय सुराशे, पलटन नायक प्रदीप बलवीर, अनंत गजबे, समादेशक अधिकारी हेमलता कांबळे, कैलास रोकडे, मनोहर ढवळे, फिरोज खान पठाण, चंद्रकांत पिंजरकर, वसंत नाईक, गजानन ससाने, नितीन शेंडे, चंद्रशेखर शेलकर, सारीका चामटकर, रंजना करपाते यांनी प्रयत्न केले.

### रब्बी हंगामात १०० टक्के पेरणी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील शेतकरी रब्बी हंगामात ज्वारी, गहू, चना या पिकासोबतच जवस, मसूर व इतर पिकाची लागवड करीत असतात. जिल्ह्यात रब्बी हंगामात १ लाख १४ हजार ७६४ हेक्टर २१ आर क्षेत्र असून १ जानेवारी २०२६ पर्यंत १ लाख १६ हजार ६५१ हेक्टर ९३ आर क्षेत्रावर तृणधान्य, कडधान्य, व गळीतधान्य पिकांची रब्बी हंगामासाठी प्रत्यक्ष पेरणी झालेली आहे. प्रत्यक्ष पेरणी १०१ टक्के झाली आहे. रब्बी ज्वारीचे सरासरी क्षेत्र १ हजार २९१ हेक्टर ६६ आर असून प्रत्यक्ष ७३३ हेक्टर ३० आर क्षेत्रावर म्हणजेच ५६.७७ टक्के लागवड झालेले आहे. तर गहू पिकाचे सरासरी क्षेत्र ४० हजार ६६९ हेक्टर २९ आर असून प्रत्यक्ष ३३ हजार १८ हेक्टर ६५ आर क्षेत्रावर ८१.१९ टक्के लागवड झाली.

# देवळी येथे हनुमान चालीसा पठण उत्साहात

## नववर्षाच्या औचित्याने भक्तिमय वातावरण



**देवळी/जनमाध्यम**
आंतरराष्ट्रीय नववर्ष दिनाचे औचित्य साधून देवळी येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल शाखा देवळी यांच्या वतीने श्री दत्त मंदिर, गांधी चौक येथे आज सकाळी ८ वाजता हनुमान चालीसा पठणाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला माजी खासदार रामदास तडस, नव-निर्वाचित नगरसेवक राहुल चोपडा, तालुका संघचालक किशोर फूटाणे, नगरसेवक विलास जोशी, ॲड. महेश टावरी, ज्ञानेश्वर काले, दिनेश क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रभू श्रीरामचंद्र व श्री हनुमान यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर रामधून व रामनाम जागर करण्यात आला. उपस्थित सर्व भाविकांनी सामूहिकपणे श्री हनुमान चालीसा पठण केले. या भक्तिमय उपक्रमात देवळी शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या संघाच्या व्यापक गृहसंपर्क अभियानाचा या कार्यक्रमातून शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करून या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम शांततामय व भक्तिमय वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन जोशी, गोल्डी बग्गा, गजानन महल्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

### शेतकऱ्याची आत्महत्या

**तळेगाव (श्या. पंत.)** - माळेगाव येथील शेतकरी प्रभाकर केवटे (वय ४५) यांनी शेतात कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.माळेगाव काळी शेतशिवारात ही घटना घडली असून आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### चालकानेच टिप्परचे डिससह चार टायर पळविले

**वर्धा -** भूगाव येथील कंपनी परिसरात ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाच्या टिप्परमधील डिससह चार टायर व लोखंडी चेन असा सुमारे ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चालकानेच पळविल्याची घटना उघडकीस आली आहे. बोरगाव (मेघे) येथील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक राजेंद्र चौव्हान (वय ४५) यांचा एम.एच. ४३ सी.ई. १८२५ क्रमांकाचा टिप्पर भूगाव येथील कंपनी परिसरात उभा होता. या टिप्परचा चालक धीरेंद्र कुमार (रा. औगासी, उत्तर प्रदेश) याने विश्वासघात करत टिप्परचे डिससह चार टायर व लोखंडी चेन चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणी सावंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमली हिंगणी नगरी

## भागवत समाप्तीनिमित्त पालखी सोहळा



**हिंगणी/जनमाध्यम**
येथे सुरू असलेल्या संगीत श्रीमद् भागवत सप्ताहाच्या समाप्तीनिमित्त भव्य पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत निघालेल्या या दिंडी सोहळ्यामुळे संपूर्ण हिंगणी नगरी हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेली होती. श्रीमद् भागवत धर्ममंडपापासून दिंडी सोहळ्याला प्रारंभ झाला. टाळ-मृदंगाच्या गजरात ही दिंडी वॉर्ड क्रमांक २ ते मच्छी मार्केट मार्गे मुख्य रस्त्याने पुढे जात उत्साही दुर्गा मंदिर, ग्रामपंचायत असा मार्गक्रमण करीत बाजार चौकातील धर्ममंडपात पोहोचली. तेथे पालखी सोहळ्याची भक्तिभावपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली.सात दिवस चाललेल्या या संगीत श्रीमद् भागवत सप्ताहात भजन, पूजन, आरती आदी विविध धार्मिक कार्यक्रम सोहळ्याने पार पडले. आजच्या डोळे दिपवणाऱ्या दिंडी सोहळ्यात बँड पथकासह गावातील तसेच बाहेरून आलेल्या भजन मंडळयांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. दिंडी परिक्रमेच्या संपूर्ण मार्गावर रंगीबेरंगी आकर्षक रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती.विनेकऱ्यांचे ठिकठिकाणी भाविकांनी घरासमोर पाय धुऊन कुमकुम-तिलक लावून स्वागत केले. काही ठिकाणी लंगर तसेच चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.आज गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा जवळपास पाच हजारांहून अधिक भाविकांनी लाभ घेतला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे हिंगणी परिसरात अध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# दहेगाव (गोसावी) येथे व्यायामशाळेला आधुनिक साहित्य

## युवकांच्या आरोग्यासाठी मोलाची मदत




**सेलू/जनमाध्यम**
दहेगाव (गोसावी) येथील युवक-युवतींच्या आरोग्य संवर्धनासाठी आमदार यांनी ग्रामपंचायत दहेगाव (गोसावी) अंतर्गत व्यायामशाळेसाठी आवश्यक आधुनिक व्यायाम साहित्य उपलब्ध करून दिले. या सुविधेमुळे गावातील क्रीडापटूंसह सर्वसामान्य युवकांना नियमित व्यायामासाठी सुसज्ज वातावरण मिळणार असून, आरोग्यदृष्ट्या मोठा लाभ होणार आहे.

गावात सुसज्ज व्यायामशाळा उभारण्याची दीर्घकाळापासूनची मागणी लक्षात घेऊन आमदार यांनी तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत साहित्य उपलब्ध करून दिले. यामुळे दहेगाव (गोसावी) नगरीतील युवक-युवतींमध्ये व्यायामाची आवड वाढण्यास चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. आमदारांनी केलेल्या सहकार्याबद्दल ग्रामस्थ व युवकांनी त्यांचे मनापासून आभार मानले.या साहित्याचे आज छोटेखानी उद्घाटन करण्यात आले. यावेळी भाजपा मंडळ उपाध्यक्ष सचिन महाबुधे, सोशल मीडिया समन्वयक संजय पिसुड्डे, शक्ती प्रमुख उमेश राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करत, ग्रामीण भागातील युवकांसाठी आरोग्याविषयक सुविधा वाढविण्याची गरज अधोरेखित केली.कार्यक्रमात बोलताना आमदार यांनी युवकांनी व्यायाम व क्रीडेमार्फत सुदृढ जीवनशैली अंगीकारावी, यासाठी शासन व लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न सुरू राहील, असे सांगितले. या उपक्रमामुळे दहेगाव (गोसावी) येथील युवक-युवतींना आरोग्यपूर्ण भवितव्यासाठी नवी दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# घोराड तीर्थक्षेत्री संत केजाजी महाराज पुण्यतिथी महोत्सवाची तयारी

## विदर्भातील भाविकांचा दहा दिवस चालणारा भक्तिमय सोहळा



**सेलू/जनमाध्यम**
विदर्भाची प्रतिपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बोरनदी तिरावर वसलेल्या घोराड तीर्थक्षेत्रात संत केजाजी महाराज यांच्या १११ व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य महोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. दि. ११ ते २१ जानेवारी या कालावधीत हा पुण्यतिथी महोत्सव साजरा होणार असून दहा दिवस चालणाऱ्या या सोहळ्यासाठी विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

विठ्ठल–रुक्माई देवस्थान ट्रस्ट व संत केजाजी महाराज सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी हा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येतो. यंदाही विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून ५० हजारांहून अधिक भाविक या सोहळ्यास उपस्थित राहण्याची शक्यता आहे. भाविकांच्या सोयीसुविधांसाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला असून संपूर्ण घोराड गाव भक्तीमय वातावरणात सजले आहे.महोत्सवाच्या कालावधीत श्रीरामकथा ज्ञानयज्ञ, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामूहिक पारायण, पालखी दिंडी सोहळा, काल्याची दहीहंडी तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ११ ते १७ जानेवारी दरम्यान श्रीरामकथा ज्ञानयज्ञ सप्ताह होणार असून कथा दुपारी १ ते ४ आणि सायंकाळी ७.३० ते रात्री १० या वेळेत दोन सत्रात होणार आहे. या कथांचे प्रवक्ते आळंदी येथील विश्वंभर महाराज माळोदे असणार आहेत.दि. ११ ते १८ जानेवारी दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामूहिक पारायण आयोजित करण्यात आले असून या पारायणाचे व्यासपीठ प्रमोद महाराज ठाकरे भूषविणार आहेत. दररोज सकाळी ७ ते १० या वेळेत पारायण होणार आहे.संत केजाजी महाराज यांचा निर्वाण दिन १८ जानेवारी असल्याने या दिवशी विष्णू सहस्त्रनाम पठण, संत केजाजी महाराज चरित्र पारायण, समाधी पूजन तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता होणार आहे. याच दिवशी रात्री गावात घरोघरी दीपोत्सव साजरा करण्यात येणार असून देवस्थान परिसरात भव्य दीपोत्सव होणार आहे.देवस्थान परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळणार असून ग्रामपंचायतीच्या वतीने गावाच्या मुख्य प्रवेशद्वाराची रंगरंगोटी करण्यात आली आहे. दि. २० जानेवारी रोजी महाप्रसाद तर दि. २१ जानेवारी रोजी प्रक्षाळ पूजनाने या दहा दिवस चालणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवाची सांगता होणार आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ३९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आज 'सूपरमून' दिसणार

**अमरावती/प्रतिनिधी:-** पौर्णिमेच्या दिवशी म्हणजेच ३ जानेवारीला सूपरमून दिसणार आहे. या दिवशी पृथ्वीपासून चंद्राचे अंतर कमी राहिल. त्यामुळे चंद्र या दिवशी मोठा व प्रकाशमान दिसेल. सरासरी पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ८५ हजार



कि.मी. असते. जेव्हा पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ७० हजार कि.मी. च्या आत असते त्याला सुपरमून असे म्हणतात.

चंद्र पृथ्वीच्या जवळ आल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीची तिव्रता वाढणे, वादळ यासारख्या घटना घडू शकतात. पृथ्वीवरुन आपणाला नेहमी चंद्राचा ५९ टक्के भाग पाहता येतो. चंद्रावरुन पृथ्वी ही ९८.४ टक्के दिसू शकते. चंद्रावरुन पृथ्वीवर प्रकाशकिरण येण्यास १.३ सेकंद लागतात. चंद्राचे वय हे ४.६५ अब्ज वर्ष आहे. चंद्र हा पृथ्वीपासून दरवर्षाला ३.८ सेंटीमिटर लांब जात आहे. त्यामुळे पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी होईल व १०० वर्षांनी दिवस हा २ मिली सेकंदने मोठा होईल. चंद्रावर ३० हजार विवरे व १२ पर्वत आहे. पर्वत व विवरे दुर्बिनीमधून अगदी चांगल्या प्रकारे पाहता येतात. ३ जानेवारीला संध्याकाळी दिसणारा सूपरमून खगोलप्रेमिंनी व जिज्ञासूंनी अवश्य बघावा. हा सूपरमून अगदी साध्या डोळ्यांनी पाहता येईल. अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी दिली आहे.

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७२८/२०२५ ने.ता.०७.०२.२०२६

**अर्जदार :** १. सोनाबाई माणिकराव गवई, वय ७५ धंदा - घरकाम
२. प्रमोद माणिक गवई, वय ४७ धंदा - मजुरी
सर्व रा.आष्टोली, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत बळीरामजी विष्णाजी गवई** यांचा मृत्यू दिनांक ०५.०६.१९८६ रोजी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक माणिक बळीराम गवई** यांचा दि.२२.१२.२०२४ रोजी आष्टोली, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावले. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.७२८/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.०१.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७९९/२०२५
**श्री.शेख फारुक -वि- निरंक**
पुढील ता.१४.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shaikh Farooque Mansoori Shaikh Fakru
Age 38 Yrs. Occu.: Business
R/o Near Masjid, Masanganj, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेख फकरु शेख इस्माईल मन्सुरी** हे दिनांक 24.12.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शेख फारुक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेख फारुक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १२.१२.२०२५

आज दि.१२.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रा.पं.**घाटलाडकी** येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **जेबा शबनम अब्दुल कलाम** अर्जात नमूद जन्म दिनांक **३१.०७.१९९९** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक .१२.२०२५

आज दि.३१.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **परवीन बानो मो.हनिफ** अर्जात नमूद जन्म दिनांक **०३.०६.१९७६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक .१२.२०२५

आज दि.३१.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शबाना बानो मो.हनिफ** अर्जात नमूद जन्म दिनांक **१०.०३.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १२.१२.२०२५

आज दि.१२.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ................ येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल कलाम अब्दुल सलाम** अर्जात नमूद जन्म दिनांक **१३.१०.१९६४** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

**जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१, दि.१८.१०.२०२३**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर**
**पंचायत समितीचे मागे, अचलपूर (कॅम्प)**
**दूरध्वनी क्र.०७२२३-२२१३२२ ई-मेल :** eepmpd@gmail.com

## निविदा सूचना क्र.१६/२०२५-२०२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा प्रकार (खुली निविदा/ सुशिक्षित बेरोजगार/ मजूर सहकारी संस्था | जिल्हा | निविदा रक्कम रु.लक्ष |
|---|---|---|---|---|
| ०१ | गावलांडोह ल.पा. तलावाच्या मुख्य कालव्यावरील सा.क्र.५५० मी. ते ६८० मी. काटच्छेद दुरुस्ती करणे.C.C.Trough बांधकाम करणे व सांडव्याची दुरुस्ती करणे | सुशिक्षित बेरोजगार अभियंता फक्त अमरावती जिल्ह्याकरीता | अमरावती | रु.४१.६९ लक्ष |
| ०२ | शहानूर मध्यम प्रकल्पाच्या अंजनगांव सुर्जी शाखा कार्यालय येथे महिलांकरीता स्वच्छतागृह दुरुस्तीचे काम तसेच Paving Block बसविण्याचे काम | मजूर सहकारी संस्था फक्त अमरावती जिल्ह्याकरीता | अमरावती | रु.१६.८५ लक्ष |

| | |
|---|---|
| ०१) निविदा उपलब्ध आणि सादरीकरण कालावधी | दिनांक ०५.०१.२०२६ ते १२.०१.२०२६ सायं.६.०० वा.पर्यंत |
| ०२) निविदा उघडण्याचा दिनांक (लिफाफा क्र.१) | दिनांक १५.०१.२०२६ (११.०० वाजता जर शक्य झाल्यास) |

**अटी व शर्ती -**

०१) निविदा संच रक्कम व अनामत रक्कम डी.डी.द्वारे भरणे आवश्यक आहे.

०२) एक किंवा संपूर्ण निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर, कोणतेही वेळी, कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे.

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता,**
**मध्यम व लघु पाटबंधारे विभाग,**
**अचलपूर**

(वि.मा.का./अम/जाही/८८५/२०२५-२०२६)

---

महानिर्मिती

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी- वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३०००६४०९६ | प्रॉक्यूरमेंट ऑफ १५०एनबी डीव्ही-२ डोम वॉल्व स्पेयर पार्ट्स फॉर ड्राय फ्लाय अॅश कन्वेईंग सिस्टिम अॅट एएचपी यू-८, टीपीएस, परळी वै. | ४.१० लाख ७६०८/ | ०३.०१.२०२६ ते १०.०१.२०२६ | ११.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४३६८ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ मेजरिंग इन्स्ट्रुमेंट फॉर डे टु डे मेंटेनंस ॲक्टीव्हिटीज अँड ड्युरिंग एओएच अॅट ईटी यू ८,२५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | २.९८ लाख ६४८३/ | ०३.०१.२०२६ ते १८.०१.२०२६ | १९.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४४३९ (आर) | वर्क ऑफ रिप्लेसमेंट ऑफ बाउल अँड बाउल हब असेम्ब्ली ऑफ कोल मिल एक्सआरपी-९०३ अॅट बीएम-२, यू-८, टीपीएस, परळी वै. | ३३.९० लाख ३७४०८/- | ०३.०१.२०२६ ते १८.०१.२०२६ | १९.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४५१६ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ सोडियम सिलिकेट फॉर लिकेजेस अँड कपलिंग फॉर टू बॉडीड अँड फोर बॉडीड पम्प अँड कंज्यूमेबल फॉर कोल मिल यू-६अँड ७ अॅट बीएम-१,२५०मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | २.६० लाख ६१०९/- | ०३.०१.२०२६ ते १८.०१.२०२६ | १९.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४५४८ (आर) | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर रीपेयर ऑफ अॅडमीन बिल्डिंग लिफ्ट इंस्टॉलड अॅट अॅडमीन बिल्डिंग ईएम-२ , २५० मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | ६.१० लाख ९६००/- | ०३.०१.२०२६ ते १३.०१.२०२६ | १४.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६२१०९ | वर्क ऑफ प्रोव्हायडिंग सर्विसेस फॉर क्लिनिंग ऑफ केबल गॅलरीज, केबल ट्रेज बाय स्किलड ऑपरेटर्स विथ इंडस्ट्रियल वैक्युम क्लिनिंग मशीन ऑन अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड बेसिस अॅट सीएचपी-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १२.२१ लाख १५७१२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६३७०४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ पीए अँड एफडी फॅन लुब ऑइल सिस्टिम स्पेयर्स फॉर यू-६अँड ७ अॅट बीएम-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ५.०४ लाख ८५४३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६३७३५ | द वर्क ऑफ रिमोव्हिंग ग्रास , श्रब्स अँड ट्रीमिंग ऑफ त्री ब्रांचेस अॅट एनपीटीपीएस यू-८, प्रीमायसेस परळी वै. | २२.७० लाख २६२०७/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६३७५३ | प्रॉक्यूरमेंट ऑफ रीड्यूसर गियर बॉक्स लुब ऑइल पम्प फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट बीएम-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १०.५५ लाख १४०५२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६३९५७ | अॅन्युअल मेंटेनंस वर्क कॉंट्रॅक्ट फॉर द वर्क डे-टू-डे मेंटेनंस ऑफ ड्रिंकिंग वॉटर सप्लाय सिस्टिम अँड असोसियटेड वर्क्स इन डीईएफ, एबीसी,अँड न्यू कॉलनी अॅट टीपीएस, परळी वै. | ११.८९ लाख १५३९८/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४०५८ | टेक्निकल सर्विसेस ऑफ सर्विसिंग ऑफ २२०व्ही डीसी क्लोराइड मेक (फोर्मेली कॅल्डाइन) बॅटरी चार्जर्स ऑफ ईटी, यू--८, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १.८० लाख ५३०५/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४१६१ | एडब्ल्यूसी फॉर कंप्लीट रिवायडिंग ऑफ एल.टी. मोटर्स ऑफ रेटिंग अबाउ ५० केडब्ल्यू अप टू १६० केडब्ल्यू इंस्टॉलड अॅट ईएम-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.३३ लाख ८८३२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४२५८ | वर्क ऑफ रिप्लेसमेंट ऑफ प्लॅनेटरी गियर बॉक्स केएमपी-२८०/३०० ऑफ कोल मिल एक्सआरपी-९०३ अॅट बीएम यू-८, टीपीएस, परळी वै. | २३.४७ लाख २६९७७/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४२६० | टू इयरली अॅन्युअल कॉंट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस , हाऊस कीपिंग अँड मेंटेनंस ऑफ व्हीआयपी रेस्ट हाऊस अॅट टीपीएस, परळी वै. | ३४.६५ लाख ३८१५३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४३१२ | एएमसी फॉर अटेंडिंग कंप्लइंट्स ऑफ ऑल टाइप्स ऑफ डोर्स , विंडोज अँड कार्पेंटरी रिलेटेड वर्क्स अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड इन एनपीटीपीएस यू-८ अॅट परळी वै. | ९.२३ लाख १२७३२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४३३१ | एडब्ल्यूसी फॉर अटेंडिंग कम्पलेंट्स ऑफ सॅनिटरी वर्क इंक्लुडिंग रिमोविंग चोक अप ऑफ टॉयलेट ब्लॉक्स , सेवर लाइन्स अँड मॉडीफिकेशन ऑफ सॅनिटरी ड्रेन लाइन्स अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड इन यू-८, सिविल, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.९० लाख १३४०१/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४३३३ | अॅन्युअल कॉंट्रॅक्ट फॉर मिसस्लेनियस सिविल वर्क्स रीक्वायर्ड फॉर अटेंडिंग कम्पलेंट्स अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट न्यू पॉवर हाऊस यू-८, परळी वै. | १९.९९ लाख २३४९३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४३६५ | एएमसी फॉर कोल मिल डीपी मेंटेनंस अॅट आय अँड सी-२,२५०मे.वॅट टीपीएस,परळी वै. | १.०८ लाख ३२५३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४४४२ | एएमसी फॉर सर्विसिंग ऑफ मोटराईजड वॉल्व अॅच्युयटर्स अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी -१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३.८१ लाख ७३२०/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४४६३ | एएमसी फॉर द वर्क ऑफ प्रोव्हायडिंग सर्विसेस फॉर हायड्रा क्रेन, ट्रॅक्टर ट्रोली अँड जेसीबी/पोकलेन मशीन अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड बेसिस अॅट बीएम-२,टीपीएस,परळी वै. | ९.३२ लाख १२८२९/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४४७७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ सील एयर फॅन इंप्लेयर, क्लॉकवाइज अँड अॅंटीक्लॉकवाइज फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट बीएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १४.४० लाख १७९००/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४४९७ | एएमसी फॉर सर्विसिंग ऑफ मोटराईजड वॉल्व अॅच्युयटर्स अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी -२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४.१५ लाख ७६५३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई-निविदा क्र ३०००६४५१३ | टू इयर एएमसी फॉर रेल ट्रॅक मेंटेनंस ऑफ रेल्वे साइडिंग अॅट सीएचपी-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २७.५९ लाख ३१०९६/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७९८/२०२५
**कुब्रा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१५.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Kubra Mohammad Mateen, Age 77 Yrs. Occu.: Household
R/o Near Jama Masjid Sabanpura, Amravati.
2. Mo.Javed Mo.Matin, Age 54 Yrs. Occu.: Labour
R/o Kazi Plot, Karanja Lad, Tq.Karanja Lad, Dist. Washim
3. Mohammad Jamshid Sheikh Matin, Age 45 Yrs. Occu.: Labour
R/o Kate Nagar, Lonar, Buldhana.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मोहम्मद मॅटीन शेख मोईनुद्दीन** हे दिनांक 21.12.2019 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कुब्रा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुब्रा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९०७/२०२५
**एकता -वि- निरंक**
पुढील ता.२७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Ekta Vinod Bijore, Age 42 Yrs. Occu.: Household
R/o 19/54 Front of Tiwari's Hospital Morbag, Amravati.
2. Ansh Vinod Bijore, Age 20 Yrs. Occu.: Education
R/o Arun Hostel Road, Morbag, Amravati.
3. Aadarsh Vinod Bijore, Age 17 Yrs. Occu.: Education
(Appli.No.1 is Natural Guardian Mother Behalf of her minor son i.e. Appli.No.3)
R/o In Front of Tiwari's Hospital Morbag, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विनोद घ्यासीलाल बिजोर** हे दिनांक 29.10.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **एकता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **एकता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७४०/२०२५
**श्रीमती अल्का अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०६.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Alka Vivek Wakode Age 54 Yrs. Occu.: Household
2. Shubham Vivek Wakode, Age 30 Yrs. Occu.: Business
3. Prasanna Vivek Wakode, Age 23 Yrs. Occu.: Business
All 1 to 3 R/o Dhole Hospital, Rukhmini Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विवेक यशवंतराव वाकोडे** हे दिनांक 28.08.2002 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **कमला यशवंत वाकोडे ही** दिनांक **०६.०९.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. अर्जदार **अल्का अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अल्का अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### सरस्वती प्राथमिक शाळेचे सुयश

**अंजनगाव बारी** - शिक्षण विभाग जिल्हा परिषद अमरावती, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ, जिल्हा मुख्याध्यापक संघ आणि स्व. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय, वरुड यांच्या संयुक्त विद्यमानाने जागृत विद्यालयात ५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनी मध्ये वनिता वनिता समाज द्वारा संचालित सरस्वती प्राथमिक शाळा चांदूर रेल्वेचे सहाय्यक शिक्षक निलेश श्रावण इंगोले यांनी प्राथमिक शिक्षक गटात सहभाग घेऊन 'मनोरंजनातून विज्ञान' ह्या विषयावर आधारारीत शैक्षणिक साहित्याचे मॉडेल तयार केले होते. निलेश इंगोले ह्यांच्या नैत्रदीपक यशासाठी त्यांचे सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे. आपल्या यशाचे निलेश इंगोले ह्यानि संस्थेच्या अध्यक्षा लता देशमुख, शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता अजित पाटील तसेच जेष्ठ शिक्षीका जया देशमुख आणि त्यांच्या सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाला दिले आहे.



### हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**नांदगाव पेठ**-संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त काशिनाथ धाम येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत महोत्सवाचा भक्तिभावात समारोप झाला.याप्रसंगी हभप शिवानंद महाराज शास्त्री यांचे गोपाळकाला कीर्तन पार पडले. सकाळपासूनच काशिनाथ धाम परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. गोपाळकाला कीर्तनाने उपस्थित भाविक भक्तिरसात तल्लीन झाले होते. संत काशिनाथ महाराजांच्या समाधीस्थळी आकर्षक फुलांची आरास करण्यात आली होती. भजन, कीर्तन, आरती आदी कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारून गेला होता. महाप्रसाद वितरणासाठी गावातील भाविक, युवक मंडळी व स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने सेवा दिली. महाप्रसादाच्या निमित्ताने नांदगाव पेठमध्ये आनंदाचे व भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. गावाशी नाते असलेले अनेक कुटुंबीय या निमित्ताने एकत्र आले. नोकरी-व्यवसायामुळे बाहेर वास्तव्यास असलेले नागरिकही खास या सोहळ्यासाठी उपस्थित राहिले. दिवसभर गावात उत्सवी चैतन्य दिसून आले असून नागरिकांनी धार्मिक कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता.



### 'निसर्ग असमतोल व पर्यावरण संवर्धन' विषयावर व्याख्यान

**अमरावती**-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात 'निसर्ग असमतोल व पर्यावरण संवर्धन' विषयावर नुकतेच अतिथी व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख डॉ. के.बी. नायक, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. यू. राऊत, नारायण पवार उपस्थित होते.नारायण पवार यांनी तयार केलेल्या बीज बँकेचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. यात स्थानिक व दुर्मिळ वनस्पतींच्या विविध बियाण्यांचा समावेश होता. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी बीज बँकेचे महत्त्व प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे स्पष्ट करण्यात आले. तसेच काही बियाण्यांची समाजशास्त्र विभागाच्या परिसरात प्रात्यक्षिक स्वरुपात लागवड करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात डॉ. के.बी. नायक यांनी पर्यावरण संवर्धनाचे समाजशास्त्रीय अभ्यासातील अनन्यसाधारण महत्त्व सांगितले. संचालन डॉ. प्रशांत भगत, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील प्रा. साधना इंगोले, डॉ. रोहिणी वावरे, संशोधक विद्यार्थी राजकुमार सरयाम, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री प्रवीण गडलिंगकर, विद्यार्थी व संशोधक उपस्थित होते.

# ११२ दिवे लावून साजरा केला शकुंतलेचा वाढदिवस

## ३८व्या प्रतिकात्मक जनआंदोलनला तालुक्यातील ७ ग्रामपंचायत व ३७ सामाजिक संघटनचा पाठिंबा



**अचलपूर/ वार्ताहर**

१ जानेवारी रोजी नवीन वर्षाची पहाट सर्वांसाठी नवीन ऊर्जा, चैतन्य व आशा घेऊन उदयास आली. सर्वांचे आपले काही संकल्प राहिले पण गेल्या सात वर्षांपासून केंद्र शासन स्तरावर शकुंतला रेल्वेचा प्रवास अंधार काही संपताना दिसतच नसल्याने पुन्हा अचलपूर तालुक्यातील विविध सामाजिक संघटन पदाधिकारी व नागरिक यांनी आपल्या हक्का प्रति शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती सोबत संगतीला येऊन खाली ट्रॅक, उजाड प्लॅटफॉर्म वर शकुंतला रेल्वेचा काल नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी इंग्रज परंपरानुसार केक कापून तर भारतीय परंपरा नुसार ११२ दिवे लावून रेल्वे स्टेशन अचलपूर येथे वाढदिवस साजरा केला.

१ जानेवारी १९१४ रोजी इंग्रजी राजवट मध्ये शकुंतला पॅसेंजर ही सर्वप्रथम बेरार इलीचपूर येथून पुढील मार्ग प्रति मुर्तिजापूर व यवतमाळ येथे धावली होती.

हजारो लोकांची जीवन वाहिनीने प्रवासी सोबत संगतीला कापूस, पिक धान्य, लाल सागवान पण सोबत देशभर, विदेश भर पोहचत गेला. इंग्रज राजवट मधे १०० वर्षे सुरू असलेली शकुंतला ही शेवटी २०१९ मधे बंद झाली. पण जीवन वाहिनीसाठी सलग आठव्या वर्षी आज जानेवारीच्या प्रारंभी नंदेश अंबाडकर यांच्या हस्ते केक कापून तर ११२ दिवे लावून वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी शकुंतला रेल बचाव सत्याग्रही योगेश खानजोडे, डॉ. राजा धर्माधिकारी, राजेश अग्रवाल, कमल केजरीवाल, शारदा ऊईके, दिपा तायडे, मेहर बानो, सायरा बानो,राजेंद्र जयस्वाल,एस. बी. बारखडे, विजय गोंडचवर, वसंतराव धोबे, संजय डोंगरे, सुरेश प्रजापती, संतोष भालेराव, राजेश भुयार, धनंजय नाकील, संतोष नरेडी, रामदास मसने, प्रकाश पुसदकर, दयाराम चांदेल, राजेश पांडे, मो.नाझींम शेख, पंकज शर्मा, वीरेंद्र उदापूरकर, विक्रम गुप्ता, निळकंठ गावंडे, डॉ दिपक गुलाणे,राजेश भुयार, सतीश बारबुधे, कैलास ठोसर सह नागरिक उपस्थित राहिले.

यावेळी उग्र आंदोलन करण्यासाठी भाग पाडू नका. आता पूर्ण क्रांति ज्योती संघटन सोबत राहू असा इशारा नंदेश अंबाडकर यांनी दिला. जमात हिंद मुस्लिम संघटन अध्यक्ष नझीम शेख यांनी सुद्धा या मागणी ला पूर्णत्वास नेण्यासाठी या लढ्यात नेहमी सहभागी राहणार असल्याचे सांगितले .यानंतर संतोष नरेडी यांनी रखडलेला विकास आणि व्यापार यावर मनोगत व्यक्त केले. यू.पी व बिहार मध्ये जर रेल्वेचे जाळे आहेत तर आमच्या चार जिल्ह्यात शकुंतला सुरू का नाही? हा प्रश्न योगेश खानजोडे यांनी मांडला.

३८ व्या जनआंदोलन साठी अथक परिश्रम राजेश अग्रवाल, राजा धर्माधिकारी, संजय डोंगरे यांनी घेतला तर आभार प्रदर्शन शारदा ऊईके यांनी केले.

# महानगरपालिकेतर्फे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेतर्फे येणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील सांस्कृतिक भवन येथे सदर प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला. सदर प्रशिक्षण निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष, शांततापूर्ण व कार्यक्षमरीत्या राबविणे हा होता. प्रशिक्षणादरम्यान निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्पे सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले.

यामध्ये आदर्श आचारसंहिता, मतदान केंद्रांची पूर्वतयारी, मतदान दिवशी करावयाची कार्यवाही, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रणांचे हाताळणी व सुरक्षितता, मतमोजणी प्रक्रिया तसेच निवडणूक काळातील प्रशासकीय जबाबदाऱ्या यावर विशेष भर देण्यात आला.

सदर प्रशिक्षणात विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना निवडणूक काळात येणाऱ्या संभाव्य अडचणी, कायदेशीर बाबी, तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाच्या निर्णयांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण अधिक प्रभावी व्हावे यासाठी सादरीकरण, उदाहरणे व प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे माहिती देण्यात आली. यावेळी प्रशिक्षण उपजिल्हाधिकारी (महसुल) विवेक जाधव आणि तहसिलदार विजय लोखंडे यांनी दिले.

यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शंका दूर करण्यासाठी प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रामध्ये सहभागी कर्मचाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञ मार्गदर्शकांनी सविस्तर उत्तरे दिली.अमरावती महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने असे नमूद करण्यात आले की, निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योग्य प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. या प्रशिक्षणामुळे निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढून ते आपली जबाबदारी अधिक दक्षतेने पार पाडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमामुळे आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ शांततापूर्ण, सुरळीत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

# होमगार्ड सैनिकांना वर्षभर काम?

## रुपेश वाळके यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**अमरावती/ का.प्र.**



पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून सेवा देणारा होमगार्ड अजूनही उपेक्षित जिणे जगत आहे. अनेक वेळा मागणी करूनही त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे होमगार्डना कधी वर्षाचे ३६५ दिवस काम मिळेल? याची प्रतिक्षा असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होमगार्ड सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी दिलेली आश्वासने तत्काळ पूर्ण करून राज्यातील ५० हजार होमगार्ड सैनिकांना दिलासा देण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून केली आहे.

राज्यात ५० हजारांच्या वर होमगार्ड आहेत. होमगार्ड पोलिसांना मदतीचे काम करीत असतात; परंतु शासनाकडून कायम त्यांच्या बाबतीत दुजाभाव केला जातो. पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून सुरक्षेचे काम करीत असताना पोलिसांच्या तुलनेत अगदीच अत्यल्प मानधन त्यांना दिले जाते.याबाबतीत अनेक वेळा होमगार्ड संघटनांकडून शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. होमगार्डना कायम करण्यापासून मानधनात वाढीपर्यंत अनेक मागण्यात अनेक वेळा करण्यात आल्या. शासनानेही त्यांना आश्वासन दिले; परंतु ते कधीच पूर्ण केले नाही.

होमगार्ड संघटनेच्या वतीने अनेक वेळा आंदोलनेही करण्यात आली. गणेशोत्सव, निवडणूक व इतर ठिकाणच्या बंदोबस्तावर वेळोवेळी बहिष्कार टाकण्यात आला होता. त्यानंतर गृहमंत्र्यांनी विधानसभेत होमगार्डच्या कामाच्या दिवसांमध्ये वाढ करून वेतनातही वाढ केली जाईल, असे आश्वासन दिले होते; परंतु ते काही अजून पूर्ण झालेले नाही. जे मानधन दिले जाते तेही वेळेवर मिळत नाही. त्यामुळे राज्यातील हजारो होमगार्ड सैनिक संकटात सापडले आहे.होमगार्ड यांच्यासाठी ३५० कोटी तरतूद केली आहे ती पुन्हा कायम करण्यात येईल. दर ३ वर्षांनी नोंदणीचा करण्याचा जो नियम आहे तो रद्द करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होती ती पूर्ण करून राज्यातील ५० हजार होमगार्ड सैनिकांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

### जिल्हा लोकशाही दिन रद्द

**अमरावती**- महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२५-२६ निमित्त लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी कार्यालयात होणारा जिल्हा लोकशाही दिन साजरा केला जाणार नाही.राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार,१९ जानेवारी २०२६ (सोमवार) पर्यंत आचारसंहिता लागू असल्याने, हा निर्णय घेण्यात आला आहे.

# शिक्षक पतसंस्था दर्यापूरच्या अध्यक्षपदी जामनिक तर उपाध्यक्षपदी बावनेर

**खल्लार**-दर्यापूर शिक्षक पतसंस्था मर्या र. न ५०२ ची अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, खजिनदार पदाची निवडणूक नुकतिच शिक्षक पतसंस्था दर्यापूर च्या कार्यालयात पार पडली. समता पॅनल व प्रगती पॅनल मध्ये लढत झाली त्यात अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे तालुका सरचिटणीस डी. आर. जामनिक हे अध्यक्षपदी उपाध्यक्षपदी करिता पदविधर शिक्षक संघटनेचे विभागीय संघटक अशोक बावनेर तर मानद सविव पदा करिता प्रशांत गहले, खजिनदार पदी सुनिल स्वर्गीय हे प्रतिस्पर्धी पॅनलच्या उमेदवारावर मात करुन निवडून आले.



या विजयाचे सर्व श्रेय अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे शिक्षक बँकेचे संचालक संजय नागे, तसेच अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा शिक्षक पतसंस्था चे संचालक संजय साखरे,

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघांचे मार्गदर्शक पंडितराव देशमुख, अखिल शिक्षक संघांचे तालुका अध्यक्ष सतिश वानखडे, कार्याध्यक्ष सुरेंद्र पतींगे कोषाध्यक्ष राजू सावरकर, तसेच शिक्षक पतसंस्था चे माजी अध्यक्ष बाळासाहेब पावडे, माजी अध्यक्ष धनपाल गजभिये, माजी उपाध्यक्ष विनायक चव्हाण,जेष्ठ मार्गदर्शक रत्नाकर करुले,विजय पवार, राजेंद्र मालोकार, विलास पेठे, मधु चव्हाण, संजय बोबडे,रवींद्र राठोड यांना दिले जात आहे.सर्वांच्या वतीने नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, खजिनदार यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पंडितराव देशमुख सतिश वानखडे, संजय नागे व इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.शिक्षक पतसंस्थाच्या निवडणुकीचे काम निवडणूक निर्णय अधिकारी हुरबळे,निलेश वानखडे, तसेच सुभाष निमकर्डे, कडू व्यवस्थापक यांनी काम पाहिले.

# आज श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात सामुहिक सूर्यनमस्कार आणि गीतापठन

**अमरावती**- अमरावती जिल्ह्यातील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शाळा आणि अन्य शाळातील दहा हजार विद्यार्थी उद्या शनिवार ३ जानेवारीला सकाळी ७.३० वाजता एकाच वेळी सूर्यनमस्कार घालणार असून गीतेच्या बाराव्या अध्यायाचे पठन करणार आहेत.गीता परिवार, अमरावती आणि श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य पटांगणात उद्या ३ जानेवारीला सकाळी साडेसात आयोजित या उपक्रमात गीता परिवाराचे संस्थापक अध्यक्ष तथा श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र, अयोध्याचे कोषाध्यक्ष प.पु. गोविंददेव गीरीजी महाराज मार्गदर्शन करणार असून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ.संजय मालपाणी, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी सौ.प्रिया देशमुख, गीता परिवाराच्या विदर्भप्रमुख सौ.शोभा हरकुट हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे,अशी विनंती आयोजन समिती सदस्य डॉ.सौ.नयना कडू आणि श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गावंडे यांनी केले आहे.

# खो-खोमध्ये जि.प.शाळेचे विद्यार्थी प्रथम

**लेहेगाव** - क्रीडा संकुल मोर्शी येथे झालेल्या तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सावरखेड पिंगळाई येथील विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक कामगिरी करत माध्यमिक मुले खो-खो या गटामध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत जिल्हा क्रीडा स्तरावर प्रवेश निश्चित केला.तालुकास्तरीय खो-खो च्या अंतिम सामन्यांमध्ये अत्यंत रोमहर्षक, अटीतटी आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांनी दुमदुमून गेलेल्या वातावरणात प्रतिस्पर्धी संघांवर मात करत आपले वर्चस्व सिद्ध केले. मैदानी खेळ हे केवळ शरीर बळकट करणारे नसून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त, संयम, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास निर्माण करणारे



प्रभावी माध्यम आहे, हे या यशातून स्पष्ट झाले. या विजयामुळे शाळेला आता जिल्हास्तरीय क्रीडा महोत्सवात प्रतिनिधित्व करण्याचा मान प्राप्त झाला आहे. विजयी चषक पारितोषिक वितरण समारंभात मा.डॉ.नितिनजी उंडे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मोर्शी, ज्ञानेश्वर गायकवाड वि.अ.(शिक्षण),सुरेंद्र वानखडे केंद्र समन्वयक दापोरी, मनोज वांगे केन्द्रसमन्वयक,शिरखेड केंद्र यांच्या शुभहस्ते विजयी संघांना चषक प्रदान करण्यात आले.या क्रीडा विजयासाठी राजीव चव्हाण मुख्याध्यापक (उ.श्रे.), खो-खो प्रशिक्षक जयंत, सविता महल्ले,संगितो, सूषमा इसड, वंदना पुसदेकर, विजयसिंह ठाकूर या सर्व क्रीडा प्रभारी शिक्षकांनी मेहनतीने सहकार्य केले.शाळेच्या या यशाबद्दल सर्व अधिकारी, सावरखेडचे सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य,मोर्शी तालुका अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष कैलास सिंह ठाकुर, पालक वर्ग आणि गावकरी यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# विद्यापीठाचा क्रिकेट संघ घोषित

**अमरावती**- सौराष्ट्र युनिर्व्हसिटी, राजकोट येथे २७ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ क्रिकेट (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा आदित्य आहुजा, यजवान गाढवे, वेदांत मुळे, सिध्दांत मुळे, विवेक दलवानी, वेदांत जाजू व शुभम तिवारी, इंदिरा महाविद्यालय, कळंबचा वेदांत दिघडे व प्रेम घोडे, श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजाचा तुषार सूर्यवंशी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोलाचा प्रबल चौखंडे, बी.एस.पाटील महाविद्यालय, परतवाडाचा विशेष तिवारी, दयाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा आकाश राऊत, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा मल्हार सिखरे व ऋषिकेश शेलोकार, डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूरचा अर्जून इंगळे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा भावेश बोपते, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा परिक्षित सपाटे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, अमरावती येथे दि. १५ ते २४ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

## दर्यापूरात काँग्रेस पक्षाच्या विजयात बुथ नियोजन ठरला महत्वाचा मुद्दा

# प्रा.आशिष देशमुख यांनी योग्य मार्गदर्शन केले- शिरभाते

**खल्लार/ वार्ताहर**

दर्यापूर नगर परिषद निवडणुकीचा निकाल अलीकडेच जाहीर झाला असून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने विरोधकांना चारीमुंड्या चित करत नगर परिषदेवर काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवला नगराध्यक्ष म्हणून सौ मंदाकिनी सुधाकर भारसाकळे यांचा अडीच हजार मतांनी विजय झाला. तर २५ पैकी १७ नगरसेवक निवडून आले. या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विजयात पक्षाचे नेते तथा खासदार बळवंत वानखडे, दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या सोबतच कृषी उत्पन्न बाजार समिती,खरेदी विक्री संघ, सहकार म्हणून



काँग्रेस पदाधिकारी, तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व शहर अध्यक्ष आतिश शिरभाते यांच्या नेतृत्वाखाली शहर काँग्रेस कमिटीचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांची नियोजनबद्ध संघटन याचा मोलाचा वाटा आहे. या सर्वांचे सूक्ष्म नियोजन सूर्योदय सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा आशिष शिवाजीराव देशमुख(शिवरकर) यांच्या मार्गदर्शनात १२ प्रभागात २५ वार्ड मध्ये बूथ समिती स्थापन करून १२५ सक्रीय युवा कार्यकर्ते यांचे संघटन करून त्याच्या द्वारे मतदारापर्यंत काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी पोहचण्यात यशस्वी झाले व आज नगराध्यक्ष यांचा अडीच हजार मतांनी विजय झाला, असे मत शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आतिश शिरभाते यांनी व्यक्त केले. दर्यापूरात काँग्रेस पक्षाच्या विजयात बुथ नियोजन हा महत्वाचा मुद्दा ठरला आहे.

# राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष सुनील वऱ्हाडे भाजपात

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या उपस्थिती प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील वऱ्हाडे यांनी आपल्या समर्थकांसह शुकवारी (दि.२) अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासात्मक दृष्टीने सुरू असलेले काम पाहता भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सुनील वऱ्हाडे यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष तसेच प्रदेश उपाध्यक्ष पदाचा गुरुवारी रात्री राजीनामा(पान २ वर)



### स्थानिक निवडणुकांवर परिणाम-

महानगरपालिका निवडणुकी पार पडल्यावर जिल्हा परिषद निवडणूक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान अशात जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी सुनील वऱ्हाडे यांनी समर्थकांसह भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटाला अमरावतीत जोरदार धक्का बसला आहे. पालकमंत्री बावनकुळे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. सुनील वऱ्हाडे यांनी अमरावती जिल्हा परिषदमध्ये विविध पदांवर कार्य केले आहे. ते दिवंगत मंत्री अनिल वऱ्हाडे यांचे लहान भाऊ आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते ३ वेळा संचालक होते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वी त्यांच्या भाजप प्रवेशामुळे राकाँला जबर धक्का बसला आहे. याचे पडसाद आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत दिसणार आहे.

# आयुक्त सौम्या शर्मा यांनी केली ईव्हीएम गोदामाची पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनामार्फत युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. या अनुषंगाने निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ रोजी अमरावती येथील सांस्कृतिक भवनाच्या बाजूला असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) साठवणूक व व्यवस्थापन केंद्राची सखोल पाहणी केली. या ठिकाणी ईव्हीएम मशीन साठवून ठेवण्यात येत आहे. एफएलसी प्रक्रिया सुरु आहे. प्रथम स्तरीय तपासणी



(एफएलसी) निवडणूकीपूर्वी प्रत्येक मशीनची तांत्रिक तपासणी केली जात आहे.

या पाहणीदरम्यान ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रांच्या सुरक्षित साठवणुकीबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना, सीसीटीव्ही निगराणी व्यवस्था, सुरक्षा कर्मचारी तैनाती, अग्निसुरक्षा व्यवस्था तसेच प्रवेश व निर्गमन नियंत्रण प्रणाली यांची सविस्तर माहिती आयुक्तांनी घेतली. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा अत्यंत संवेदनशील असल्याने कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी(पान २ वर)

# भाजपच्या माजी नगरसेविका स्वाती जावरे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

### काँग्रेस समर्थक नरेंद्र गुलदेवकर यांनीही बांधले घड्याळ

## आ.संजय खोडके व सुलभा खोडके यांच्या नेतृत्वावर दर्शविला विश्वास

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय जनता पार्टीच्या माजी नगरसेविका स्वाती सुनील जावरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. आज शुक्रवार दि.०२ जानेवारी २०२६ रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन महासचिव आ. संजय खोडके व आ. सुलभा खोडके यांची भेट घेऊन पक्ष प्रवेश केला. इतकेच नाही तर अमरावती महानगर पालिकेच्या



निवडणुकीत प्रभाग क्र. ३ नवसारी मधील राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना जाहीर पाठींबा देऊन त्यांना निवडून आणण्याचा सुद्धा निर्धार केला. स्वाती जावरे यांनी भाजपासह काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करतांना सांगितले कि, बहुजनांना वेळोवेळी डावलल्या जात आहे. त्यांच्यासाठी मागील काळात मेहनत घेतली. मात्र ऐन वेळेवर उमेदवारी देतांना डावलण्यात (पान २ वर)

# मतदार जनजागृतीसाठी एलईडी व्हॅनचा शुभारंभ

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व स्वीप कार्यक्रमांतर्गत अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांच्या कल्पकतेतून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने मतदार जनजागृतीसाठी विशेष एलईडी व्हॅनचा शुभारंभ आज शुक्रवार, दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी अतिरिक्त आयुक्त



शिल्पा नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदारांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सदर एलईडी व्हॅनच्या माध्यमातून अमरावती शहरातील विविध प्रभाग, वस्ती तसेच सार्वजनिक ठिकाणी फिरून मतदानाचे महत्त्व, मतदार नोंदणी प्रक्रिया, मतदानाची पद्धत, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट संदर्भातील माहिती तसेच नैतिक व निर्भय मतदानाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले की,(पान २ वर)

# ब्राह्मणवाडा थडी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भोंगळ कारभार



**ब्राह्मणवाडा थडी/प्रतिनिधीः-** ब्राह्मणवाडा थडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भोंगळ कारभार सुरू असून संपूर्ण गावांमध्ये याबाबत चर्चा आहे.

■ भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता प्रतिसाद देत नाही.
**-सुरेश आसोले** , जिल्हा आरोग्य अधिकारी अमरावती

भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता प्रतिसाद देत नाही. यापूर्वीही अनेक वेळा संपर्क साधला असता कधीच प्रतिसाद देत नाही. **-उज्वला डकरे,** तालुका आरोग्य अधिकारी

या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी यांच्या येण्याच्या व जाण्याच्या वेळेत अनियमितता दिसून आली आहे. आरोग्य सेवक बारा वाजता येतात आणि दोन वाजता घरी जातात तसेच मुख्य वैद्यकीय निरीक्षक हे सुद्धा वेळेवर येत नसून वेळेपूर्वीच घरचा रस्ता धरतात तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आशासेविका व महिला कर्मचारी यांना व्यवस्थित बाथरूम, संडास ची व्यवस्था नसून त्यामध्ये नेहमीच घाण असते. (पान २ वर)

# शेत शिवारातून बैलबंडी व बैलजोडी लंपास

**मोर्शी/प्रतिनिधीः-** अहमदपूर(पाळा) शेत शिवारातून लोखंडी बैलबंडी व बैलजोडी सह ८० हजाराचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.३० डिसेंबर रोजी उघडकीस आली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मोर्शी शहरातील माळीपुरा येथील वास्तव्यास असणारे फिर्यादी शेतकरी गोपीकिसन बियाणी यांचे शेत मौजा अहमदपूर(पाळा)शेत शिवारात असून शेतातील विविध कामे करण्याकरिता बैलबंडी व



बैलजोडी सुद्धा आहे. फिर्यादी शेतकरी गोपीकिसन बियाणी यांनी दि.३० डिसेंबर रोजी शेतात फेरफटका मारण्याकरिता गेले असता शेतातील लोखंडी बंडी व दोन बैल खोपडी जवळ आढळून न आल्याने त्यांना शंका निर्माण झाली.शेतकरी बियाणी यांनी (पान २ वर)

# धामणगाव रेल्वे येथील अवैध सावकारावर धाड

### ९६ आक्षेपार्ह कागदपत्र जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाला प्राप्त तक्रारीच्या आधारावर पथकाने आज शुक्रवार २ जानेवारी रोजी धामणगांव रेल्वे येथील सावकार गोपाळ प्रभाकर टेकाडे यांच्या घरी झडती करून तेथून आक्षेपार्ह कागदपत्र आणि साहित्य जप्त केले आहे.

माहितीनुसार उपनिबंधक विभागाच्या पथकाने दत्तापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सावला येथील सावकार गोपाल प्रभाकर टेकाळे यांच्या घरी व श्री शिवारात एकाच वेळी शुक्रवारी



सकाळी साडेदहा वाजता धाड मारली. टेकाळे यांच्या घराची झडती घेतली असता तेथून दोन वाहनांची आरसी बुक, २२ कोरे धनादेश, २४ कोरे स्टॅम्प, ४५ स्थावर मालमत्ता संदर्भातील एकूण ९६ आक्षेपार्ह कागदपत्र तपासणी करिता जप्त केले. तसेच तिकडे यांच्या(पान २ वर)

# उपराई येथे रोजगार हमी योजनेच्या कामात रोजगार सेवकाकडून अनियमितता

## -ग्रामसभेने केले कामावरुन कमी

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार नजिकच्या उपराई येथील तथाकथित रोजगार सेवकाने रोजगार हमी योजनेच्या कामात गैरप्रकार व अनियमितता व शासनाची दिशाभूल केल्याने आज (दि.२) ग्रामसभेत बहूमताने रोजगार सेवकाला कामावरुन कमी केले. उपराई येथील तथाकथीत अतुल वामन खंडारे या रोजगार सेवकाची नियुक्ती दि. २९ एप्रिल ११ ग्रामसभेचा ठराव ६/१ नुसार करण्यात आली होती. ज्या रोजगार सेवकाची नियुक्ती ग्रामसभेत अतुल नावाने केली तो प्रत्यक्षात विनायक वामन खंडारे नावाचा व्यक्ती असल्याचा प्रकार उघडकीस आला.विनायक खंडारे नावाच्या व्यक्तीचा ग्रामसभेच्या ठरावात उल्लेखच नाही. रोजगार सेवकाची कामावर नियुक्ती होताच तो कामात गैरप्रकार करीत गेला. याबाबतची तक्रार गावातील नागरिकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करुन (पान २ वर)

■ रोजगार सेवक सुरुवातीपासूनच त्याच्या कामात गैरप्रकार व अनियमितता करीत होता. नागरिकांच्या तक्रारीवरुन शासनाची फसवणूक केल्याचे सिद्ध झाल्याने त्याला ग्रामपंचायतच्या ग्रामसभेत मोठया प्रमाणात गावकरी हजर असतांना बहुमताने कामावरून कमी करण्यात आले. **-निरज नागे,** सरपंच, उपराई

■ रोजगार सेवक याच्याकडून २०११ ते २०२५ पर्यंत सर्व मानधन वसूल करुन शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्याच्यावर राज्यघटनेनुसार फौजदारीं गुन्हे दाखल करण्यात यावे.
**-सुजित सुरवाडे, नागरिक, उपराई**

# ८७ जागांसाठी ६६१ उमेदवार रिंगणात

## शेवटच्या दिवशी १७२ उमेदवारांनी घेतली माघार

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीच्या नामांकनाच्या शेवटच्या दिवशी ८७ जागेसाठी ८३३ उमेदवार मैदानात होते. नामांकन वापस घेतल्यानंतर आता मनपा रणसंग्रामात ६६१ उमेदवार रिंगणात आहे. शनिवारी उमेदवारांची अंतिम यादी घोषित झाल्यावर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. शनिवारपासूनच प्रचार जोर पकडणार आहे.

आज शुक्रवार २ जानेवारी रोजी झोन क्रमांक एक रामपुरी कॅम्प येथून १८ उमेदवारांनी माघार घेतली.यामध्ये शेगाव

### उमेदवारांची झोन निहाय संख्या

झोन १ - ९७
झोन २ - १००
झोन ३ - ९४
झोन ४- १०८
झोन ५ - ८३
झोन ६ - ५३
झोन ७ - १२६
एकूण-६६१

### महापालिका निवडणुक




रहाटगांव मधून प्रियंका वानखडे, अभिषेक बोले ,गोपाल धर्माळे, सुनील केने, आशिष कावरे, प्रेमा लव्हाळे, राहुल सावले, दिनेश धाकडे यांचा सहभाग आहे. प्रभाग दोन गाडगेबाबा पीडीएमसी मधून विजय आठवले, नरेंद्र गुलदेवकर, प्रमिला जाधव ,संजय कडू व प्रभाग ५ महेंद्र कॉलनी कॉटन मार्केट मधून रवी गायगोले, संजय भोवते, मेघा काळे,वैशाली पावडे, आयेशा खान आसिफ खान, वनिता जाधव यांनी नामांकन परत घेतले. झोन(पान २ वर)




# धुळघाट येथे श्रीराम बसचा अपघात

## क्रिकेट खेळणाऱ्या १८ मुलांनी वाचवले ५० प्रवाशांचे प्राण



**धारणी/प्रतिनिधीः-** खराब रस्त्यामुळे मेळघाटमध्ये खाजगी आणि एसटी महामंडळच्या बसेस चे नेहमी अपघात होत आहे. अशीच एक घटना शुक्रवारी (दि.२) सकाळी धुळघाट परिसरात समोर आली आहे. श्रीराम नामक बस साईड देण्याच्या प्रयत्नातत खड्ड्यात कोसळली. तेथे क्रिकेट खेळणाऱ्या मुलांमुळे बसमध्ये बसलेल्या ५० प्रवाशांचे जीव वाचले.

माहितीनुसार श्रीराम बस शुक्रवारी सकाळी मोती माता यात्रेमधून येणाऱ्या ५० प्रवाशांना घेऊन अमरावतीकडे येत होती. त्यावेळी देडतलाई- धुळघाट मार्गावर एका वाहनाला साईड देण्याच्या प्रयत्नात चक्क बस खड्डयात (पान २ वर)

